रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १८ फेब्रुवारी २०२४



# अशोक चव्हाणांनी काँग्रेसला फारकत का दिली ?

स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणात पक्षाचे विचार व धोरणाला महत्व होते.देशातील निवडणूका पक्षाच्या जाहीरनाम्यावर होत असत.पक्षाच्या विचारावर निष्ठा असलेल्या अनेक नेत्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम केले आहे.काँग्रेस पक्षात गांधी विचाराने प्रभाव असलेली नेते होते. पण खरे गांधी गेले! नकली गांधी आले! काँग्रेस पक्षात १९६९ मध्ये महत्वाकांक्षी नेत्यांचा वर्चस्व वाढले.त्यातून 'पक्षांतराची लागण' सुरु झाली.प्रारंभी काँग्रेसला अश्या नेत्यांना पक्षात घेणे योग्य वाटले!जेंव्हा पक्षांतरांची लागण'काँग्रेसला सरकारला लागली.तेंव्हा पक्षांतर बंदी कायदा आणला गेला.तरीही राजकीय नेत्यांच्या कोलंटउड्या मारणे थांबलेले नाही.याचे कारण. पक्षाच्या विचारापेक्षा नेता महत्वाचा वाटू लागला.मग त्या नेत्याची पक्षावर निष्ठा असो नसो, त्यांना पक्षात घेतले जाऊ लागले.त्यामुळे पक्षाचा ऱ्हास चालाला आहे. आता राजकारणात 'राजकीय माफीया' निर्माण होत आहेत.सर्व पक्ष आयाराम -गयारामाला प्रोत्साहन देत आहेत.यात भाजपा वेगळा नाही.यात भाजपाचा गळाला महाराष्ट्रातील काँग्रेसचा मोठा मासा लागला.ते म्हणजे,काँग्रेस पक्षाचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात घेतले.चव्हाण यांच्या भाजपाच्या प्रवेशावरुन विरोधी बोटे मोडत आहे.भाजपा हा विरोधी पक्ष व लोकशाही संपविण्याचे प्रयत्न करत आहे,असा आरोप केला जात आहे.चव्हाणांनी ईडीच्या भीतीने भाजपात गेले,असे काँग्रेस नेते म्हणत आहेत. भाजपाने चव्हाणांचे हातपाय बांधून,तोंडाला चिकटपट्टी लावून, या अपहरणकरुन पक्षात घेतलेले नाही.चव्हाण हे परिपक्व नेते आहेत. चव्हाण हे भाजपा जातील याची कोणाच्या मनात शंका येत नव्हती. कारण चव्हाण कुटुंबायांनी दोन पिढ्या काँग्रेस पक्षाचे नेतृत्व केले आहे. मराठवाड्यातील नेते स्व. शंकरराव चव्हाण यांचा काँग्रेस विचारसरणी वर दृढ विश्वास होता.ते शेवटच्या श्वासापर्यत ते काँग्रेस पक्षात राहिले. त्यांचे पूत्र अशोक चव्हाण हे काँग्रेसनिष्ठच होते.त्यांनाही भाजपा विचार सरणी मान्य नव्हती.ते भाजपाच्या विचारसरणीवर प्रभावाणे पक्षात आले नाहीत! पक्षांतरानंतर प्रसिध्दी माध्यमासमोर बोलतांना ते म्हणाले, लोकसभा निवडणूका जवळ आलेल्या असताना पक्षाची कोणतीही तयारी नाही.पक्षात कोणतेही निर्णय होत नाहीत.तेंव्हा निवडणुकीला आम्ही समोरे कसे जायचे ?असा माझ्यासारख्या अनेक नेत्यासमोर प्रश्न होता. त्यामुळे पर्यायी मार्ग म्हणून भाजपात प्रवेश केला आहे.यावरुन देश व महाराष्ट्र पातळीवर काँग्रेस पक्ष दिशाहीन झालेला आहे.यात काँग्रेस पक्षाची गांधी परिवारावर अतिनिष्ठा त्यात पक्ष राष्ट्र व धर्म, विकास योजनांना,धोरणाला विरोध या नीतीमुळे पक्षाचे जहाज बुडत चालले आहे,याची चिंता नाही.राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत नेते व कार्यकर्ते पक्षाला सोडून जात आहेत. यापूर्वी नेते राहुल गांधी यांच्या विश्वासू मित्रांनी पक्षाची साथ सोडलेली आहे.महाराष्ट्रात मिलिंद देवरा,बाबा सिद्दीकी या निष्ठावंत्यांनी काँग्रेस त्याग केला.त्यात अशोक चव्हाण यांची भर पडली आहे.या प्रवेश सोहळ्याचे वैशिष्ट्य,म्हणजे राज्यातील राजकीय विरोधक व माजी मुख्यमंत्री फडणवीस व चव्हाण प्रथम एकत्र आले.दुसरे नांदेड जिल्ह्यातील चव्हाण यांचे कट्टर राजकीय विरोधक भाजपाचे खा.चिखलीकर हे चव्हाणांच्या मांडीला लावून बसले होते.भाजपा पक्ष कार्यालयात बॅनरवर प्रथम राष्ट्र,नंतर पक्ष,शेवटी स्वतः असे घोष वाक्य लिहिलेले होते.या उलट काँग्रेस पक्षात गांधी परिवार प्रथम,नंतर पक्ष व शेवटी राष्ट्र,असे पक्षाचे धोरण आहे तेंव्हा भाजपा आणि काँग्रेस पक्षाच्या विचारसरणीत हा फरक आहे. काँग्रेस सरकारने तर विरोधी पक्षाचा सरकारे बरखास्त केली.श्रीमती इंदिरा गांधींनी तर विरोधी पक्षाचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न केला.केंद्रात भाजपाची सत्ता आल्यानंतर पंतप्रधान मोदी यांचे नेतृत्वामुळे देशात विकासाला गती व आर्थिक प्रगती झपाट्याने होत आहे.त्यामुळे आज भाजपाचा जनाधार वाढत आहे.तर काँग्रेसचा जनाधार घटत चालला आहे.जेथे 'गुळ तेथे मुंग्या'असता.त्याप्रमाणे" जेथे सत्ता तेथे नेते' असे समीकरण बनले आहे.चव्हाण इडीच्या दवाबाखाली भाजपात गेले,हे एक कारण सांगितले जातेय!पण ईडीने त्यांचे विरोधात आजपर्यंत गुन्हा नोंदविला नाही.त्यांना एकही समन्स बजावलेले नाही.मग चव्हाणांचे भ्रष्टाचाराचे कथित प्रकरण कोणते? हे सांगितले जात नाही? केवळ ईडीच्या नावाने भाजपाच्या विरोधात शिमगा केला जात आहे.राजकीय नेते शेण खातात त्यांनाच ईडीची भीती आहे!सामान्य माणसांना नाही.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

चव्हाण भाजपात प्रवेश करताच विरोधकांना आदर्श घोटाळा दिसला. मग इतके वर्षे झोपी गेले होते काय?तेंव्हा मूग गिळून गप्प बसले होते?यात न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिला आहे. चव्हाण भ्रष्ट नेते होते वाटत होते तर काँग्रेसने त्यांना पक्षातून काढले नाही.काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस,उबाठा शिवसेना नेत्यांना आपल्या पक्षात असेपर्यंत भ्रष्ट नेत्यांना संरक्षण देतात,त्यांन

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व ज्येष्ठ नेते, नांदेड काँग्रेस गडाचे सेनापती अशोक चव्हाणांनी काँग्रेस विचाराला तिलांजली देत भाजपा पक्षात प्रवेश केला. स्व.शंकरराव चव्हाणांप्रमाणे काँग्रेस विचाराचा वारसा घेवून त्यांचे पूत्र चव्हाण ३९ वर्षांपूर्वी राजकारणात आले होते. त्यांनी नांदेडात पक्ष वाढविला.ते नांदेड काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा नेते होते. मग त्यांना काँग्रेस पक्षाचा त्याग का करावा लागला? केवळ चव्हाण हे एकमेव नेते नाहीत, काँग्रसचे अनेक निष्ठावंत नेते पक्षाचा त्याग करत आहेत. पण याचे खापर भाजपावर फोडले जात आहे. काँग्रेस पक्ष कोठे चुकतोय ? याचा पक्षाने गांभिर्याने विचार केला पाहिजे तरच पक्षाची गळती थांबू शकेल.**

निष्कलंक म्हणतात.ते भाजपा गेले की,लगेच त्यांना भ्रष्ट म्हणतात ? भाजपाकडे "वाशिंग मशीन' आहे तर विरोधी पक्षातील कोणता न्यायाचा तराजू आहे? केवळ लोकांना मूर्ख बनविण्यासाठी अशी भाषा वापरली जातेय! आदर्श प्रकरणी काँग्रेस श्रेष्ठींनीचव्हाणांचा मुख्यमंत्री राजीनामा नैतिकतेच्या आधारावर घेतला होता. काँग्रेसमध्ये नैतिकता आहे काय? काँग्रेसचे नेते श्रीमती सोनिया गांधी व राहूल गांधी, पी. चिदंमबरम व आदी नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत,पण त्यांचेकरिता पक्षात मापदंड वेगळे आहेत! श्रीमती इंदिरा गांधींच्या विरोधात भ्रष्टाचारात प्रकरणात न्यायालयाने निर्णय दिला होता,तरी त्या नेत्या व पक्षात कायम होत्या!काँग्रेस पक्षाला भ्रष्ट लालू प्रसाद,हेमंत सोरेन,केजरीवालसारखे भ्रष्ट नेते चालतात!तेंव्हा चव्हाणांना ईडी, बीडी अशी भीती नाही.

दुसरे कारण महाराष्ट्रात शिंदे- फडणवीस सरकारचा विश्वासदर्शक ठरावासाठी मतदान होते.यावेळी चव्हाण यांना वेळेवर जाता आले नाही. यात शिंदे व फडणवीस सरकार जिंकले.चव्हाण यांचे मतामुळे काही फरक पडला नसता.तसेच विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्षाची मते फुटली होती.तेंव्हा नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी पक्षाच्या आमदारावर संशय करुन त्यांचेवर कारवाईची मागणी पक्ष श्रेष्ठींकडे केली होती.यात काँग्रेसने चव्हाणांना नोटीस बजावली होती.तेंव्हापासून चव्हाण पक्षावर नाराज होते.काँग्रेस पक्षात त्यांची घुसमट होत होती.त्यामुळेच त्यांनी भाजपाचा रस्ता धरला.भाजपा पक्ष निष्ठेची पारख न करता आयारामांना भरणा करत आहे,ते पक्षासाठी धोकादायक आहे.यात चव्हाण हे लोकसभेसाठी इःच्छूक नसताना त्यांना पक्षाकडून उमेदवारी देण्याचा दवाब आणत जात होता.यावेळी त्यांची राज्यसभेवर जाण्याची इच्छा होती.पण राज्यातील काँग्रेस नेत्यांनी विरोध केला.दुसरीकडे श्रीमती सोनिया गांधी रायबेरली लोकसभा

सुरु केले होते.तेंव्हा यशवंतराव चव्हाण दौऱ्यावर आले होते. त्यांनी आपल्या भाषणात'पश्चिम महाराष्ट्राची माणसं कृतज्ञ आहोत, कृतघ्न नाहीत,असे म्हणाले होते.तरी पण प. महाराष्ट्राच्या नेत्यांकडून मराठवाडा व विदर्भाच्या विकासात खोडे घालण्याचा प्रयत्न झालाच! याचे उदाहरण १९७० मध्ये नागपूर काँग्रेस विधिमंडळ बैठकीत नियोजन विभागाचा निधी मराठवाड्याच्या प्रकल्पावर अधिक खर्च केला जातोय!म्हणून शंकररावांवर उघडपणे टीका केली.तेही नेते यशवंतरावांच्या उपस्थितीत ते उपहासात्मकरीत्या हसत होते.याचे दैनिक मराठवाडा'ने वृत्त आले होते.तेंव्हा त्यांनी पक्ष उप नेतेपदाचा राजीनामा दिला होता. तसेच नांदेड विष्णुपूरी प्रकल्पाचा मूळ आराखडा बदलण्याचा शेरा यशवंतरावांनी फाईल शेरा मारला होता.हे शंकरराव चव्हाणांनी सांगितले होते.मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळावे यासाठी मराठवाड्यातील नेत्यांनी श्रीमती इंदिरा गांधीकडे साकडे घातले होते. यावेळी नेत्यांनी यशवंतरावांचा सल्ला घेतला नाही,हे अनेकांना रूचले नाही.त्यामुळे त्यांना विरोध केला गेला.शेवटी १९७५ मध्ये श्रीमती गांधींनी शंकरराव चव्हाण यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केले.तेंव्हाऔरंगाबादच्या एका काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने,स्व. चव्हाण यांचे विषयी बोलतांना 'आता त्यांचा यशवंतरावशी मुकाबला आहे,तुमचा साहेब कोठे आहे'?असा टोमणा मारला होता.काँग्रेसच्या बैठकीत पवार समर्थकांनी चव्हाण यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची मागणी केली होती. त्यांचे अंगावर धावून गेले होते.ते आमदार काँग्रेसचे होते? प.महाराष्ट्र नेत्यांनी चव्हाण यांना नेतृत्वाला शह प्रयत्न झाला.ते नांदेड लोकसभेवर निवडून येवू नयेत म्हणून त्यांच्या विरोधात १९८० व १९८४ प्रयत्न झाले.तेंव्हा शरद पवारांनी रसद पुरवली होती.दुसरा नेता असता तर तेंव्हाच काँग्रेस पक्ष सोडला असता.नेते शंकरराव चव्हाण यांचे निधनानंतर पूत्र अशोक चव्हाण १९८५ मध्ये युवक

**भाजपामधील निष्ठावंताची कुंचबणा? :** जिल्ह्यात भाजपा नेत्यांनी राजकीय संघर्ष करताना चव्हाणांशी दोन हात केले .तेंव्हा कोठे जिल्ह्यात भाजपाला यश मिळाले आहे .यात चव्हाण भाजपात आल्याने निष्ठावंत नेते आणि कार्यकर्त्यांची कुंचबणा होईल, याची भीती व्यक्त केली जात आहे .

**खा .चिखलीकर – चव्हाण यांच्यात दिलजमाई? :** नांदेड जिल्ह्यातील भाजपाचे खा .प्रताप पाटील चिखलीकर व अशोक चव्हाण यांचे राजकारणात विळ्या भोपळ्याचे नाते आहे, मग जिल्ह्यात भाजपाचा नेता कोणाला मानायचे? एका म्यानात दोन तलवारी बसतील काय? यावरून भाजपात शीतयुध्द सुरु होईल,अशी भीती आहे .चव्हाण हे मुख्यमंत्री असताना खा .चिखलीकर यांनी दिलजमाईचा प्रस्ताव दिला होता,तो चव्हाणांनी फेटाळून लावला होता . त्यांना बेरजेचे राजकारण मान्य नाही .जिल्ह्यातील दोन नेत्यात दिलजमाई झाली तर विकासाला गती मिळेल,असे लोकांना वाटते .

**मुस्लिम नेत्यांचा विरोध :** नेते चव्हाणांच्या भाजपा प्रवेशाला विरोध आहे .काँग्रेसमधील बहूसंख्य मुस्लिम नेत्यांचा विरोध सुरु झाला आहे,त्यांनी मुंबईत जाउन प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची भेट घेतली व आम्ही काँग्रेस पक्षात असल्याचे सांगितले . चव्हाणांची मुस्लिम मतदार व्होटबँक होती .आता ती त्यांच्यापासून दूर जात आहे .

मतदार संघातून पळ काढला आहे. त्यांचे आपण प्रकृतीच्या कारणावरुन आपणाला लोकसभा निवडणूक लढविणे शक्य नाही,असे म्हणणे आहे,दुसरीकडे राज्यसभेवर जात आहेत.त्यांनी निवृत्ती घेवून आराम करावयाला हवा!खर तर! श्रीमती गांधींचे मताधिक्य घटले आहे,त्या पराभवाची भीती लपवित आहेत.यात लोकसभा व राज्यसभेतील काँग्रेस सदस्यावर नजर ठेवण्याची गांधी परिवाराची भविष्यातील कपटनीती आहे.आता रायबरेलीतून प्रियका वाड्रांना उभे केले जाईल,यातून गांधी परिवाराला पूर्ण 'न्याय' मिळेल. तर भाजपाने चव्हाणांना राज्यसभेवर घेवून त्यांची इच्छा पूर्ण केली आहे. चव्हाण हे भाजपा विनाअट पक्षात आले धांदात खोटे आहे.यात भाजपा आपला खोटा मुखवटा लपवत आहे.


संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्यावेळी मराठवाडा व विदर्भावर विकासाबाबतीत अन्याय होणार नाही,असे आश्वासन दिले गेले होते,ते पाळले गेले नाही.उलट या विभागाकडे दुर्लक्ष केले. मराठवाड्यातील जनतेला विकासासाठी संघर्ष करावा लागला.तेंव्हा ज्येष्ठ नेते शंकरराव चव्हाण सत्तेत होते.त्यांनी प.महाराष्ट्राच्या नेत्यांची विरोध घेत मराठवाडा विभागासाठी अनेक महत्वपूर्ण घेतले विशेषतः बारमाही पाणी वाटपाचे धोरण,आणि पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले.मराठवाड्याच्या विकासात त्यांचे योगदान आहे,हे विसरता येणार नाही.प. महाराष्ट्रातील नेत्यांनी नेते चव्हाणांना शह देण्याचे कारस्थाने केले.मराठवाड्याच्या नेत्यांकडे राज्याचे नेतृत्व दिले जाऊ नये,म्हणून विरोध केला गेला.यात ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाणांनंतर शरद पवारांनी अति केले. त्यामुळे काँग्रेस पक्षात पवार व चव्हाण असे दोन गट पडले होते. यामुळे पश्चिम महाराष्ट्र विरुध्द मराठवाडा असा राजकीय संघर्षही पहावयास मिळाला.नागपूर कराराची अमंलबजावणी करावी,यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांनी अंबाजोगाईत उपोषण

काँग्रेसपासून राजकारणाला सुरुवात केली. त्यांनी नांदेड जिल्ह्यात काँग्रेसला बळ दिले व पक्ष वाढविला.देशात मोदी लाटेत २०१४ मध्ये लोकसभेवर निवडून आले.मात्र २०१९ लोकसभा निवडणुकीत चिखलीकरांनी त्यांचा पराभव केला.चव्हाणांना यापूर्वी पराभवाचे दोन धक्के खाल्ले.त्यांच्या वडिलांनाही राजकारणात प्रथम पराभवाचा पहिला धक्का बसला होता.नांदेड लोकसभा निवडणुकीत भाजपाशी टक्कर देणारे चव्हाण हे समर्थ नेतृत्व होते. त्यांनी जिह्यातील लोकसभा आणि विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पक्षाला यश मिळवून दिले.त्यांचे नेतृत्व मानणारे जिल्ह्यात नेते व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात आहेत.राज्यात नांदेड जिल्हा तर काँग्रेसचा गड मानला जात होता.तो गड पूर्णपणे उध्वस्त होत आहे.जिल्ह्यात सद्या जिल्हा परिषद,महापालिका पंचायत समिती,नगर पालिका सर्वाधिक संस्थावर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आहे.चव्हाणांना दोन वेळा राज्याचे मुख्यमंत्री होते!हे पक्षाने झाले! त्यांनी पक्ष वाढीसाठी कोणतेही कसर सोडलेली नाही. २००९ मध्ये राज्याचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. तेंव्हा पक्षाला सर्वाधिक ८३ जागा मिळवून दिल्या.तेंव्हा भाजपा तिसऱ्या क्रमांकावर होता.चव्हाण कुटुंबाने पक्षासाठी स्वतः झोकून घेतल होत. अहोरात्र परिश्रम केले आहे,यात वादच नाही.पक्षाचे नेते राहूल गांधी यांची नांदेडात आली असताना त्यांचे स्वागतावर करोडो रुपये खर्च त्यांनी केला.तेंव्हा काँग्रेस पक्षात चव्हाण श्रेष्ठ होते अणि आता लगेचच--

नांदेडात चव्हाण यांचेकडे कांग्रेस पक्षाचे एक खांबी नेतृत्व होते. पक्षाचे सर्व निर्णय तेच घेत असत.या पक्षाचे वैभव सोडून त्यांनी आत्मघातकी निर्णय का घेतला? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. चव्हाणांचा राजकीय इतिहास पहाता.त्यांनी जिल्ह्यात काँग्रेस पक्षात एकाधिकारशाही व घराणेशाहीला महत्व दिले.त्यामुळे

नांदेड जिल्ह्यात दोन डझन तरी नेते काँग्रेस सोडून इतर पक्षात गेले.हे नेते चव्हाणांचा विरोध करत विरोधी पक्षात मोठे झाले. काँग्रेस पक्षाची मोठी चूक म्हणजे पक्ष चव्हाणांच्या दावणीला बांधला. त्यामुळेच आज पक्षाची 'बाबाही गेले दशम्याही गेल्या' अशी अवस्था झाली आहे.नांदेड जिल्ह्यात दुसऱ्या फळीतील नेता तयार होवू दिला नाही.काँग्रेसचे नेते राहुल त्याला चव्हाण व पक्षाचे प्रभारी व इतर नेत्यांनी हजेरी लावली होती.चव्हाण रविवार पर्यंत मुंबईच्या पक्षाच्या बैठकीला होते.यावरुन काँग्रेस पक्ष सोडण्याचा निर्णय त्यांनी रविवारी रात्री झाला.तोपर्यंत ते भाजपा बरोबर राजकीय सौदाबाजी करत होते.भाजपाच्या केंद्रिय नेतृत्वाने त्यांना राज्यसभेवर घेण्याचे मान्य केले,त्यानंतर चव्हाणांनी सोमवार सकाळी दोन ओळीचा पक्षाचा व पदाचा राजीनामा दिला.त्यात कोणतेही कारण दिले नाही. त्यांनी स्वार्थ पाहिला त्यांचेवर विश्वास ठेवून पक्षात काम करणारे नेते व कार्यकर्त्यांचा विचार केला नाही,याचे आश्चर्य वाटते.यामुळे चव्हाणांनी विश्वासघात केला,असे भावना काँग्रेस कार्यकर्त्यांत निर्माण झाली आहे. भाजजपाने पक्षहित पाहिले आहे,त्यांनी स्थानिक पातळीवर पक्ष नेत्यांनी चर्चा व विश्वासात न घेता राज्य व केंद्रिय पातळीवर चव्हाणांना भाजपात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला.या दोघांनी स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांना अंधारात ठेवले.यात आर.एस, एस. हा भाजपा चालविते, हा समज चुकीचा आहे.देवरा व चव्हाण हे संघाच्या शाखेत कधीच गेले नाहीत.संघ ही राष्ट्रसेवा,त्याग,सेवाभाव संस्काराची स्वतंत्र संघटना आहे. राज्यात एक काँग्रेसचा निष्ठावान मोठे नेते चव्हाण हे पक्ष सोडून जातात. याचे काँग्रेस पक्षाला सोयरसूतक नाही.पक्षाचे राज्याचे प्रभारी रमेश चिन्निथल्ला यांनी तर चव्हाण हे पक्ष सोडून गेले तरी 'पक्षावर कांहीही फरक पडणार नाही' असे म्हणत आहेत,यावरुन पक्षात नेत्यांना किंमत नाही. पक्ष अंहकारग्रस्त बनला आहे,असे दिसतेय!चव्हाणाच्या भाजपा प्रवेशामुळे नांदेडात भाजपा पक्षाची ताकद वाढणार आहे,हे निश्चित! स्थानिक राजकीय समीकरण बदलणार आहे.चव्हाणांची नीती "युज अँड थ्रो,ची आहे.ते नेत्यांना,कार्यकर्त्यांना व सामान्य माणसांना सहज भेटत नाहीत पक्षाचे निर्णय घेत होते,पक्षाचे नेते राहूल गांधी यांनी जिल्हाध्यक्ष बी.आर कदम यांना भोकर उमेदवारी दिली होती.तेंव्हा चव्हाणांनी कदम यांचा पंख कापले व राबडी पॅटर्नप्रमाणे व पत्नीला भोकर मतदार संघात उमेदवारी दिली व निवडून आणले.आता मुलीला भोकर विधानसभा मतदार संघासाठी उमेदवारी प्रयत्न करत होते,तेंव्हा राज्याचे काँग्रेस पक्षाचे नेतृत्व आंधळे होते काय?काँग्रेस पक्षात मोठ्या झाडाखाली छोटे झाड वाढत नाही,अशी म्हंटले जायचे!तेंव्हा काँग्रेस नेते बघ्याची भूमिका घेत होते! चव्हाणांना काँग्रेस पक्षात केलेल्या चूका सुधाराव्या लागतील.

चव्हाण यांना भाजपात जायचे होते! मागच्या दाराने का गेले?त्यांना वाजत गाजत व सामुहिकपणे जाण्याची भीती का वाटावी?ही बाब खटकते आहे.याचा दोन्ही बाजूच्या निष्ठावत कार्यकर्त्यांना धक्का बसला आहे.यात चव्हाण साहेब,भाजपात जाणार नाही,असे ठामपणे म्हणणारे काँग्रेस नेते अडचणीत सापडले आहेत!चव्हाणांचे 'चमचे' त्यांचे नावावर दहशत निर्माण करतात, अधिकाऱ्यांना धमकी देतात,ब्लेकमेल करतात, पैसे उकळतात.हे चव्हाणांच्या कानापर्यंत जात नाही.त्यांनी "चमच्या पासून दूर रहावे.चव्हाण हे सोन्यासारखे आहेत,मात्र कान पितळाचे आहेत. चव्हाण हे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे नेतृत्व करत असताना राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या पक्षाचे नेते ते विरोधी पक्ष संपविण्याचे कारस्थान करतात,असा आरोप करत होती.भाजपाने जर चव्हाण यांचेकडे पक्षाची सूत्रे दिली तर ते समांतर पक्ष चालवतील! काँग्रेसप्रमाणे भाजपचे वाटोळे'करतील.ते समांतर पक्ष चालवतील!असे भाजपाच्या निष्ठावंताना वाटत आहे.आता जिल्ह्यात भाजपाचे तीन खासदार झाले आहेत.जिल्ह्यात पक्षाचा नेता कोणाला म्हणायचे? भाजपा कार्यकर्त्यांनी कोणाचे आदेश पाळायचे! पक्षाचा खर्च कोणी करावयाचा? आदी प्रश्न उपस्थित केले जात आहेत.चव्हाणांमुळे जिल्ह्यात काँग्रेस पक्ष संपला. उद्या भाजपाची तीच गत होवू शकते.उद्या खा.चिखलीकर चव्हाणांच्या नेतृत्वाला कंटाळून काँग्रेस पक्षात जाऊ नये.भाजपाला त्यांचे नेतृत्व 'नाकापेक्षा मोती जड' होऊ नये, म्हणजे झालं!तेंव्हा काँग्रेस प्रमाणे भाजपा नेत्यांना चोळत बसण्याची वेळ येईल!यात चव्हाण हे भाजपात कायमचे स्थिरावतील,याची पक्षाला 'ग्यारंटी' हे काय? नांदेड जिल्ह्यात काँग्रेसचे चार,भाजपाचे तीन,शिवसेना एक व शे.का.चा एक आमदार निवडून आलेला आहे.आ. राजूरकर विधानपरिषद सदस्य आहेत ते कूशल संघटक आहेत.ते भाजपात आल्याने पक्षाला त्याचा फायदा होणार आहे.जिल्ह्यात चव्हाण समर्थक तीन आमदार आहेत. राज्यसभा निवडणुकीनंतर ते राजीनामा देतील.जेंव्हा चव्हाण हे नांदेड आल्यानंतर पक्षाचे हजारो कार्यकर्ते भाजपात दाखल होतील व जिल्हा भाजपमय होईल,यात शंका नाही.चव्हाण यांच्या भाजपाच्या प्रवेशामुळे भाजपा फायदा होईल तर काँग्रेस पक्षात फूट पडण्याची शक्यता अधिक आहे चव्हाणांच्या भाजपा प्रवेशामुळे म्हणजे नांदेड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची मुक्ततेकडे वाटचाल सुरु झाली आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मराठी वाचकांचा टक्का वाढल्यासारखा मला दिसतो. कारण ग्रंथविक्री विक्रमी झाली...' अनेक नवोदित कवी, लेखक नवनवीन साहित्य लिहून मोलाची भर घालताहेत. तरीही मला वाटतं की अजून उत्तमोत्तम, कसदार साहित्य निर्माण व्हावं. त्या साहित्याच्या वाचनाने नवीन पिढ्या समृद्ध व्हाव्यात. हे साहित्य संस्कार देणारं असावं, जगणं शिकवणारं असावं. सामान्य माणसांच्या आयुष्याशी निगडित गोष्टींची चर्चा साहित्यात व्हावी. त्याला त्यापासून मार्गदर्शन मिळावं. सामान्य रसिक वाचक केंद्रस्थानी ठेवून लेखक, कवींनी लिहितं व्हावं. मराठी मातीत जन्मलेले अनेक सुपुत्र अनेक उच्च पदांवर काम करत आहेत. कोणी शास्त्रज्ञ, कोणी प्राध्यापक इ. पण यातली बरीचशी मंडळी इंग्रजीत लेखन करण्यात धन्यता मानतात. त्यांनी आपले विचार सर्वसामान्यांसाठी मराठीत मांडावे... ' ' शासनाकडून मला फार अपेक्षा नाहीत. माझ्या अपेक्षा तुमच्यासारख्या माझ्या सुपुत्रांकडून आहेत. वाचक, लेखक, कवी यांनी मला समृद्ध करावे ही माझी अपेक्षा. साहित्य संमेलने व्हावीत ती तुम्हा सगळ्या रसिक वाचक, लेखकांच्या बळावर असे मला वाटते. त्यात उत्स्फूर्तता हवी, बळजबरीचा रामराम नको... ! बाळा, माझ्या मनातलं सांगितलं तुला. खूप काही बोलण्यासारखं आहे. पण सगळं सांगण्यातही अर्थ नसतो. समोरच्या व्यक्तीनं सुद्धा समजून घेतलं पाहिजे तरच सांगण्याला, बोलण्याला काही अर्थ उरतो. बाळा, घेशील ना मला समजून...? ' तिचे डोळे पाणावले होते. उरात हुंदका दाटून आला होता. मी तिच्या चरणांना वाकून स्पर्श केला. माझ्याजवळही आता शब्द नव्हते. मी फक्त एवढंच म्हटलं, ' आई, पाठीवर हात ठेवून फक्त लढ म्हण...' तिचा मोरपिशी हात पाठीवरून फिरला. काय नव्हतं त्या स्पर्शात ! ज्ञानोबा, तुकोबा, सावरकर, कुसुमाग्रज आदी सर्व मराठी सारस्वतांचे आशीर्वाद त्यात सामावले होते. मी भारावून वर पाहिलं, तर माऊली अदृश्य झाली होती. गोदामाई शांततेत वाहत होती. माईला मनोमन नमस्कार केला. तिची मूक संमती घेऊन मार्गस्थ झालो. दिव्यांनी रस्ते उजळले होते आणि तारकांनी आकाश... !






## आनंदी पहाट

### आनंदानुभूतीची प्रचिती व्यक्तीसापेक्ष

आधुनिक केसरी

प्रत्येकाची बालपणापासूनच स्वतःच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, सामाजिक विकासासाठी, कौटुंबिक उन्नतीसाठी, आर्थिक विकासासाठी धडपड सुरु असते. प्रत्येकजण यशप्राप्तीच्या दृष्टीकोनातून सतत प्रयत्न करत असतो. व्यक्तिगत गरजा, कौटुंबिक जबाबदाऱ्या, भविष्यासाठी तरतुदी इत्यादी अनेकविध कारणांसाठी प्रत्येकाचाच कस लागत असतो. अर्थात ह्या प्रयत्नांत काही सफल होतात, तर काहींना अधिक प्रयत्न करत राहावं लागतं. प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या प्रत्येकाला यश मिळतंच; फरक इतकाच कि, काहींना ते ओंजळभर मिळतं, तर काहींना रांजणभर. त्या यशापेक्षाही मिळणारा आनंद मोठा आणि महत्वाचा असतो, हे समजून घेणं आवश्यक आहे. ह्या यशप्राप्तीसाठी प्रत्येकाला निरनिराळ्या प्रकारचा संघर्ष देखील करत राहावा लागतो. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर निराळा संघर्ष असला तरीही प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणांत करावाच लागतो. संघर्षाचं स्वरूप वयोगटानुसार बदलत जातं. बालपणीचे संघर्ष अनेकदा शारीरिक / प्राकृतिक स्वरूपाचे असतात. तरुणांना मानसिक आणि आर्थिक पातळीवर संघर्षांचा सामना करावा लागतो. वृद्धोपकाळांत हे संघर्ष स्वास्थ्यासाठी / आयुरारोग्य लाभण्यासाठी करावे लागतात. थोडक्यात, संघर्ष नाही असा माणूस सापडणे विरळाच. प्रत्येक संघर्षाला धीरानं आणि चिकाटीनं तोंड देऊन त्यांवर मात करणं, यश आणि आनंद प्राप्त करणं जरुरीचं असतं. गरज असते वैचारिक बैठकीत स्वतःचा समावेश करण्याची, सकारात्मक विचारांचं आदान-प्रदान करण्याची. त्यासाठी यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचं दर्शन घडवणारी व्यक्ती भेटणे आवश्यक असतं आणि अशी व्यक्ती भेटणे उपयुक्त देखील ठरतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## बदल...

आधुनिक केसरी

बदल स्वतःत घडवणं वाटतं तेवढं सोपं नाही. दुसऱ्यात बदल घडवताना आधी स्वतःत बदल केला तर अधिक सोपं होतं. ज्याप्रमाणे पिवळा चष्मा लावला तर जग पिवळ दिसतं. काळा चष्मा लावला तर दिवस मावळला असं वाटतं. म्हणजेच सगळं संपलं.. तसंच बदलाचं आहे. आपण बदललं की जग आपोआप बदलल्याचं आपल्या लक्षात येतं. सात्विक आणि तामसी मित्र बाहेर पडले. तर सात्विकला सगळं जग सुंदर दिसतं .आणि तामसीला सगळं जग खोटं, कुरूप वाटतं. जग आहे तसंच आहे फक्त दोघांचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. तेव्हा आपण सुद्धा सात्विक दृष्टी ठेवून जगाकडे पाहू तर आपल्यालाही जग प्रेमळ दिसेल. नाहीतर जसं आपलं मन तसं जग दिसेल. प्रेमळ, खोटं, बेगडी, बदमाश, मतलबी, स्वार्थी, मदत, निर्मळ, स्वच्छ, निर्भेळ असे लोक आहेत पण ,आणि नाही पण. वेळ काळानुसार आपण काही बदल स्वीकारले पाहिजे. पिढीतील अंतर लक्षात घेऊन चांगले संस्कार जरूर करावेत. पण काही बदलही आवश्यक असतात ,ते आपण आनंदाने स्वीकारले तर कोणालाच त्रासदायक होत नाही. बदल फक्त आपल्या सोयीनुसार करू नका. तर घरातील इतर सदस्यांचा पण विचार करा. सगळ्यांना सोयीस्कर होतील असेच बदल करा. नसेल करता येत तर स्वतः बदला. सर्व जगासाठी काय बदलायचे ते बदला. पण आईसाठी तिची मुलंच राहा.आई आणि मुलं हे नातं कधीही बदलू नका. तिचं वय झाल्यावर तिची आई व्हा. हा बदल तिच्यासाठी केलात तर तो सुखकारकच होईल. हवाबदल जसा आरोग्यासाठी गरजेचा असतो ,तसाच स्वभाव बदल पण आरोग्यासाठीच खूप महत्त्वाचा आहे. स्वभाव नितळ स्वच्छ असेल तर सगळे बदल सहज घडू शकतात. बदल घडवा पण बदला कधीच कोणाचा घेऊ नका. बदल प्रत्येकाला हवा असतो. पण तो चांगला.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.36

## बोलका शंख

आधुनिक केसरी

एका साधूने तीन शंख एका मुलापुढे ठेवले. यातला एक शंख तू घे, असं तो मुलाला म्हणाला. त्यामुळे मला काय मिळेल, मुलाने विचारलं. ते तू त्यांनाच विचार. शंखांना काय विचारणार, मुलाला प्रश्न पडला. त्याच्या खिशात एक रुपयाचं नाणं होतं. ते त्याने एका शंखात टाकलं. शंखातून एक रुपयाची दोन नाणी बाहेर आली. मुलाचे डोळे विस्फारले. दुसऱ्या शंखात त्याने एक नाणं टाकलं. एक रुपयाची तीन नाणी त्यातून बाहेर आली. मुलाने तिसरा शंख उचलला. त्यामध्ये नाणं टाकणार होता आणि शंखाने विचारलं, किती रुपये हवेत तुला... मुलाने ताबडतोब सांगितलं हाच शंख मला हवा. साधूने पहिले दोन शंख समुद्रात फेकून दिले. बोलका शंख घेऊन मुलगा घरी आला. शंखाची पूजा करून तो म्हणाला, मला एक लाख रुपये हवेत. शंख म्हणाला, त्या पैशाचं तू काय करणार... मी घर घेईन, मुलगा म्हणाला. एक लाख रुपयात एक घर आलं की पैसे संपतील की, शंख म्हणाला. हं, असं कर मला दहा लाख रुपये दे, मुलाने दुसरी मागणी केली. ते तरी किती दिवस पुरतील, शंखाने विचारलं. दोन वर्षं जातील की, मुलगा म्हणाला. पण त्यानंतर...शंखाने प्रश्न केला. खरंच की, दोन वर्षांनंतर काय करणार....मुलाने विचार केला. असं कर की माझी अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सची कर, मुलगा म्हणाला. या मागणीत काही दम आहे, शंखाने त्यांचं कौतुक केलं आणि विचारलं, पण चीन, अमेरिका यांच्या अर्थव्यवस्था किती ट्रिलियन डॉलर्सच्या आहेत, याची चौकशी कर की. मुलगा म्हणाला, हो तेही खरंच. मी करतो चौकशी पण तूर्तास पाच ट्रिलियन डॉलर्स ची अर्थव्यवस्था तर होऊ दे. मी बोलका शंख आहे, देणारा नाही, शंखाने वस्तुस्थिती सांगितली. मुलाला धक्काच बसला, तू देणारा नाहीस ....त्याने आश्चर्याने विचारलं. देणारे पहिले दोन होते, मी बोलका शंख आहे, बोलका शंख उत्तरला. हसू नका, गेली दहा वर्षं भारतीय मतदार बोलक्या शंखाला निवडून देत आहेत. आता फक्त हसु नका, कृती करा आणि हाकलायची तयारी करा या बोलक्या शंखांना अन्यथा तुमच्या सर्वनाशास तुम्हीच जबाबदार असणार आहात, त्यासाठी कुठलाही साधु तुम्हाला सांगायला येणार नाही.

## निरूपण


आधुनिक केसरी

पोटफुगी आणी तडस । भरला हिर लागला घांस ।
फोडी लागतां कासावीस । या नांव आध्यात्मिक ॥ ३२ ॥
उचकी लागली उसित गेला । पीत उसळलें उलाट झाला ।
खरे पडसा आणी खोंकला । या नांव आध्यात्मिक ॥ ३३ ॥
उसळला दमा आणी धाप । पडजिभ ढासि आणी कफ ।
मोवाज्वर आणी संताप । या नांव आध्यात्मिक ॥ ३४ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रकृति योग में ज्ञान जो,
सो जानहु अज्ञान ।
जड़ संयुत दुख सुख रहै, चेतन धर्म है
आन ।।५८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/५८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : आत्म्याला अज्ञान अवस्थेत प्रकृती संबंधी जे ज्ञान होते ते अज्ञान आहे. प्रकृतीच्या संबंधामुळेच आत्म्याला सुख-दुःख होते, त्यात शुद्ध ज्ञान प्रगट होऊ शकत नाही. आत्म्याचे शुद्ध ज्ञान भिन्न आहे, जे प्रकृती आधार सुटल्यावर शुद्ध ब्रह्माच्या दिव्य प्रकाशात प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## अनुमान निरसन

आधुनिक केसरी

गणेश जयंती व काल झालेली माता सरस्वती प्रगटदिन वसंत पंचमी निमित्ताने सर्व देवदेवतांना विनम्र अभिवादन करून व समर्थांना वंदन करून समासाच्या अभ्यासाकडे वळूया. गुरू शिष्य संवादात कोणते प्रश्न विचारले ते आता सांगते . १ )चंद्राचं मन कसे आहे? ऊत्तर--निर्मळ २ ) ब्रम्हदेवाच्या बुध्दीचे लक्षण काय? ऊत्तर-- अचाट व प्रखर बुद्धिमत्ता. ३ )रूद्राचा अहंकार कशा स्वरूपाचा असतो. ऊत्तर---तुमचे मन निर्मळ असेल वागणे बोलणे चालणे अहंकार विरहीत असेल तर अतिशय विशाल अंतःकरणं व भक्तांच्या कल्याणासाठी सदैव धावून येणारा तो रूद्र शिवशंकर, शंभू महादेव ४ )नारायणाचे चित्त कसे असते. ऊत्तर -- सतत आपल्या परमात्म्याच्या ठिकाणी एकचित्त असणारा नारायण त्याच्या शिवाय दुसरा कोणी असु शकत नाही. आपल्या सभोवार निर्मळ मनाने प्रेम करा ? हा संदेश देणारा तो नारायण.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निर्हेतुक कर्मात भगवंत

आधुनिक केसरी

खरोखर, आज आपल्याला आपले अंतरंग ओळखण्याची खरी गरज आहे. सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, हेतूवर सर्व काही अवलंबून असते. पुष्कळ पुण्यकर्मे केली, आणि काही तरी विषयाचा हेतू मनात धरला, तर काय उपयोग ! काबाडकष्ट खूप केले, बायकोपोरे टाकून बाह्यांगाने कितीही केले, तरी मन जोपर्यंत तिथे नाही तोपर्यंत राम नाही भेटणार. मनाला भगवंताची तळमळ लागली तरच त्याचा उपयोग. निर्हेतुक कर्मात भगवंत असतो, म्हणून आपली कर्मे तशी करावीत. खरे पाहता प्रापंचिकाएवढे काबाडकष्ट साधकाला, पारमार्थिकाला नसतात. प्रपंचाच्या काबाडकष्टांपेक्षा निम्म्याने जरी भगवंताकरिता केले तरी खूप फायदा पदरात पडेल. ज्या स्थितीत भगवंताने आपल्याला ठेवले त्या परिस्थितीतून त्याला ओळखणे सहज शक्य आहे. पण आपण विषयाकडे दृष्टी ठेवून कर्मे करतो, आणि भगवंत भेटत नाही म्हणून दुःखी होतो, याला काय करावे ? दैत्यदानवांनी भगवंताची तपश्चर्या केली, आणि समर्थांनीही केली; दानवांनी हेतू धरून केली त्यामुळे त्यांना



हेतूचा, विषयाचा लाभ झाला, परंतु भगवंत अंतरला; याउलट, समर्थांना भगवंताशिवाय दुसरा कशाचाही लाभ नको होता. त्या लाभातच त्यांनी सर्वस्व मानले. उत्कट प्रेमामुळे भगवंताचा ध्यास लागतो. भगवंताला पाहून 'तू भेटलास, आता मला काही नको', अशी वृत्ती झाली पाहिजे, तरच मीपणा मरेल. भगवंताचा हात तर पुढे आहेच; आपलाच हात त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. बुद्धीपेक्षा आणि पैशापेक्षा सदाचरणाचे वजन जास्त असते. सदाचरण असून भगवंताची निष्ठा असेल, आणि आहे त्या परिस्थितीत समाधान ठेवण्याची सवय असेल, तर प्रापंचिक सुख लाभते. सुख हे कुठून उत्पन्न करायचे नसून ते आपल्या वृत्तीमध्येच असते. 'मी' भगवंताचा आहे, तसेच 'सर्वजण' भगवंताचे आहेत. म्हणून भगवंतावर प्रेम केले की सर्व जगावर प्रेम बसेल. ज्याप्रमाणे भगवंताच्या प्रसादामध्ये एखादा कडू बदाम आला तरी तो आपण खातो, त्याप्रमाणे भगवंताने एखादे वेळी दुःख दिले तर ते आनंदाने सोसायला पाहिजे. चिकित्सा थोडी बाजूला ठेवून भगवंताचे आपण स्मरण करावे. अंतःकरणाची शुद्धी नामाशिवाय नाही होणार. नामापरते काही नाही हे एकदाच ज्याच्या मनाने घेतले त्याला दुसरे काही सांगावे नाही लागत. मीठ म्हणून जरी साखर खाल्ली तरी साखरेची गोडी आल्याशिवाय राहात नाही; त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जरी नाम घेतले तरी ते आपल्याला तारकच ठरेल यात शंका नाही.

**५३. ज्याच्यामागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो.**

## जंगली महाराज

आधुनिक केसरी

बगाड या अघोरी प्रकाराऐवजी महाराजांनी गळ्यात वीणा घेऊन देवापुढे अखंड हरिनामाचा पहारा सुरू केला. रेड्यांच्या झुंजींऐवजी जंगली महाराजांनी मल्ल्यांच्या कुस्त्या सुरू केल्या. मंदिरात आजही 'पहारा' होतो आणि जवळपासच्या तालमींमध्ये बलोपासना चालते. जंगली महाराजांनी १८८१ साली स्थापन केलेले सद्गुरू जंगली महाराज भजनी मंडळ आजही कार्यरत आहे.



# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १८ फेब्रुवारी २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १८०

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 18 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-180 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05


# गांधी-नेहरू विचारधारा संपवण्यासाठी भाजपाकडून नेहरूंवर सातत्याने टीका

## रमेश चेन्नीथला : लोणावळ्यातील राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराची सांगता

आधुनिक केसरी न्यूज



**लोणावळा : नरेंद्र मोदी व भाजपा लोकशाहीला संपवण्यासाठी बसले आहेत. लोकसभा निवडणुकीत मोदी पुन्हा सत्तेत आले तर अनेकांना जेलमध्ये जावे लागले. कारण ते लोकशाही, संविधान काहीच मानत नाहीत. आता आपल्यासमोर करा किंवा मरा अशी परिस्थिती आहे. पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर भाजपा व नरेंद्र मोदी सातत्याने टीका करत असतात त्यामागे गांधी-नेहरुंची विचारधारा संपवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे असे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले आहेत.**


लोणावळ्यातील दोन दिवसाच्या राज्यस्तरीय शिबिरात समारोपाचे मार्गदर्शन करताना चेन्नीथला पुढे म्हणाले की, लोकसभेच्या निवडणुकीसाठी फार कमी वेळ राहिला आहे. आता निवडणुका सायंटिफिक पद्धतीने लढवल्या पाहिजेत यावर चर्चा झाली आहे. बुथ मॅनेजमेंट हे सर्वात महत्वाचे आहे. इंडिया आघाडीला सत्तेत आणण्यासाठी काम केले पाहिजे आणि राज्यातून ४८ जागा जिंकण्याचे लक्ष ठेवा. तसेच पक्षात शिस्त असली पाहिजे. कोणी काहीही बोलावे हे चालणार नाही. एनएसयुआय, युवक काँग्रेस, फ्रंटल सेल त्यांच्याही प्रदेश स्तरावर बैठका झाल्या पाहिजेत.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, लोणावळ्यात दोन दिवसाच्या शिबिरातून चांगले बौद्धीक व वैचारिक मंथन झालेले आहे. काँग्रेसचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान बाळगून काम करा. काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यात एकजूट असला पाहिजे. सर्व सेल, फ्रंटल संघटना सर्वांनी सोबत असले पाहिजे. पक्षाच्या अजेंड्यावरच सर्वांनी काम केले पाहिजे व काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या अजेंड्यानुसारच काम करा आणि लोकसभेची लढाई जिंकायची आहे हा संकल्प घेऊनच जा. आता आपल्याकडे वेळ नाही, युद्ध पातळीवर काम करायचे आहे. भाजपा कसे खोटे बोलत आहे, जनतेची फसवणूक करत आहे हे लोकांमध्ये जाऊन सांगा, कुठेही कमी पडू नका. आघाडीला विजयी करुन भाजपाचा पराभव करावा लागणार आहे. वातावरण काँग्रेस व मविआच्या बाजूने आहे. नरेंद्र मोदींच्या सत्तेचे दरवाजे महाराष्ट्र बंद करु शकतो, हे लक्षात घ्या असे सांगत शेवटी नाना पटोले यांनी "तुम मुझे आंधीओंका डर बताते हो, मैं तो तुफानों से बगावत कर के आया हूँ". हा शेर ऐकवून भाषण संपवले.काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, काँग्रेसची पिछेहाट झालेली नाही तर तत्वज्ञानाची पिछेहाट होत आहे, शिबीरे कमी झाली म्हणून विचाराची पिछेहाट झाली आहे. आपल्याकडे परंपरा, तत्त्वज्ञान, विचार, काँग्रेस सरकारने केलेले काम आहे, काँग्रेसने देशासाठी बलिदान दिले आहे आपण काँग्रेस पक्षाचे आहोत याचा अभिमान असला पाहिजे. लोकसभेच्या निवडणुकीसाठी आपल्याकडे फारसा वेळ नाही. आघाडी करून निवडणुका लढवल्या जाणार आहोत. उमेदवार कोणीही असला तरी लक्ष्य एकच आहे ते म्हणजे भाजपा व नरेंद्र मोदी सत्तेवर राहता कामा नये ते देशासाठी हिताचे नाही.

# राष्ट्रवादीची स्थापना कुणी केली सर्वांना माहीत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आमच्याकडून कोणतेही भावनिक आवाहन करण्यात येणार नाही.



बारामती मतदारसंघात वर्षीनुवर्षे लोक आम्हाला ओळखतात. त्यामुळे आम्हाला काही भावनिक आवाहन करण्याची गरज वाटत नाही. परंतु, विरोधकांची भाषण करण्याची पद्धत काहीतरी वेगळंच सुचवत आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार बारामती प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले. पवार पुढे म्हणाले की, पक्ष संदर्भात विधानसभा अध्यक्षांकडून असा निर्णय होईल अशी खात्री होती. विधानसभेच्या अध्यक्षांनी त्यांच्या पदाची प्रतिष्ठा ठेवली नाही आणि ती ठेवतील असही वाटत नव्हतं. दोन्ही बाजूंची पात्रता अशा प्रकारचा निर्णय त्यांनी आधी देखील घेतला होता. शिवसेनेबाबत जो निर्णय घेतला होता त्याच निर्णयाची पुनरावृत्ती केली. पक्ष आणि चिन्ह या दोन्हींची भूमिका निवडणूक आयोग आणि अध्यक्षांनी घेतली. आमच्या मते आम्हा लोकांना न्याय मिळाला नाही. यात पदाचा गैरवापर कसा होतो हे यातून दिसून आले. आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये गेलो आहोत. विधानसभा अध्यक्षांचा निकाल आम्हा लोकांना न्याय देणारा नाहीच आहे, पण पदाचा गैरवापर कसा होतो याचे उदाहरण देशासमोर देण्यासंबंधीचा हा निर्णय आहे. आणि त्याला पर्याय आम्ही सुप्रीम कोर्टात हे प्रकरण दाखल केलेले आहे. आमची सुप्रीम कोर्टाला विनंती असणार आहे की, निवडणुका जवळ आल्या असल्याने लवकरात लवकर निर्णय द्यावा, असे पवार बोलताना म्हणाले आहेत. पुढे शरद पवार म्हणाले की, पक्षातून लोक सोडून जातात, नवे येतात. या गोष्टी घडत असतात, मात्र असे कधी घडलेले नाही की, ज्याने पक्ष स्थापन केला त्याचा पक्षच काढून दुसऱ्याला दिला. नुसता पक्षच दिला नाही तर चिन्हही देऊन टाकले. ठीक आहे, हा निर्णय कायद्याला धरुन आहे असे वाटत नाही. त्यामुळे आम्ही सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्याचा निकाल नीट लागेल अशी अपेक्षा आहे. दुसरे एक महत्त्वाचे तुम्हाला सांगतो चिन्ह गेले तरीही त्याची चिंता करायची नसते. मी आत्तापर्यंत १४ निवडणुका लढलो त्यातल्या पाच निवडणुकांमध्ये चिन्हे वेगवेगळी होती.

# डॉ. पी. डी. पाटील : साहित्य-संस्कृतीला विकासाशी जोडणारे शिक्षणतज्ज्ञ

आधुनिक केसरी न्यूज

**डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती व पिपरी-चिंचवड येथे झालेल्या ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, डॉ. पी. डी. पाटील यांचा आज ७१ वा वाढदिवस. आपल्या कार्यकर्तृत्वाने, कुशल नेतृत्वाने शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या डॉ. पी. डी. पाटील उर्फ 'पीडी' सर यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...**

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या माध्यमातून आजवर लाखो विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करणारे 'पीडी' शिक्षणतज्ज्ञ म्हणून संपूर्ण देशाला सुपरिचित आहेत. शिक्षण, साहित्य व संस्कृतीची नगरी अशी पुण्याची ओळख. तर पुण्याचे जुळे शहर असलेल्या पिंपरी-चिंचवडला ज्ञानोबा-तुकोबांच्या वारकरी परंपरेचा अध्यात्मिक वारसा लाभल्याचे सर्वज्ञात आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील उद्योगधंद्याच्या उभारणीमुळे हा परिसर उद्योगनगरी, पुढे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनात खूप परिवर्तने झाली. जागतिकीकरणामुळे दळणवळण प्रचंड प्रमाणात वाढले. भांडवलाचा ओघ वाढू लागला. माहिती तंत्रज्ञानाचे उद्योग पुण्यात आणि त्यातही पिंपरी-चिंचवड परिसरात अधिक विस्तारले. पुण्यातून या भागात स्थलांतरही वाढले. त्यामुळेच शैक्षणिक-सांस्कृतिक आणि औद्योगिक अशी या शहरांची विभागणी कालबाह्य झाली असल्याचे पहिल्यांदा कुणाच्या लक्षात आले असेल तर, ते आहेत डॉ. पी.डी. पाटील. कष्ट आणि यातना पिंपरीतील डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठ तसेच संबंधित अन्य शिक्षणसंस्थांचा आजचा विस्तार, वैभव आणि लौकिक देशभर आणि जगभर असला तरी या संस्था उभ्या करण्यामागचे 'पीडी' सरांचे कष्ट आणि यातना नव्या पिढीला कदाचित दंतकथा वाटतील अशा आहेत. जागतिकीकरण होण्याच्या आधीच ऐंशीच्या दशकात तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रात खासगी शिक्षणसंस्थांना प्रोत्साहन द्यायला सुरवात केली होती. वसंतदादांच्या या पुढाकाराला प्रतिसाद देत डॉ. पी.डी. पाटील यांनी ४० वर्षांपूर्वी पिंपरीत इंजिनिअरींग कॉलेजपासून श्रीगणेशा केला. एक चळवळीत, प्रवाहात पी.डी. सरांनी धिटाईने उडी घेतली होती. 'रक्ताचे पाणी करणे' हा वाक्प्रचार त्यांना तंतोतंत लागू होईल, इतके श्रम पी.डी. सरांनी त्यावेळी घेतले. अक्षरशः रात्रीचा दिवस करत काम केलं. संस्था स्थापन केल्या आणि चिकाटीनं वाढवत नेल्या. कठीण परिस्थितीत ते खंबीर राहिले. कष्टांवर त्यांचा प्रामाणिक विश्वास होता. शेतकरी पण उच्चशिक्षित कुटुंबातून आल्याने सामाजिक जाणिवा, जबाबदाऱ्यांचे त्यांना भान होते.

मुळचे सांगली जिल्ह्यात जन्मगाव असलेले डॉ. पी. डी. पाटील दापोडीत शिकले आणि मोठे झाले. तीच त्यांची कर्मभूमी. त्याप्रती आपण काही देणे लागतो, या भावनेतून पुण्याच्या या जुळ्या शहराला पुण्याइतकेच शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र करता येईल, हे त्यांनी हेरले. त्याप्रमाणे त्यांनी वेगवेगळ्या संस्थांच्या उभारणीस सुरवात केली. शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून केवळ पदव्या देण्याचा संकुचित दृष्टिकोन 'पीडीं'नी कधीच बाळगला नाही. शहरीकरणाकडून आणि आनुषांगिक सांस्कृतिक ऱ्हास या समस्या फक्त पुणे किंवा पिंपरी-चिंचवड शहराच्या नसून त्या वर्तमान युगातील आहेत. एकविसाव्या शतकात तर या प्रश्नाने अधिकच गंभीर आणि जटिल स्वरूप धारण केले आहे. शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून अशा प्रश्नांची सोडवूणक करुन बदल घडविणाऱ्या मातब्बरांमध्ये पी. डी. सरांचा समावेश होतो. आजवरच्या वाटचालीत पी. डी. सरांचा असंख्य लोकांशी संपर्क आला. प्रत्येकाला त्यांच्या व्यक्तिमत्वामधील वेगळेपण जाणवले. 'डॉ. पी. डी. पाटील यांच्या संकल्पनेतून स्थापन झालेले डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आजच्या तरूणांच्या स्वप्नांना ताकद देत आहे.', असे उद्गार दिवंगत माजी राष्ट्रतपी डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी पुण्यात काढले होते. ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे 'पीडीं'विषयी म्हणतात, '८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी 'साहित्य संचित' हा बहुमोल ग्रंथ प्रकाशित केला. ज्यामध्ये भारतीय भाषांमधील ११ ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांच्या मुलाखती आहेत. पुस्तकांच्या विक्रीसाठी गाळ्यांच्या आलेल्या भाड्यात स्वतःची रक्कम टाकून हा निधी त्यांनी आत्महत्या केलेल्या दुर्दैवी शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी हा निधी वाटला; शेतकऱ्याचा मुलगाच इतका परहितदक्ष होऊ शकतो.' 'डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने पीडींच्या नेतृत्वात शिक्षण व वैद्यकीय विज्ञान ही मानवी सेवा केली असल्याचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न प्रा. सी. एन. आर. राव म्हणतात. तर 'डॉ. पी. डी. पाटील यांच्या संकल्पनेतून साकार झालेले हे विद्यापीठ एक अनुकरण करण्यायोग्य शैक्षणिक मॉडेल असल्याचे पद्मविभूषण, शास्त्रज्ञ डॉ. के. कस्तुरीरंगन उल्लेख करतात. पीडी सरांना गेल्या ४० वर्षांपासून ओळखत असून, अतिशय कष्टातून त्यांनी संस्थांची उभारणी केली आहे. त्यांचा हा प्रवास प्रेरक आहे. उत्तम दर्जाचे रुग्णालय त्यांनी पिंपरीत उभारले. अमेरिकेतील प्रसिद्ध सर्जन रॉबर्ट नैस्मिथ यांनी डी. वाय. पाटील रुग्णालयाला भेट दिली. त्यांनी याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना माहिती दिल्यानंतर बायडन यांनी नैस्मिथ यांना भारतात काम करण्यास सुचवले. हे डॉ. पी. डी. यांचे यश असल्याचे अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मॅक जावडेकर नमूद करतात. पीडींसारखा मित्र मिळणे भाग्य आहे. उच्च दर्जाचे शिक्षण देण्यामध्ये शिक्षणतज्ज्ञ असलेल्या पीडींचे नाव भारतात अग्रस्थानी आहे. उच्च शिक्षणातील गुणवत्तेची मानांकन त्यांनी सेट केले आहेत, असे शिक्षणतज्ज्ञ डॉ. वेदप्रकाश मिश्रा म्हणतात.

जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणतात, डॉ. पीडी पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात उज्वल भविष्य घडवण्यासाठी आपले प्रयत्न समर्पित केले आहेत. शिक्षण, साहित्य, समाजसेवा, अध्यात्म अशा अनेक क्षेत्रात त्यांनी भरीव काम केले आहे. ते एक प्रतिष्ठित मानवतावादी असून, उत्कृष्टता आणि प्रासंगिकता हे त्यांच्या शैक्षणिक आस्थापनांचे वैशिष्ट्य आहे. डॉ. स्मिता जाधव यांचा जन्मदिन आणि लीडरशीप डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव असलेल्या डॉ. स्मिता जाधव यांचाही १७ फेब्रुवारी हा जन्मदिन आहे. स्मिताताई आणि त्यांचे वडील पी. डी. पाटील यांची जन्मतारीख एकच आहे. मराठीत याला दुग्धशर्करा योग म्हणतात. हा अपूर्व योगायोग ईश्वराने जुळवून आणला आहे. पी. डी. सरांच्या खांद्याला खांदा लावून स्मिताताई विद्यापीठाच्या कामकाजात सहभागी असतात. देशातील प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक असलेल्या विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू म्हणून डॉ. स्मिता यांची कामाची धडाडी कुणीही हेवा करावा, अशीच आहे. 'व्हिजनरी यंग लीडर' म्हणून त्यांची गणना देशातील शैक्षणिक क्षेत्रात होऊ शकेल. एकविसाव्या शतकातील शिक्षणाचा केंद्रबिंदू आता तरुण आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांची शैक्षणिक लीडरशीप या काळाला साजेशी आहे. त्यांनी कामकाजात सर्वसमावेशकता आणि नाविन्यपूर्णतेचा एक नवीन दृष्टीकोन आणला आहे. त्यांचा गतिशील दृष्टीकोन आणि विद्यापीठाशी असलेले अतूट समर्पण विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांसाठी सारखेच प्रेरणादायी आहे. पिंपरी आणि परिसरातील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि संलग्न शिक्षणसंस्था सप्रवृत्तीच्या पी. डी. पाटील सरांनी प्रयत्नातून आणि त्यांच्या स्फूर्तीतून उभ्या राहिल्या. 'प्रसाद' हे सरांचे पहिले नाव. या संस्था म्हणजे त्यांची 'प्रसादचिन्ह' आहेत. ज्या मूर्तस्वरूपात आपल्याला दिसताहेत. शतायुषी होऊन या संस्थांची पुढची वाटचाल त्यांनी पाहण्यासाठी असं दीर्घायुष्य त्यांना लाभावं ही सदिच्छा!



**साहित्य संमेलनाचा 'टर्निंग पॉइंट' :** आध्यात्म आणि उद्योग यांना साहित्य-कला व्यवहारांची अर्थात सांस्कृतिक समृद्धीची जोड देणे हे ते आपले कर्तव्य मानतात. 'साहित्यात जग बदलण्याची ताकद आहे' असा या स्पष्ट जाणिवेचा स्पष्ट उच्चार पी. डी. करत असतात. म्हणूनच त्यांनी पिंपरी-चिंचवड शहरात सर्वप्रथम अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवले. या साहित्य संमेलनाने साहित्य संमेलनांच्या नियोजनाचा वस्तुपाठच घालून दिला असे म्हणण्यात काहीही अतिशयोक्ती नाही. साहित्य संमेलन ही काही कोणाला तरी मिरवण्यासाठी 'मॅनेज' करण्यात येणारा 'इव्हेंट' नाही. ते 'येऱ्या गबाळ्याचे' काम नाही. तेथे 'जातीचे'च पाहिजे, हा धडा या संमेलनाने दिला. पिंपरीचे साहित्य संमेलन त्यांच्या आयुष्यातील आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट' होताच; परंतु तो पिंपरी-चिंचवड शहराच्या इतिहासातीलही 'टर्निंग पॉइंट' ठरला. औद्योगिकीकरणामुळे शहरीकरण झाले आणि वाढत्या शहरीकरणामुळे साहित्य आणि संस्कृती टिकणार नाही, अशी भीती व्यक्त करण्यात येऊ लागली. ही भीती निरर्थक कशी ठरवायची हे पीडींनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. पी. डी. यांची ही कृती भौगोलिक अर्थाने पिंपरी-चिंचवड शहरामधील असली तरी तिचे परिणाम मात्र व्यापक आणि दूरगामी आहेत. साहित्याशी संबंध केवळ मिरवण्यापुरताच असे पी.डी. किंवा डी. वाय. पाटील विद्यापीठाबद्दल म्हणता येत नाही. सरांनी गेल्या आठ वर्षांच्या काळात अनेक साहित्यविषयक उपक्रम आणि आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर साहित्याचे होणारे परिणाम समजून घेतले. या प्रक्रियेत ते सक्रिय भूमिका बजावत राहिले. जानेवारी २०२३ मध्ये त्यांनी डी. वाय. पाटील विद्यापीठात १८वे जागतिक मराठी संमेलन भरवले. महाराष्ट्राच्या आणि भारताच्या संस्कृतीला जगाशी जोडून घेण्याचा त्यांचा हा दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे.


# छत्रपती शिवाजी महाराज आणि वर्तमान



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**शिवरायांचा कोणत्याही अलंकारिक भाषेशिवाय वेध घेणे आणि समकालीन परिस्थितीत त्यांचे विचार, कृती आणि भविष्यातील स्वप्नांचा त्यांचा दृष्टिकोन समजून घेणे आज नितांत आवश्यक बनले आहे. कारण छत्रपतींच्या काळात ज्या प्रकारची अनागोंदी माजलेली होती आणि रयत भ्रमित झाली होती, अगदी तीच तंतोतंत अवस्था आज आपण अनुभवत आहोत. संस्कृती, राजकारण, भाषा, सामाजिक असहिष्णुता, पराकोटीची स्वार्थी वृत्ती आणि बरेच काही ह्या आपल्या काळातील ठळक नोंदी. शिवाजी महाराजांनी काही म्हंटले आणि सर्वांनी डोळे झाकून आज्ञा शिरसावंद्य मान्य केली असे झाले नाही. कारण समाज तुमच्या प्रामाणिक प्रयत्नांची नेहमीच परीक्षा घेत असतो.**



## क्षितिजापल्याड

त्याचा प्रामाणिक आणि कर्तृत्ववान नेतृत्वाचा शोध अव्याहतपणे चालूच असतो. हा शोध लागला नाही तर कोण्यातरी बाबा आणि बुवांच्या मागे समाज लागतो. त्याला निस्पृहता हवी असते. निस्पृह, सदाचारी आणि प्रामाणिक माणसे जग बदलू शकतात यावरील त्याची अविचल निष्ठा त्यास शोध घेण्यास भाग पाडते. अशाच गलितगात्र आणि पूर्णतः निराशाजनक वातवरणातूनच हे सर्व बदलण्याची क्षमता असलेले नेतृत्व पुढे येते. संकटाशिवाय साहस शिकता येत नाही आणि नवनिर्माणाशिवाय उत्कर्ष साधता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. शिवरायांच्या पूर्वीचा महाराष्ट्र पाहिला तर अगदी मौर्य सत्तेपासून ते मोगल काळापर्यंत आम्ही सामान्य माणसे कशासाठी जगतो आहोत ह्याचीच भ्रांत नव्हती. निव्वळ पोटार्थी असणे आणि दिवस ढकलणे याशिवाय तेव्हा आणि आत्तासुद्धा काहीच फरक नाही. म्हणून कोणीतरी अवतारी पुरुष येईल आणि आपणास जरा बरे दिवस येतील ही भाबडी आशा. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संपूर्ण समाज बदलल्याशिवाय चांगला माणूस निपजू शकणार नाही ही एक धारणा. खरेतर संपूर्ण समाज चांगला किंवा वाईट असा द्वैती कधीच नसतो. पण आम्हांस काळे आणि गोरे अशी विभागणी केल्याशिवाय चैन पडत नाही. किंबहुना अशा वर्गिकरणामुळे धूर्त राजकारण्यांचे फावते हे आपण विसरून जातो. मग आम्ही शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ कशी घेतली आणि आम्ही हिंदू म्हणून आजही कसे विखुरलेले आहोत अशी काहींशी मांडणी सुद्धा होत असते. पण हिंदवी स्वराज्य संकल्पना आणि हिंदूत्व यात खूप फरक आहे. संकुचित हिंदूत्व आणि सर्वसमावेशक हिंदवी स्वराज्य संकल्पना यात दृष्टिकोनाचा, आपलेपणाचा आणि स्वाभिमानाचा भाग आहे तर तथाकथित हिंदुत्वात कोणालातरी दूर ढकलण्याचा, सामाजिकतेपेक्षा राजकारणाचा आणि अधिकाधिक संकुचित होण्याचा गंध आहे. शिवाजी महाराजांचे आयुष्य आणि त्यांच्या कृती ह्या अत्यंत जाणीवपूर्वक अभ्यासल्या नाहीत तर कधी कधी मोठी अडचण होते आणि आकलन होऊ शकत नाहीत. दोन राज्याभिषेकाचे इतिहासलेखकांनी निर्माण केलेले काव्य इतिहासापेक्षा व्यंजना शब्दशक्तीयुक्त काव्यच भासू लागते.

राजाला लोकभावनेचा आदर करूनच काही निर्णय घ्यावे लागतात. सामाजिक हिताचे निर्णय कदाचित कोणाला न विचारता घेतले तर एखादे वेळी चालतील, परंतु व्यक्तिगत पातळीवर समाजगटाची मागणी म्हणून काही गोष्टी कराव्या



लागतात. यात तुम्हाला काय वाटते यापेक्षा लोकभावना महत्त्वाची असते, लोकसंस्कृती महत्त्वाची असते. आज संपूर्ण संस्कृतीवर एक प्रकारची मरगळ आली आहे, मळभ साचलेली आहे. जात, धर्म, उपासनापद्धती, लोकाचार, लोकचळवळी आणि राजकीय महत्वकांक्षा यामुळे एकप्रकारचा दुरावा समाजात निर्माण होत असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. हे चित्र बदलावे असे वाटत असेल तर शिवचरित्रातून आपण जाणीवपूर्वक काही गोष्टी घेतल्या पाहिजेत. शिवरायांनी जात, धर्म पाहून कोणावर काही कामगिरी सोपवली नाही तर त्या व्यक्तीच्या अंगी असलेली क्षमता पाहून त्याच्याकडून कार्य करून घेतले. केवळ अठरा पगडजातीतीलच नव्हे तर अन्य धर्मीय लोकही तेवढ्याच निष्ठेने कार्य करत होते. आज शिवाजी महाराजांचे नाव घेऊन जर कोणी हिंदू मुस्लिम असे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करत असतील तर जाणत्या लोकांनी हा बेत हाणून पाडला पाहिजे. कारण शिवरायांच्या स्वराज्य संस्थापनेत सर्वांनीच हातभार लावल्याचे इतिहाससिद्ध आहे. स्वराज्याच्या आड येणारा मग तो कोणीही असो त्याची गय महाराजांनी कधीच केली नाही. छोटे गुन्हे माफ केले की मोठे गुन्हे करण्याचे धाडस समोरचा व्यक्ती करत असतो. आज शासक म्हणून कोणती भूमिका असायला हवी हे यातून निर्देशित होते. हजारो कोटी रुपयांचा अपहार करणाऱ्या व्यक्तीला आपण अभय देत असू आणि तोही उजळ माथ्याने वावरत असेल तर आपणास शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा काहीएक अधिकार पोहचत नाही. केवळ भ्रष्टाचारच नव्हे तर महिलांवरील अत्याचार, दप्तर दिरंगाई, शेतकऱ्यांच्याप्रति असलेली भूमिका, सिंचनाचा प्रश्न या आणि अशा अनेक प्रश्नांचे उत्तर आपणास शिवचरित्रात नक्कीच सापडेल. या संदर्भात आपणास अनेक उदाहरणे देता येतील परंतु स्थलाभावी ते देता येणार नाहीत. महाराजांचे भाषेच्या बाबतीत सुद्धा अतुलनीय कार्य आहे. आज आपल्या भाषेवर परकीय भाषेचे जे आक्रमण होत आहे त्याला थोपवून मातृभाषेला कसे प्रोत्साहित करायचे याचे उत्तर आपणास राज्यव्यवहारकोश यामधून सापडेल. लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा मिळवून देण्याचा प्रश्न असेल किंवा अलीकडे शासन दरबारी पडून असलेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी पडून असलेला प्रस्ताव असेल. शिवचरित्र हे सूक्ष्मपणे अभ्यासून त्यातून या प्रश्नांची उत्तरे आपण मिळवू शकतो. अलीकडे शिवजयंती साजरी करणे म्हणजे कर्णकर्कश आवाजात गाणे वाजवणे, मद्यप्राशन करून धिंगाणा घालणे आणि सामाजिक सलोख्यास बाधा पोहचेल असे वातावरण निर्माण करणे असा आजची युवापिढी अर्थ काढताना दिसत आहे. हे वातावरण बदलायचे असेल तर शिवचरित्राचे वाचन झाले पाहिजे, त्यानुसार आपल्या वर्तनात सुधारणा केली पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपली संकुचित मानसिकता बदलली पाहिजे. तर आणि तरच शिवजयंती साजरी करण्यात काही अर्थ आहे, असे म्हणता येईल. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# लाल समुद्रातील अडचणीमुळे बासमतीची निर्यात प्रभावित



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**लाल समुद्रातील अडचणीमुळे देशातून बासमती तांदळाची निर्यात प्रभावित झाली, परिणामी बासमती तांदळाच्या भावात हलकीशी घसरण होताना दिसत आहे. मागील एका महिन्यात बासमती तांदळाच्या भावात ३ ते ४ टक्के इतकी घसरण दिसून आली. आगामी काळात हलकासा दबाव असला तरीही, भावात मोठी घसरण होईल असे वाटत नाही. लाल समुद्रातील अडचणी दूर होताच पुन्हा बासमती तांदळाचे भाव वाढू शकतात. खाद्यतेलाच्या आयातीत घसरण :- मागील ३ महिन्यापासून खाद्यतेलाच्या आयातीत घसरण दिसत आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर या ३ महिन्यात खाद्य तेलाच्या आयातीत १७ टक्के नी घट झाली. जागतिक स्तरावर खाद्यतेलाची मुबलक उपलब्धता आहे. पण व्यवहार मात्र कमीच होताना दिसत आहेत.**

कच्च्या तेलाचे व्यवहारही काही प्रमाणात कमी होत आहेत. पामतेलाच्या पाठोपाठ सूर्यफुल तेलाचीही मागणी घटली आहे.

**पामतेलाचे उत्पादन :-** मलेशियातील पामतेलाचे उत्पादन जानेवारी महिन्यात ९.६ टक्के ने घटून १४ लाख टन झाले. मलेशियातील पामतेलाचा साठा ११.८ टक्के ने कमी झाला. बायो डिझेलची निर्मिती वाढल्यामुळे साठा घसरला. पण जागतिक स्तरावर तेलाची उपलब्धता अधिक असल्यामुळे तेलाच्या भावावर दबाव टिकून आहे. साखरेच्या उत्पादनात ७ टक्क्यांनी घट :- दक्षिण - पूर्व आशियातील दुष्काळी परिस्थितीमुळे प्रमुख बाजारपेठांमधील साखर उत्पादनावर परिणाम झाला आहे. विशेषतः भारतातील साखरेच्या उत्पादनात ७ टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येत आहे. सन २०२४ मध्ये साखरेच्या किमती मागील वर्षीच्या तुलनेत कमी राहण्याची शक्यता आहे. सध्या साखरेच्या किमती मागील तीन आठवड्याच्या निच्चांकी पातळीवर आहेत. जागतिक कच्च्या साखरेच्या किंमती २०२४ मध्ये २० टक्के नी वाढण्याची अपेक्षा आहे.

**इथेनॉल मिश्रणाचा ११.२० टक्के टप्पा गाठला :-** दि ४ फेब्रुवारी २०२४ पर्यंत, देशाने इथेनॉल मिश्रणाचा ११.२० टक्के टप्पा गाठला आहे. दि.१ नोव्हेंबर २०२३ पासून सुरू झालेल्या इथेनॉल पुरवठा हंगामात मोलॅसेस - आधारित डिस्टिलरीजमधून इथेनॉल पुरवठ्यासाठीच्या कोट्यात बदल करण्यात आलेला आहे. प्रारंभीच्या २७० कोटी लिटरच्या कोट्यात कपात करून आता १६२ कोटी लिटरचा कोटा देण्यात आला आहे. उसाच्या रसापासून ४३ कोटी लिटर इथेनॉल निर्मीती झाली. खराब धान्यापासून २६.६६ कोटी लिटर तर मक्यापासून १९.३४ कोटी लिटर इथेनॉल निर्मिती झाली. तुरीचे भाव ७ टक्के ने वाढले :- नव्या तुरीची आवक बाजारपेठेत वाढत आहे. तुरीचे लागणक्षेत्र अधिक असल्यामुळे आणि नोव्हेंबर अखेरीस आणि डिसेंबरच्या सुरुवातीस झालेल्या पावसामुळे पीक उत्तम स्थितीत आहे. २५ ते ३० टक्के क्षेत्रावर अंतिम टप्प्यात पाण्याची कमतरता भासली. त्यामुळे टंचाईच्या भागात गुणवत्ता काही प्रमाणात कमी झाली. देशात तुरीचे उत्पादन ३४.२१ लाख टन होण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे. जे मागील वर्षापेक्षा ३ टक्के ने अधिक आहे. लाल समुद्रातील अडचणीमुळे आयात कमी झाली. म्हणजे आफ्रिका देशामधून तुरीची आयात प्रभावित झाली, तर म्यानमारमधून तुरीची आयात ही हळुवार होत आहे. याच कारणामुळे मागील एक महिन्यात तुरीचे भाव ७ टक्के ने वाढले. जोपर्यंत आफ्रिकेमधून आयात वाढत नाही तोपर्यंत तुरीचे भाव चढेच राहू शकतात. यासाठी आणखी एखाद महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत.



**लाल मिरचीचे भाव १५ ते २० टक्के ने अधिक :-** तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्राच्या उत्तरेकडील भागात पाण्याची टंचाई तीव्र होत चालली आहे. लाल मिरचीच्या उत्पादकतेत घट झाली. बाजारपेठेत आवकही कमी होत असल्याचा परिणाम थेट भावावर होत आहे. मसाला विभाग आणि निर्यातदारांकडून ही लाल मिरचीला मागणी चांगली मिळत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत लाल मिरचीचे भाव १५ ते २० टक्के ने अधिक आहेत. सध्या हिरव्या मिरचीची आवकही अधिक आहे. हिरव्या मिरचीला २५०० ते ३५०० रुपये प्रतिक्विंटल या दरम्यान भाव टिकुन आहेत. नंदुरबार बाजारपेठेत ओल्या मिरचीची उच्चांकी आवक सुरु आहे.

**सोयाबीनच्या भावात घट :-** मागील आठवड्यात सोयाबीनचे भाव आणखी कमी झाले. सातत्याने भाव घसरत असल्यामुळे साठ्यातील सोयाबीन बहुतांश शेतकरी कमी करत आहेत. परिणामी सोयाबीनची आवक जोरदार वाढली, पण त्या तुलनेत खरेदी होत नसल्यामुळे भावावर दबाव टिकून आहे. सन २०२३-२४ या हंगामामध्ये सोयाबीनचे उत्पादन ११५ लाख टन होण्याचे अंदाज कृषी विभागाने वर्तविले आहेत. जे मागील वर्षाच्या तुलनेत १८ टक्के नी कमी आहेत. तेलाची वाढती आयात आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कमी भावात उपलब्धता हे सोयाबीनचे भाव घटण्यामागचे प्रमुख कारण आहे. सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ४६०० रुपये प्रतिक्विंटल असतानाही सध्या ४३०० त्या ४४०० रुपये प्रतिक्विंटल इतके भाव मिळत आहेत. सोयाबीनच्या भावात नजिकच्या काळात सुधारणा होईल असे वाटत नाही.

**उन्हाळ लागण क्षेत्रात घट :-** पाण्याच्या कमतरतेमुळे उन्हाळ लागण क्षेत्र घटण्याची शक्यता ॲमिकस कडून या आधीच वर्तविण्यात आली होती. उन्हाळ पिकांचे लागण क्षेत्र कमी होत असले तरीही बहुतांश शेतकरी उपलब्ध पाण्यावर भाजीपाल्याकडे वळताना दिसत आहेत. मागील वर्षी टोमॅटोमध्ये चांगला परतावा मिळाला होता. यामुळे टोमॅटोचे लागण क्षेत्र काही प्रमाणात वाढू शकते. पण भाव किती मिळतील हे पुढील वातावरणावर अवलंबून राहील असे वाटते.

**गव्हाचा साठासीमा ५० टक्के ने कमी :-** गहूचा साठासीमा ५० टक्के ने कमी करण्यात आला. त्यासोबतच प्रत्येक शुक्रवारी गव्हामध्ये व्यवहार करणाऱ्या घाऊक व्यापारी, रिटेलर्स, मॉल आणि मिळवाल्यांना आपल्याजवळील साठा सरकारकडे नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या संस्था साठवणूक मर्यादेचे उल्लंघन करतील त्यांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. या बंधनामुळे गव्हाच्या भावात पुन्हा हलकीशी घसरण दिसून येऊ शकते. केंद्र सरकार "भारत आटा" या नावाने २७ रुपये ५० पैसे या दराने गव्हाची विक्री करत आहे. अल्पावधीतच बाजारपेठेतील ३० टक्के पर्यंतचा वाटा या "भारत " ब्रॅण्डने घेतला आहे.

**नव्या लसणाची आवक सुरु :-** नव्या लसणाची आवक सुरु झाली, या महिन्याच्या अखेरीपासून आवक आणखी वाढेल असे दिसते. बाजारपेठेत नवीन लासणाची आवक सुरु होताच भावात ८० ते १०० रुपये प्रति किलोची घाट झाली. आवक जसजसे जोर धरेल तसतसे भाव आणखी घसरत जातील. हळद लागवड क्षेत्र घटले :- देशातील हळद उत्पादन घेणाऱ्या राज्यांत हळद लागवडीच्या वेळी पावसाचा विलंब, ऐन वाढीच्या काळात पावसाचा खंड याचा फटका हळद पिकाला बसला आहे. परिणामी देशात हळदीचे उत्पादन ५१ हजार ८५३ टनाने घटण्याचा प्राथमिक अंदाज भारताच्या मसाला मंडळाने व्यक्त केला आहे. महाराष्ट्र, तेलंगणा या दोन राज्यांत सर्वाधिक लागवड क्षेत्र घटले आहे. **गहू खरेदीवर १२५ रुपये प्रतिक्विंटल बोनस :-** राजस्थान सरकारकडून राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत लाभार्थ्यामध्ये वितरित करण्यासाठी खरेदी योजनेअंतर्गत सुमारे २० लाख टन गव्हाची खरेदी होण्याची शक्यता आहे. राजस्थान सरकारने २२७२ रुपये प्रतिक्विंटलच्या एम.एस.पी. पेक्षा जास्त आणि त्याहून अधिक गहू खरेदीवर १२५ रुपये प्रतिक्विंटल बोनस जाहीर केला आहे. गेल्या आठवड्यात पुढील हंगामासाठी दि.१ एप्रिल पासून गव्हाची खरेदी २४०० रुपये प्रतिक्विंटल दराने करण्याचे जाहीर केले आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मोदींनी सांगितलेल्या कसोट्यांवर उतरलेला संघटक कार्यकर्ता!

जीवेत शरदः शतम्



आधुनिक केसरी

**मोदी की गैरंटी ह्या तीन शब्दांनी सर्वसामान्य भारतीयांवर मोठीच जादू केलेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांची हमी म्हणजे सगळं काही नामी, हे तमाम देशवासी जाणून आहेत. पंतप्रधान असलेल्या श्री. मोदी ह्यांची खरी ओळख आहे, ती बिनीचा कार्यकर्ता! तेही स्वतःला जनतेचा सेवक असंच अभिमानाने सांगतात. चांगला कार्यकर्ता कसा असतो? तो कसा असावा? याबाबत खुद्द श्री. नरेंद्र मोदी ह्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी उत्तम कार्यकर्त्याची चार लक्षणे सांगितली आहेत. 'पग में चक्कर, जीभ में शक्कर, सर पे बरफ और दिल में हाम. म्हणजे श्री. मोदी सांगतात की, कार्यकर्त्याने सतत सक्रिय असावे, फिरते राहावे; संवाद साधताना कडवटपणा टाळून चांगलं बोलावं; डोके शांत ठेवून दिली जबाबदारी पार पाडावी आणि मनात नेहमी हिंमत असावी! पंतप्रधानांनी सांगितलेल्या उत्तम कार्यकर्त्याच्या कसोटीवर उतरणारे व्यक्तिमत्त्व भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश शाखेला लाभले आहे. ते म्हणजे आमदार श्रीकांत भारतीय!**

मोदी यांनी सांगितलेली चारही लक्षणे त्यांच्यामध्ये दिसतात; त्या शिवाय अन्य अनेक गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळून येतात. त्यामुळेच पक्षाकडून त्यांच्यावर सातत्याने विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात येत आहेत.

लोकसभेच्या येत्या निवडणुकीत सत्तारूढ भा. ज. प. हॅटट्रिक साधण्याच्या तयारीत आहे. परिस्थिती अनुकूल आहे, केलेलं काम मतदारांना भावलं आहे. पण तेवढ्यावरच पक्षाचं नेतृत्व समाधान मानत नाही. कोट्यवधी मतदारांना आपलंसं करून २०४७चा भारत घडविण्यासाठी आगेकूच करण्याचा संकल्प पंतप्रधानांनी सोडला आहे. त्यामुळेच ह्या निवडणुकीत भा. ज. प. पूर्ण तयारीनिशी उतरत आहे.

**प्रदेश संयोजकपदाची जबाबदारी :** कागदावरचं नियोजन कितीही चांगलं आणि परिपूर्ण असून केवळ त्याचाच उपयोग नसतो. आखलेल्या नियोजनाची तेवढीच चोख अंमलबजावणी होणं महत्त्वाचं. ती जबाबदारी पेलणारा माणूस अष्टावधानी, बुद्धिमान, संघटनेची बारकाइनं माहिती असणारा असावा लागतो. महाराष्ट्रापुरता तरी असा संयोजक भा. प. ला. निश्चितपणे मिळाला आहे. महाविजय २०२४ मोहीम फत्ते करण्यासाठी प्रदेश संयोजक म्हणून आमदार श्रीकांत भारतीय ह्यांच्यावर भा. ज. प.ने जबाबदारी सोपविली आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ह्यांनी मोठ्या विश्वासाने श्री. भारतीय ह्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली आहे. त्याचे कारण त्यांनी आधी केलेले काम आणि त्यातून दाखवून दिलेला निकाल. त्यांच्या कामाचा इतिहास खणखणीत असल्यामुळेच की काय, पण संयोजक म्हणून त्यांची निवड झाल्यावर पक्षाचे राज्यभरातील कार्यकर्ते आणि संभाव्य उमेदवार ह्यांच्यामध्ये उत्साहाची मोठी लाट आली आहे. विजयाचा आत्मविश्वास मनात बाळगूनच कार्यकर्ते कामाला लागलेले दिसतात.

**कोण आहेत श्रीकांत भारतीय? :** कोण आहेत हे श्रीकांत भारतीय? साधारण दीड-पावणेदोन वर्षांपूर्वी झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी भा. ज. प.ने उमेदवार जाहीर केले, तेव्हा बहुतेक सर्व माध्यमांमधून हाच प्रश्न विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाचं उत्तर खुद्द माध्यमांनीच शोधून मांडलं. त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्काच बसला.

भा. ज. प.सारख्या काडर-बेस्ड (प्रशिक्षित आणि समर्पण भावनेने काम करणारे कार्यकर्ते) पक्षामध्ये दोन पद्धतीची रचना आढळते. पडद्यासमोर दिसणारे नेते आणि पडद्याआड राहून संघटनात्मक काम करणारे कार्यकर्ते, संघटक, पदाधिकारी आदी. अगदी अलीकडच्या काळापर्यंत आमदार भारतीय दुसऱ्या प्रकारात मोडणारे संघटक होते. विविध ध्येयधोरणांची आखणी, नेतृत्वाने निर्धारित केलेल्या कार्यक्रमांची चोख अंमलबजावणी, पक्षाची संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांना आत्मविश्वास आणि बळ देणे अशी असंख्य कामे पडद्याआड होत असतात. ही अशी कामे करणाऱ्यांमध्ये एक प्रभावी नाव आहे ते आमदार श्रीकांत भारतीय ह्यांचं.

काडर-बेस्ड असल्यामुळेच भा. ज. प.मध्ये शिस्तीला महत्त्व आहेच. ती कसोशीने पाळणाऱ्याचं त्याबद्दल कौतुकही केलं जातं. त्याचं उत्तम उदाहरण म्हणून पुन्हा एकदा श्री. भारतीय ह्यांचंच नाव घ्यावं लागतं. विधानपरिषदेसाठी उमेदवारी मिळाल्यावर त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख माध्यमांनी मांडला आणि त्यात त्यांनी पडद्याआड राहून केलेलं कार्य जनतेच्या समोर आलं. त्या कामाची पावती म्हणूनच त्यांना विधानपरिषदेवर संधी मिळाली!

***यदि आप परिणामों पर ध्यान केंद्रित करेंगे***
***तो आप कभी नहीं बदलेंगे।***
***लेकिन अगर आप बदलाव पर ध्यान देंगे***
***तो आपको परिणाम मिलेंगे।***

...श्री. भारतीय ह्यांचं काम वरील ओळींनुसारच आहे, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती होणार नाही. समाजकारण-राजकारणाच्या तब्बल चार दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ते ह्याच उद्देशाने कार्यरत राहिले आहेत - काय होईल माहीत नाही, पण कसोशीनं मेहनत केल्यावर बदल नक्कीच होईल! ह्याच वृत्तीमुळे आणि काम करण्याच्या ह्याच धारणेमुळे लोकसभेच्या आगामी निवडणुकीसाठी पूर्ण महाराष्ट्राची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यातून त्यांच्या निर्णयक्षमतेवर, काम करण्याच्या पद्धतीवर पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचा असलेला विश्वास पाहायला मिळतो.

वारसा निष्ठेचा, व्रतस्थपणे काम करण्याचा
राजकारणात टिकून राहायचं, तर घराण्याचा वारसा लागतो, अशी एक समजूत आहे. ती फारशी खरी नाही, हे श्री. भारतीय ह्यांनी ४० वर्षांच्या प्रवासात सिद्ध केलं. वारसा असावा लागतोच; पण तो निष्ठेचा, व्रतस्थ पद्धतीने काम करण्याचा हेच त्यातून दिसतं. अमरावती जिल्ह्यातील शेतकरी-शिक्षक अशा कुटुंबात जन्म झालेल्या श्री. भारतीय ह्यांची राजकारणातली झेप कोणत्याही सामान्य माणसाला आश्वस्त करणारी आणि दिलासा देणारी आहे. आपल्याला कौटुंबिक वारसा नसला, तरी पद्धतशीर प्रयत्न आणि मेहनत करून राजकारणात मोठं होता येतं, हेच त्यातून समजतं.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून राष्ट्रवादी चळवळीशी श्री. भारतीय जोडले गेले. अमरावतीचे शहरमंत्री, शहरप्रमुख, जिल्हाप्रमुख अशा विविध पदांवर त्यांनी काम केलं. झोकून देऊन काम करीत असल्याने त्यांच्यावर आपसूकच विविध जबाबदाऱ्या येत गेल्या. पूर्ण वेळ कार्यकर्ता ह्या नात्याने त्यांनी जिल्हा, विभाग व विदर्भ प्रांत संघटन मंत्री म्हणून विद्यार्थी परिषदेचे विदर्भातील काम लक्षणीयरीत्या वाढविलं.

श्री. भारतीय विद्यार्थिदशेत असताना आसामच्या प्रश्नाने देश ढवळून निघाला होता. त्या काळात त्यांनी त्या प्रश्नाचा अभ्यास केला. आपल्या समाजाकारण-राजकारणाला अभ्यासाची, वर्तमानाची, इतिहासाची जोड हवीच, हे त्यांनी ओळखलं. तो अभ्यास असला तर भविष्यकाळाकडं आश्वासक नजरेनं पाहता येतं, ह्याची जाणीव त्यांना होती.

शेतकरी संघटनेतही त्यांनी काम केलं. संघटनेच्या विविध आंदोलनांमध्ये ते सहभागी झाले. शेती आणि शेतकऱ्यांशी असलेलं त्यांचं नातं आजही कायम आहे. भा. ज. प. किसान मोर्चाच्या कार्यकारिणीत ते काम करतात.

समाजकारण करता करता श्री. भारतीय राजकारणात आले. भारतीय जनता युवा मोर्चात सक्रिय झाल्यावर त्यांच्या कामाची तडफ आणि उमज पाहून त्यांना संघटनेचं प्रदेश सरचिटणीस म्हणून काम करण्याची संधी मिळाली. तिथेही त्यांची चमक दिसली आणि त्यातूनच भा. ज. प.मध्ये ते काम करू लागले. एका राजकीय कार्यकर्त्याच्या चढत्या प्रवासाची ही सुरुवात होती.

श्री. मोदी ह्यांच्या नेतृत्वाखाली २०१४मध्ये भा. ज. प.ने पहिल्यांदाच स्वबळावर केंद्रातील सत्ता संपादित केली. त्या विजयाने पक्षसंघटनेत आणि कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला. अशा उत्साहाला आणि आत्मविश्वासाला योग्य दिशा मिळाली, तर बरंच काही चांगलं घडू शकतं. त्यासाठी संघटनात्मक पातळीवर विचारपूर्वक काम करणारे सजग पदाधिकारी हवे असतात. श्री. भारतीय ह्यांच्या रूपाने असा खंदा पदाधिकारी भा. ज. प.ला मिळाला होता.

**वॉर रूमचे समन्वयक :** श्री. भारतीय ह्यांच्या कामाची पद्धत, त्यातील तडफ पाहून महाराष्ट्र विधानसभेच्या २०१४च्या निवडणुकीमध्ये पक्षाच्या प्रदेश निवडणूक व्यवस्थापन समिती (इलेक्शन वॉर रूम) समन्वयक म्हणून त्यांनी काम पाहिले. त्या निवडणुकीत भा. ज. प.ला सर्वाधिक जागा मिळाल्या. श्री. देवेंद्र फडणवीस ह्यांच्या रूपाने पक्षाचा पहिला मुख्यमंत्री झाला. प्रशासन चालविण्याचा आधीचा अनुभव नसताना श्री. मोदी ह्यांनी थेट मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी श्री. फडणवीस ह्यांच्यासारख्या तरुण नेत्याकडे दिली. ह्या पदाला न्याय द्यायचा असेल आणि पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवायचा असेल, तर आपल्या चमूमध्ये तसेच हरहुन्नरी सहकारी हवेत, हे श्री. फडणवीस ह्यांनी ओळखले. त्याचाच एक भाग म्हणून श्री. भारतीय ह्यांची त्यांनी आपले विशेष कार्य अधिकारी (ओ. एस. डी.) म्हणून निवड केली.

श्री. फडणवीस ह्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने महाराष्ट्राच्या हितासाठी धडाकेबाज निर्णय घेतले. ह्या निर्णयाची योग्य रीतीने अंमलबजावणी होण्यासाठी, त्यांचे परिणाम जनेतपर्यंत पोहोचविण्यासाठी संघटनात्मक बांधणी मजबूत असणे आवश्यक होते. ते काम श्री. भारतीय ह्यांनी त्या पाच वर्षांत केलं. त्याच्या परिणामी विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भा. ज. प.ला लक्षणीय यश मिळालं. हा पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणातील नवीन ताकद म्हणून ओळखला जाऊ लागला. त्या वेळी सरकार दोन पक्षांच्या युतीचे होते. युतीच्या राजकारणाच्या मर्यादा ओळखून आणि जबाबदारीचे भान ठेवून प्रसंगी शिवसेनेला दोन शब्द सुनावण्यास श्री. भारतीय कचरले नाहीत.

**तर्पण फाउंडेशनची स्थापना :** राजकारणात स्थिरावल्यानंतरही श्री. भारतीय ह्यांना समाजकारणाचा विसर पडला नाही, हे महत्त्वाचे. अनाथालयात राहणाऱ्या मुला-मुलींचे वयाच्या अठराव्या वर्षांनंतर भवितव्य काय, हा मोठाच प्रश्न आहे. मोदी सरकारने ह्या वर्षी ज्यांचा पद्मश्री सन्मानाने गौरव केला, ते श्री. शंकरबाबा पापळकर ह्याच मुद्द्यावर सातत्याने काम करीत आहेत. ह्या मुला-मुलींच्या भविष्याला आकार देण्यासाठी श्री. भारतीय ह्यांनी तर्पण फाउंडेशनची स्थापना केली.

अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर अनाथलय सोडाव्या लागणाऱ्या मुला-मुलींच्या पुनर्वसनाची समस्या गंभीर आहे. त्यावर उपाय शोधण्यासाठी श्री. भारतीय ह्यांनी तर्पण फाउंडेशनचा श्रीगणेशा केला. संस्थेने चार वर्षांत दीड हजार हून अधिक मुलांना दत्तक घेऊन त्यांना सर्व प्रकारची मदत केली आहे. श्री. भारतीय ह्यांच्या ह्या सामाजिक कार्याचे कौतुक विधानसभेचे अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांनाही वाटले. महाराष्ट्रातील अनाथ तरुणांना तर्पण फाउंडेशमुळे आसरा मिळाला. त्यामुळे त्यांचे भाग्य उजळले, असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. तर अनाथांना नोकरीत १ टक्का आरक्षण लागू करण्याचा निर्णय ही सरकारने घेतला तो भारतीय यांच्या मुळे तर्पण फाउंडेशनच्या निरलस कामाची ओळख चहुकडे झाली. त्यामुळेच निराधार योजनेचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ह्या फाउंडेशनशी त्रिपक्षीय करार केला. हे सामाजिक काम आहे आणि गरजूंपर्यंत मदत पोहोचलीच पाहिजे, ह्या भावनेने तर्पण ह्या कामाचा मोबदला घेणार नाही.

**मुंबईच्या डबेवाल्यांसाठी हक्काचं घर :** मुंबईतील नोकरीपेशाच्या माणसांना दुपारच्या जेवणाचे डबे पोहोचविण्याचे काम जगभराच्या कुतुहलाचा विषय आहे. ह्या डबेवाल्यांचा इतिहास सव्वाशे वर्षांचा आहे. त्यांच्या कामाचे कौतुक झाले खरे; पण त्यांच्या सोयींचे काय? श्री. भारतीय ह्यांच्या डोक्यात हाच विषय आला. मुंबईच्या डबेवाल्यांना परवडणाऱ्या किमतीत घर मिळण्यासाठी त्यांना प्रयत्न चालू केले. आपले सरकार संवेदनशील आहे. डबेवाल्यांना परवडेल, अशाच किमतीत घर देण्याचा विचार सरकार करीत आहे, असं श्री. भारतीय सांगतात. आपलं पद, आपण करीत असलेलं काम ह्याची प्रतिष्ठा जपली जाईल, ह्याचा श्री. भारतीय अगदी कटाक्षाने विचार करतात. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल विदर्भातील शेतकऱ्यांना सरकारने अनुदान जाहीर केले. श्री. भारतीय ह्यांची चांदूरबाजार (जि. अमरावती) येथे वडिलोपार्जित जमीन आहे. त्यांच्याही पिकाचे नुकसान झाले आणि त्याबद्दल अनुदान मंजूर झाले. मी लोकप्रतिनिधी आहे. त्याबद्दल मला सरकारकडून वेतन मिळते. अशा परिस्थितीत सरकारी योजनांचा लाभ घेणे योग्य वाटत नाही, अशी प्रांजळ भूमिका घेऊन त्यांनी स्वेच्छेने ते अनुदान नाकारले.

भा. ज. प.मध्ये प्रदेश पातळीवर दहा वर्षांपासून काम करणारे श्री. भारतीय कुशल संघटक आहेत. नेत्यांप्रमाणेच कार्यकर्त्यांशी आपलेपणाने संवाद साधण्याची हातोटी आहे. काही काळ प्राध्यापक म्हणून काम केल्यामुळे असेल कदाचीत, पण त्यांचे वक्तृत्व फर्डे आहे. पत्रकार असल्यामुळे वाचनाची आणि नेमकेपणाने बोलण्याची सवयही त्यांना आहे.

**चढता आलेख :** विद्यार्थी परिषद, भा. ज. युवा मोर्चा, भा. ज. प.चा प्रदेश सरचिटणीस, विधानपरिषद सदस्य आणि आता महाविजय २०२४चे प्रदेश संयोजक... असा श्री. भारतीय ह्यांच्या प्रवासाचा चढता आलेख आहे. सामाजिक भान, समर्पित भावनेने काम करण्याची वृत्ती, कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे संबंध हीच गुणवैशिष्ट्ये त्यांना येथपर्यंत घेऊन आली. आमदार श्रीकांत भारतीय ह्यांच्या ह्या प्रवासाबद्दल समर्थ रामदास स्वामींच्या शब्दांमध्ये सांगता येईल -

**अपकीर्ति सांडावी। सद्कीर्ति वाढवावी।**
**विवेके दृढ धरावी। वाट सत्याची॥**



**वसंत मुंडे**
**प्रदेशाध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई**

मांडणी व सजावट
अतुल ह. खंडागळकर

# तिकडे काँग्रेसला रामराम, इकडे 'जय श्रीराम'



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**नुकतेच २०२४ च्या निवडणुकीचे बिगुल वाजले. भाजप फोडा - जोडीत तरबेज असल्यामुळे कैक वर्षे सत्तेत राहिलेले काँग्रेसजन व इतर विरोधक आपापल्या कर्मफळांमुळे निष्क्रिय झालेले आहेत. अशातच भाजप आपली घोषणा "अबकी बार, ४०० पार" प्रखरपणे राबवित आहे. मागील निवडणूक जाहिरनाम्यातील अंशतः वचनपूर्ती नुसार केंद्रातील भाजप सरकार सध्या लोकप्रियतेच्या झोतात आहे. सर्वच गोष्टी सर्वाना पटतील असे नाही पण भाजपचा निवडणूक अजेंडा जवळपास ७०% भारतीयांना पटत आहे असे चित्र दिसते. देशाचे राजकारण चालविण्यासाठी तमाम भारतीयांना नेमके काय पाहिजे आहे याचे तंतोतंत आकलन वर्तमान सत्ताधाऱ्यांना आहे. या शिवाय प्रबळ विरोधकही सत्ताधाऱ्यांपुढे नाहीत, जे आहेत ते सर्वच आपसी मतभेद व कारणाम्यांमुळे जनतेला नको आहेत.**

नेमके हेच गणित हेरून भाजप उरलेसुरले विरोधकही संपवण्याच्या मार्गावर आहे. हिंदुत्ववादी विचारधारा सोडली तर उरलेल्या जनतेलाही नेमके काय व कसे करावे हे सुचेनासे झाले आहे. एकंदरीत भारतीयांचा भूतकालीन प्रगतीचा आलेख बघितला तर वर्तमानातील सत्ताधारी करत असलेला सर्वच स्तरांमधील बदल हा दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे. अशातच भूतकालीन सत्ताधाऱ्यांचे एक एक कारनामे जनतेपुढे ठेऊन वर्तमानातील भाजप सरकारे विरोधकांना कोंडीत पकडत आहेत. अशा नानांविध कारणांमुळे भूतकालीन सत्ताधाऱ्यांना ईडीची भीती भेडसावत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पक्षांतराला वाट मोकळी होत आहे. त्यात अनेक विरोधीपक्षांतील नेत्यांचा समावेश आहे. याचाच एक भाग म्हणजे राधाकृष्ण विखे पाटील, नारायण राणे आणि सध्या भरीस भर म्हणून राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्रातील दिग्गज नेते अशोकराव चव्हाण यांच्यासह इतर अनेकांचा यात समावेष आहे. वर्तमान राजकीय परिस्थितीत कट्टर सोवळेवाल्या भाजप सारख्या राष्ट्रीय पक्षाला हे अशोभनीय आहे. संस्कृत मध्ये एक सुभाषित पुढील प्रमाणे आहे. "अपवित्रो पवित्राः". एखाद्या निरुपयोगी किंवा दर्जाहीन गोष्टीला ती कितीही अपवित्र असली तरीही त्याला "गंगाजल" शिंपडून पवित्र करता येते असे जुने जाणते लोक सांगत असतात. नेमकी हीच खेळी भाजप कडून वर्तमान राजकारणात सर्रास चालू आहे. एखादी व्यक्ती खरेच अपवित्र असेल तर तीवर "भाजप नावाचे गंगाजल" शिंपडून त्याला पवित्र करून घेता येते काय? हे हिंदुत्ववादी भाजपाला समजेनासे झाले आहे की काय असे सर्वसामान्यांना वाटत आहे. सत्तेच्या सरीपाटात जशास तसे वागले



तरच निभाव लागू शकतो हे कोडे भाजपाला उलगडले आहे. भूतकाळात कुणी कसेही वागले तरी जे येणारे इच्छुक आहेत त्यांना गंगाजलाने शुद्ध करून आपल्या गोटात ओढण्याचा भाजपाचा डाव आहे म्हणूनच भाजपवाले ठासून सांगतात फोडा अंक जोडा केले की अबकी बार ४०० पार नक्कीच होणार. असे केल्याने जनतेच्या मनात नक्कीच संभ्रमाचे वातावरण निर्माण होऊन चुकीचे संदेश जात आहेत. कदाचित राष्ट्रीय नेतृत्वाला सक्षम पर्याय नसल्यामुळे भविष्यात ४०० पार की आरपार हे जनताच ठरवेल. एक गोष्ट नक्कीच की, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर भूतकालीन सुधारणेच्या तुलनेत वर्तमान सुधारणांचा भाजपाचा वारू जोराने दौडत आहे. भरीस भर म्हणून आपली भूतकालीन कुंडली कुणी उघडूनये म्हणून अशोकरावांसारखे अनेक दिग्गज वाल्या कोळ्याचे वाल्मिक ऋषी बनु पाहत आहेत ही गोष्ट जनतेला नक्कीच खटकत आहे असे जनाकानोस्यावरून स्पष्ट होते. अशोकरावांसारखे दिग्गज काँग्रेसी नेते मागील पाच दशकांपासून राजकारणात त्यांनी केलेल्या "आदर्श" विकासाची जाण नांदेड, मराठवाड्यासह तमाम महाराष्ट्रीय जनतेला आहे. काही का असेना येन-केन कारणांमुळे उशिराने का होईना अशोकरावांच्या मनी तमाम मराठवाड्यातील जनतेसाठी "रामराज्य" आणवेसे वाटणे चुकीचे नसावे. अशोकरावांनी श्रीरामाचा गजर करून भाजपा सोबत जाणे स्वीकारले व आपल्या कर्मभूमीला रामराज्य करावे वाटणे ही आपणा सर्वांसाठी आनंददायी बाब आहे. त्यांच्या वानर सेनेची कुठलीही विचारपूस न करता त्यांनी घेतलेला असा निर्णय त्यांच्या पारंपारिक मतदारांना मानवणारा नाही. पण आता या गोष्टीला इलाजही नाही. एकंदरीत वर्तमान राजकीय परिस्थिती पाहता भाजप हा शिस्तप्रिय सोवळे-ओवळे वाल्यांचा पक्ष राहिलेला नसून ऐरेगैरे-नथ्थूखैरे यांचाच आहे अशी सर्वसामान्यांसाह मूळ भाजपाइंची अवस्था आहे. शेवटी सर्वसामान्य जनतेला याचे काही एक देणे घेणे नसल्यामुळे रोजच्या या राजकीय नाटकाला जनता मात्र वैतागली आहे. उशिराने का होइना अशोकरावांच्या मनी आपल्या कर्मभूमीत रामराज्य आणण्याची कल्पना सुचली आणि सबका साथ, "सबका विकास" ही संकल्पना त्यांच्या मनी रुजली त्याबद्दल जनमनात वैचारिक उत्सुकता वाढली आहे. आपल्या कर्मभूमीसह तमाम मराठवाडा कायम रामराज्यासारखा व्हावा म्हणून अशोकरावांनी कायम प्रयत्नशील राहावे. त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा. राम राम आणि जय श्रीराम हे शब्द मुळी वाईट नाहीतच पण उशिराने का होईना त्यांच्या विचारमनी राम अवतरला त्याबद्दल धन्यवाद. मी रामभक्त नसून कर्मभक्त आहे यात फक्त "म" मात्र सारखेच आहे. अशोकराव किती काळ भाजपच्या पठडीत टिकतील की त्यांच्या दाजी सारखे लवकर घर वापसी करतील हे येणारा काळच ठरवील. म्हणूनच स्वर्गीय मुकेश यांनी गायलेले जुने गाणे आठवले. " हम छोड चले है महेफील को, याद आये किसे तो मत रोना। ऊस दिल को तसल्ली हम देंगे घाबराए कभी तो मत रोना। जय हिंद। इन्कलाब जिंदाबाद। लाल सलाम ।

# ऐसे कुळीं पुत्र होती ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मी संत तुकाराम का वाचतो? त्यांच्या अभंगावर का लिहितो? याचे कारण म्हणजे संत तुकाराम म्हणजे एक असा सामान्य माणूस ज्याने स्वतःच्या सामर्थ्यावर स्वतःच्याच जीवनात अनेक विक्रम नोंदवले आहेत. कुठेही असा विक्रमवीर सापडत नाही. मला हा माणूस अफलातून आवडतो. तुकोबा कुणाचीही भीडभाड ठेवत नाही. त्याला दगड आणि देव दोन्ही सारखेच! भेदभाव त्याच्या मनी मानसी कुठेच दिसत नाही. तुकाराम गाथ्यातील अभंग वाचतांना त्यातील काही अभंग मनाला पटत नाहीत. सनातनी, धर्म भोळेपणा, कर्मकांड, वर्णव्यवस्था मुळातून नाकारणारा बंडखोर संत तुकाराम! असे असतांना कधी कधी याचे समर्थन करणारे शब्द किंवा अभंग समोर आले की; विक्षेप अथवा घुसखोरी झाल्याचा संशय बळावतो!**

एखादा कवी, लेखक, समीक्षक वाचतांना त्या व्यक्तीचे चरित्र आणि चारित्र्य अभ्यासणे अत्यावश्यक असते. तुकोबांचे संपूर्ण चरित्र त्यांच्या अभंगातून लोकाभिमुख झाले आहे. कुठेही त्यांची बोटचेपी भूमिका आढळत नाही. असा हा सरळ, सामान्य, लोककल्याणकारी कवी कविता करतांना तमाम समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण जतन करणारा पहारेदार तुकोबा कुणाच्याही मनाला साद घातल्याशिवाय रहात नाही. असे असतांना तुकोबा आपले मित्र, सखा, वाटाड्या कधी होऊन जातात कळत सुद्धा नाही.

तुकोबा एखादा अभंग लिहितांना काय विचार करत असले पाहिजे? मला वाटते सामान्य कवी लेखाकांसारखे ते सुद्धा आपल्या भोवताल घडणाऱ्या घटना, लोकस्वभाव, लोक यांचे निरीक्षण करतांना त्यांना राहवत नसावे परिणामी ते कधी कधी माणसाच्या दुष्ट अंगावर सुद्धा कोरडे ओढायचे. त्यांचे सनासन ओढलेले कोरडे आज पण आपल्या अंगावर वळ उमटवतात! असाच सातत्याने समाजाची कान उघडणी करणारा

**ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजा ॥१॥**
**चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥धृ॥**
**त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥२॥**
**तुका म्हणे ग्रामपशु । केला नाशु अयुष्या ॥३॥**

तुकोबांचा हा अभंग समोर आला आणि आत्मचिंतन करणे क्रमप्राप्त झाले. अलीकडे माणसं आत्मचिंतन करण्याऐवजी व्यर्थ चिंतन करतांना दिसत आहेत. असो, कुणी काय करावे हे सांगण्याएवढे माझे सामर्थ्य नाही, मात्र मी जगातील महान लेखक, कवी, समीक्षक, अनुवादक इत्यादी लोकांच्या ग्रंथांसोबत सद्यस्थितीत प्रफुल्लतेने अगदी आनंदात तल्लीन होऊन विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापनाचा आनंद देत वाचन, चिंतन, मनन, लेखन करण्याचा अल्पसा प्रयत्न करत असून जे जे आपणासी ठावे। ते ते इतरांसी सांगावे। शहाणे करुन सोडावे। सकळ जन॥

या न्यायाने आपला भोवताल स्वतःसोबत जागा करण्याचा प्रयत्न करतो आहे. बदलाच्या नियमाप्रमाणे काळ मार्गक्रमण करत असतो. कोणताही काळ तत्कालीन आव्हाने घेऊन सर्वांच्या समोर उभा असतो. अगदी पावसाप्रमाणे काळ सर्वांच्या समोर बरसत असतो. असे असले तरी महान लोकांचे जीवन आणि त्यांची अनुभूतीपूर्ण ग्रंथ निर्मिती नित्य नित्य सर्वांना पथदर्शी ठरत असते. त्याच न्यायाने जगप्रसिद्ध




अनुभवसंपन्न ग्रंथ वाल्डनचा लेखक हेन्री थोरो लिहितो, "चांगली व सत्य कथन करणारी पुस्तके हृदयापासून वाचणे हा एक अत्यंत उमदा प्रयोग आहे. जर अर्थ समजून उमजून वाचले तर तेही दमछाक करते अगदी एखाद्या व्यायाम प्रकाराने आपली दमछाक होते तशी. चांगले, चांगल्याप्रकारे वाचण्यासाठीही एखाद्या खेळाडूला लागते तसे प्रशिक्षण वाचकाला लागते. शारीरिक व मानसिक. आयुष्यभर त्याचा ध्यास घ्यावा लागतो. लेखक ज्या हेतून पुस्तक लिहितो त्याच आत्मीयतेने वाचकाने ते वाचले पाहिजे." एखादा कवी, तत्वचिंतक, लेखक आणि त्याचा ग्रंथ कसा वाचावा( ?) याचं हे उत्तम मार्गदर्शन म्हणायला हरकत नाही. मातृभाषेतील असणारे बरेच ग्रंथ एकदा वाचून आकलन होत नाहीत असा माझा अनुभव आहे. याचे कारण काय बरे असावे? ज्याची त्याची उत्तरे भिन्न भिन्न असतील पण मला वाटते तो तत्वचिंतक तेवढे सखोल, आशयगर्भ चिंतन आपल्या लेखनातून मांडतो आणि त्याच्या आकलनाच्या अवस्थेसी एकरूप व्हायला वाचकाला वेळ लागतो, परिणामी एखादी कविता किंवा परिच्छेद पटकन आकलन होत नसावा. मराठीतील अनेक संत, लेखक सहजच पण आशयघन लिहितात. त्यापैकी एक संत तुकोबाराय कधी कधी आकलन न होणारे अभंग लेखन करतात. परंतु त्यांचे बहुतांश अभंग हे सहज आणि समजातील सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तीचा उहापोह करणारी असतात.

त्यापैकीच तुकोबांचा हा वरील अभंग मोठा तेज, तिखट मिरच्यांच्याठेच्यासारखा झणझणीत आहे. एकीकडे तुकोबाराय "कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक" अशा सुपुत्रांचा देवालादेखील हरिख म्हणजे आनंद वाटतो असे म्हणतांना दुसरीकडे आजच्या अभंगात कुपुत्रांच्या दुर्गुणांचे वर्णन करतात. सुपुत्र म्हणजे जे आपल्या पितरांचा सत्कर्माने उद्धार करतात तर कुपुत्र आपल्या पूर्वजांची कीर्ती, महत्कार्य बुडवण्याचे, अपकीर्ती करण्याचे दुष्कर्म करतात. त्यासाठी प्रत्येकाने मोठ्या सुदैवाने आपण माणसाच्या जन्माला आलो आहोत याचे भान ठेवून हे वारंवार स्वतःला सांगत रहावे. चहाडी, चुगली म्हणजेच लावालावी करणे, चोरी करणे इत्यादी मानवाला न शोभणारी कृत्ये माणसाने करू नये. अशा लोकांच्या अस्तित्वाने त्यांच्या आई-वडिलांना तर दुःख होतेच पण अशा दुष्ट लोकांचा भार मही म्हणजे पृथ्वीलासुद्धा असह्य होतो. त्यांचा भार वागवताना अक्षरशः पृथ्वी थरथर कापते. असे दुष्ट, चहाडीखोर, चोर माणसे चुकून माणसाच्या जन्माला आलेले पशु असून मानवाच्या जन्माला येऊन आपले आयुष्य आणि आपल्या भोवतालाचा नाश करणारे राक्षस आहेत असे तुकोबाराय बजावून सांगतात. त्यांना तुकोबाराय ग्रामपशु म्हणजेच गावातील घाण फस्त करणारी डुकरे, कुत्रे इत्यादी म्हणून संबोधतात. यामुळे तुकोबांचा एकेक अभंग वाचताना आपल्या सर्वांनाच मोठे सावधान रहावे लागते. असे लिहिण्याचे धाडस आणि योग्यता ही त्याच लोकांकडे असते जे स्वतः तसे वर्तन करतात आणि मगच लिहितात.

माय-बाप वाचकहो, दिवसामाजी एखाद्या महान लेखकाचे नक्की काहीतरी वाचावे आणि त्यावर लिहावे. असे लिहिण्याचे कारण म्हणजे हे जे लेखक, चिंतक लोक आहेत ते मोठे कृतीशील लोक आहेत हे लक्षात घ्यावे. आपण भाग्यवान आहोत की; आपल्याला अनंत पुस्तके ऑनलाईन फुकट उपलब्ध आहेत मात्र आपण ते वाचायला तयार नाहीत. ग्रंथ वाचनाने आपण अनंत साध्य साधू शकतो. त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख होतांना अनायासे त्याचा जीवन संघर्ष आणि अनुभव आपल्या गाठीशी जोडला जातो. त्याचे विचार, जीवन, चिंतन आणि त्याला जोडून आलेले अनेकविध प्रसंग विनासायास त्या व्यक्तीच्या ग्रंथात आपल्याला प्राप्त होतात. संत ज्ञानदेवांचे हरिपाठ, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी आदि सर्व ग्रंथ, संत तुकोबांचा गाथा, संत नामदेवांचे अभंग, संत एकनाथांचे अभंग, भागवत, हरिपाठ आणि अन्य मराठी, हिंदी आणि इंग्रजीतील अनेक महान लेखकांचे ग्रंथ ऑनलाईन फुकट उपलब्ध आहेत. एवढेच काय अनेक लेखकांनी त्यावर भाष्य केलेले अनेक ग्रंथसुद्धा उपलब्ध आहेत, मात्र हा सर्व अनमोल अनुभवसंपन्न खजाना कुणीही उघडून बघायला तयार नाही. या सर्वच लोकांनी वास्तव जीवनाशी संघर्ष करून आपले जीवन कृतार्थ करतांना येणाऱ्या सर्वच पिढ्यांना जागृत करण्याचे कार्य करून आपल्यासाठी मोफत ठेऊन दिले आहे. याचे सर्वांनी भान ठेवून मोठ्या जाणीवेने या सर्वच ग्रंथांचे अवलोकन करणे अत्यावश्यक आहे असे मला प्रकर्षाने वाटते.

असे असले तरी सातत्याने लोकांची अनेक पुस्तके प्रकाशित होत आहेत. अनेक लोक वाचताहेत, लिहिताहेत, बोलताहेत. यात कमी आहे ती कृतीशील लोकांची. आज कृतीशील लोकांची मोठी वाणवा दिसून येते. दुसऱ्याविषयी बोलतांना मी सुद्धा एखादी कृती करून मगच बोलायला हवे. आज आपण सगळे सुरक्षित विचार करत आहोत. दुर्दैवाने आज विचारांचे खंडन-मंडन विचाराने होतांना दिसत नाही. सरळ लोक हातघाईवर येताहेत. निश्चितच हे स्वतंत्र देशासाठी हितावह आणि स्वागतार्ह नाही. विचारांची लढाई विचारांनी लढून एखाद्याचे मत कसे चुकीचे आहे? हे पटवून देण्याची क्षमता, संयम, सन्मान आपल्यामध्ये येणे क्रमप्राप्त आहे. परंतु तसे होतांना दिसत नाही. मोबाईल नावाच्या डब्ब्याने जवळपास सर्वांनाच बंदिस्त केले आहे. असे असले तरी आपण सावध राहून वाचन-लेखन-चिंतन-मनन करावे. असे होणे म्हणजेच आपण जगद्गुरू तुकोबाराय यांच्या सोबत राहणे होय! जय तुकोबाराय!

# हमास - इस्रायल युद्ध : शस्त्रसंधी केव्हा होणार



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**इस्त्राइल- हमास युद्ध आता निर्णायक टप्प्यावर आले आहे. आर्ध्या गाझापट्टीवर इस्त्राइलने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. इस्त्राइल हमासवर निर्णायक विजय संपादन करण्याच्या स्थितीमध्ये आहे. वर्तमान संदर्भात इस्त्राइलवर शांतता प्रस्थापणेसाठी दबाव वाढत आहे. रमजानपूर्वी युदध थांबावे अशी अनेक धुरीणांची मागणी आहे. परंतु इस्त्राइल त्यास किती दाद देईल हे सांगता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यस्थी करून युद्ध थांबविल्यास मध्यपूर्वीत शांतता व विकासाचे नवे पूर्व सुरू होईल. अचानक मध्यरात्री 7 ऑक्टोबर रोजी हमासने इस्त्राइलवर हल्ला चढविला त्यामध्ये अनेक अमानवी प्रकार घडून आले. आपल्या आस्तित्त्वावर केलेला हा हल्ला आहे असे समजून इस्त्राइलने हमासला चोख उत्तर दिले. त्यानंतर इस्त्राइलने एका पाठोपाठ लष्करी कारवाया करून गाझा पट्टीवर आपला ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला.**

त्यातून इस्त्राइलची लष्करी आगेकूच चालू राहिली आता इस्त्राइलने हमासच्या ताब्यातून अर्धा गाझापट्टीचा भाग मुक्त केला आहे आणि युद्ध चौथ्या टप्प्यात पोहचले आहे. इस्त्राइलची पुढील वाटचाल कशी असेल याचे विश्लेषण या लेखात केले आहे. अलिकडे न्युयॉर्क स्टाईम्स ने असे म्हटले आहे की, गाझा पट्टीचा उत्तर भाग पादाक्रांत करून मध्य व दक्षिण गाझा पट्टीवर आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

**शास्त्रीय व्युव्ह रचना :** 1948 साली जगाच्या नकाशावर आपले नाव कोरले. या देशाने छळाकडून बळाकडे असा विक्रमी प्रवास केला. येहुदी (ज्यू) हा वंश बुद्धिमान, पराक्रमी असून संघर्ष हा मानवी जीवनाचा आत्मा आहे. असे माणनारा आहे कार्ल मार्क्स डॉ. हेन्ड्री किसीजंर हे बुद्धिमान महामानव या वंशात जन्मले. प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर त्यांनी आपले राष्ट्र शिल्प तेजस्वीपणे निर्माण केले. त्यांनी वाळवंटातही हिरवी गार शेती केली. ठिबक सिंचनाचा उपयोग करून शेतीमध्ये नंदनवन फुलविली. प्रगतशस्त्र आस्त्रांची निर्मिती केली. इस्त्राइलची मोसाद ही गुप्तहेर संघटना जगामध्ये सर्वश्रेष्ठ असून या संघटनेचे प्रगत रूप पाहता या संघटनेत जगातील घडामोडींची खडानखडा माहिती मिळवून इस्त्राइलला सुरक्षित ठेवले आहे. पहिल्या तीन टप्प्यामध्ये इस्त्राइलने हमासवर निर्णायक विजय मिळविला पहिल्या टप्प्यात हमासने तोडलेल्या सिमावर काटेकोर नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात हमासने खनलेल्या भूमिगत खंदकावर म्हणजे भूयारीगुव्हावस्त्यावर कारवाई करण्यात आली. ते काम अवघड होते, जिकीरीचे होते, त्यामध्ये अनेक अडचणी होत्या, काही ठिकाणी दवाखान्यामध्ये शस्त्रे ठेवली होती तेथून हल्ले केले जात होते. काही ठीकणी मस्जिदी म्हणजे प्राथना गृहातून इस्त्राइलवर क्षेपनास्त्रे टाकली जात होती, अचूक , नेमका व सातत्यपूर्ण संघर्ष करून विजय मिळविणे शक्य झाले. तिसऱ्या टप्प्यामध्ये ओलिसांची सुटका करण्यासाठी कुशलतेने, डावपेचात्मक प्रयत्न करून यश मिळविण्यात आले. ओलिसांची आदला बदल झाल्यानंतर युद्ध उतरणीला येईल व हळूहळू थांबेल असा अंदाज होता. परंतु युद्ध बंदीचा काळ उलटताच इस्त्राइलने पुन्हा आक्रमक पावित्रा घेतला

**निर्णायक संघर्षाचे रणशिंग :** ओलिसांची आदला बदल झाल्यानंतर लष्करी कारवाई न थांबविता इस्त्राइलने पुन्हा युद्धाचे रणशिंग फुकंले आणि आता अर्ध्या गाझापट्टीवर ताबा मिळविल्यानंतर अंतिम विजयासाठी पुढे निर्णायक कारवाई प्रारंभ करण्यात आला आहे. भक्कम पुर्व तयारी, काटेकोर नियोजन आणि इंच न इंच गमावलेली भूमि काबीज करण्यासाठी केलेल्या शास्त्र शुद्ध प्रयत्नामुळे यश इस्त्राइलच्या दृष्टीपथात आले आहे. आता युद्धाला जवळ-जवळ 100 दिवस पूर्ण झाले आहेत.मागील आठवड्यात इस्त्राइलने लेबनॉनच्या भूमित कारवाई करून हमासच्या दुसऱ्या क्रमांकाच्या सेनापतीला आसमान दाखविले. त्यामुळे लेबनॉनच्या सिमेवरून इस्त्राइलवर होणाऱ्या हल्ल्याचे प्रमाण कमी झाले आहे. अनेक आघाड्यावर युद्ध सुरू करून इस्त्राइलची कोंडी करण्याचा हमासचा प्रयत्न होता, परंतु इस्त्राइलने प्रत्येक आघाडीवर अखंडपणे सावध, सतर्क राहून आपली आगेकूच पुढे चालू ठेवली आहे.

या निर्णायक लढाईचे स्वरूप पाहता इस्त्राइल नियोजन नियंत्रण करून चपळाईनेपणे पुढील वाटचाल करत आहे. 1967 साली एका कराराने बड्या राष्ट्रांच्या मध्यस्तीने गाझापट्टीचा प्रदेश पॅलेस्टाइनला दिला होता परंतु या टप्प्यामध्ये गाझा पट्टीतीलआपले स्थान पुन्हा भक्कम करण्यासाठी इस्त्राइल या पुढील कालावधीत ठोस कारवाई करण्याची शक्यता आहे. आपले कमीत कमी नुकसान आणि शत्रूवर नैतिक दबाव अश्या दुहेरी तंत्राने इस्त्राइलचे सैन्य पुढे सरकत आहे. भूमिवरील कारवाई जोड म्हणून त्यांचे नौदल व हवाई दल पुरक कृती करत आहे. अमेरिका, इग्लंड व फ्रान्स या प्रमुख लोकशाही राष्ट्रांचा दहशदवादाच्या विरोधात इस्त्राइला सक्रीय पाठिंबा आहे. अलिकडे अमेरिका व इंग्लडने हौथी बंडखोरांचे प्राबल्य असलेल्या येमेन या देशावर हवाई हल्ले चढविले. त्यात 60 हौथी बंडखोर कामस आले आणि येमेन मधून इस्त्राइलवर हल्ला करण्याचा हौथी हमास या दृष्ट युतीचा पराभव करण्यात आला. लेबनॉन येमेन या देशांच्या सिमेवरून इस्त्राइलवर हल्ले करून अनेक सिमांवर युद्ध वाढविण्याचा हमासचा डाव होता तो फसला आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री ब्लिकंन यांनी इस्त्राइल दौरा करून मध्यपूर्वेत युद्ध क्षेत्र वाढवू नका असा प्रेमाचा सल्ला दिला आहे. हा विषय संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीसमोर आला तेव्हा भारतासह 14 राष्ट्रेतटस्थ राहिली. भारताची भूमिका अलिप्ततावादी राष्ट्राचा नेता म्हणून नेहमी शांततेची व संमजस पणाची राहिली आहे. तारेवरची कसरत करून भारताने युद्ध थांबविण्यासाठी आग्राहाने प्रयत्न सुरू केले आहे. अमेरिकेने इस्त्राइलची बाजू घेतली रशिया चिन आणि मित्र राष्ट्रे प्रत्यक्ष हमासच्या बाजून उतरण्यासाठी पसरत आहेत त्यामुळे हमासचा पाढा आता दृष्टीपथात आला आहे.



**तडजोड कशी होईल :** ज्या राष्ट्रांनी समेट घडवून ओलिसांची आदला बदल केली ती राष्ट्रे आता पुन्हा इस्त्राइल हमास युद्धात तडजोड घेडवून आणतील काय हा खरा चिंतेचा प्रश्न आहे. जर इस्त्राइला तडजोड करावयाची असती तर ओलिसांच्या सुटकेनंतर लगेच ती शक्य होती. गाझा पट्टीचा अर्धा भाग ताब्यात आल्यानंतर इस्त्राइल युद्ध अचानक थांबवेल असे वाटत नाही. तडजोड घडविल्यास किंवा अचानक युद्ध बंदी केल्यास हमासला तयारीसाठी वेळ मिळेल आणि त्यामुळे युद्धावरीची आपली पक्कड ढिली होईल या भितीने इस्त्राइल इंच भर ही मागे हटणार नाही, तसे आजचे चित्र आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकामध्ये इस्त्राइला अमेरिकेचा भक्कम पाठिंबा आहे शिवाय दहशतवादाने जगातील अनेक लोकशाही राष्ट्रांना वेठीस धरले आहे. त्याला कंटाळून अनेक लोकशाही राष्ट्रे इस्त्राइलचे समर्थन करत आहेत. अंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ठाम कारवाई आवश्यक आहे. दहशतवादा विरूद्ध शक्ती आणि युक्तीने कशी लढाई करता येईल याचे उत्तम उदाहरण इस्त्राइलने घालून दिले आहे. दहशतवादी हा जगाच्या शांततापूर्ण विकासाचे मोठा अडसर ठरत आहे. तसेच दहशतवादामुळे अन्न पुरवठा कमजोर होत आहे. रशियायुक्रेन युद्धामुळे अर्धा युरोप मंदीच्या खाईत गेला आहे. गहू, तांदूळ अन्नधान्य, फळे, भाजीपाला आणि दुध उत्पादने युरोप आणि आफ्रिकेमध्ये पोहचण्यात अनेक अडचणी येत आहेत. त्यामध्ये हौथी बंडखोरांनी हमासला पाठिंबा दिला व सुवझ कालव्यातील व्यापाराची नाकेबंदी केली त्यामुळे आर्थिक प्रश्न गुंतागुतीचे बनत आहेत. युद्धामुळे प्रश्न सुटत नाहीत ते अधिक बिकट बनतात ते रशिया युक्रेन युद्ध आणि इस्त्राइल हमास संघर्षाने सिद्ध केले आहे त्यामुळे नजीकच्या भविष्य काळात युद्धाचा तणाव कमी व्हावा आणि जगाच्या आर्थिक प्रगतीचे अडकूण पडलेले प्रवाह मुक्त व्हावेत असे राजकीय निरीक्षकांना वाटते. परंतु रशिया व युक्रेन तडजोडीस तयार नाहीत तशीच भूमिका इस्त्राइलने हमास विरूद्ध घेतली आहे. आता संघर्ष निर्णायक चौथ्या टप्प्यावर आला आहे. त्यामुळे मार्गक्रमण यशाच्या दिशेने चालू असतांना इस्त्राइल माघार घेईल असे वाटत नाही. यावेळी तिसऱ्या जगाचा नेता म्हणून भारताने पुढाकार घेतला तर रशिया युक्रेव तसेच इस्त्राइल हमास मध्ये तडजोड घडवून शांतता प्रस्थापित करता येईल नाही तर दहशदवादामुळे महायुद्ध तिसरे महायुद्ध घडवू शकेल

**समारोप :** अशा प्रकारे या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की इस्त्राइल हमास संघर्ष अंतिम टप्प्यावर आला आहे. हा युद्धाचा चौथा निर्णायक टप्पा आहे. इस्त्राइला याची कल्पना आहे की, आता थांबल्यास नुकासान होऊ शकते. त्यामुळे इस्त्राइल शेवटच्या टप्यात गाझापट्टी पूर्णपणे मुक्त करून आक्रमणाचा बदला घेण्याच्या तयारीत आहे. आता माघार नाही. युद्धाचा चौथा व अंतिम टप्पा हा संपूर्ण विजयाच्या दिशेने वाटचाल करणारा आहे. हमासने इस्त्राइलच्या आस्तित्त्वाला धक्का दिला आहे. त्याची अस्मिता दुखावली गेली, अपमानाचा बदला घेऊन मध्य पूर्वेत एक बलशाली राष्ट्र म्हणून इस्त्राइला गाझापट्टीवर संपूर्ण विजय मिळवून पॅलेस्टाइनवर आपली प्रतिष्ठा प्रस्थापित करणार आहे. नजीकच्या भविष्यात एका महिन्याच्या आत इस्त्राइल गाझापट्टीवर संपूर्ण विजय संपादन करणार आणि जगाच्या राजकारणात आपला दबदबा पुन्हा प्रस्थापित करणार, अशी शक्यता दिसत आहे. या पार्श्वभूमीवर युद्ध थांबवून जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा, असे अलिप्त राष्ट्र शिखर परिषदेने आवाहन केले आहे.

# पक्षप्रवेश ठीक आहे, निष्ठावंतांचे काय ?




शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवत आणि , एकूणच देशभरातील सर्व जनतेचा कौल लक्षात घेत सध्या विविध पक्षांतून भाजप प्रवेशाचे ग्लोबल चित्र आपण सगळेजण पाहत आहोत. विविध पक्षातील लोक आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत . यामध्ये सामान्य कार्यकर्त्यांपासून तर राज्याच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विविध मंत्रिपद भूषविलेले मान्यवर , आमदार, खासदार अशा सगळ्यांचाच समावेश झालेला दिसून येतो आहे.**

आज महाराष्ट्रामध्ये सुद्धा 40 वर्ष पक्षाची सेवा करणारे आणि पक्षानेही ज्यांना भरभरून सर्व पद देत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर त्यांना विराजमान केलं , असे अशोकराव चव्हाण हे नांदेड येथील आमदार आणि पक्षाच्या विविध जबाबदारी सांभाळत विविध मंत्रिपदावर जात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर सुद्धा आरुढ झालेले होते. यांनी सुद्धा जनतेचा कौल लक्षात घेत आणि मोदींच्या कार्यप्रणालीवर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. आज देशभरातील विविध पक्षांमधून मोठमोठे नेते हे भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करीत आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कार्य प्रणाली , 2014 नंतर देशांमध्ये होत असलेला विकास , बदललेली एकूणच सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती, या सगळ्या बदलांना लोकांचा लोकांचा मिळत असलेला प्रतिसाद , दुबई सारख्या ठिकाणी सुद्धा मोदींच्या नेतृत्वात मंदिराच निर्माण कार्य होणे , इराण , इराक , युक्रेन युद्ध यामध्ये सुद्धा मोदींच्या माध्यस्तीचा सहभाग असा देशपातळीवरच नव्हे तर , आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा आज मोदींच्या नावाचा दबदबा आपल्याला पाहायला मिळतो आहे.

एका बाजूला हे सगळं ठीक आहे. भारतीय जनता पार्टी मोदींच्या नेतृत्वात आज भारतामध्ये मोठ्या प्रमाणात लोकांच्या मनावर आपलं अधिराज्य निर्माण करण्यात यशस्वी होत आहे . परंतु , याच भारतीय जनता पार्टीच्या जुन्या सगळ्या कार्यकर्त्यांनी पक्षातल्या विविध पदाधिकाऱ्यांनी अनेक आमदार , खासदारांनी सुद्धा या भारतीय जनता पार्टीच्या कठीण प्रसंगापासून तर आजच्या विकसित भाजपापर्यंत अनेक अथक परिश्रम घेतलेले आहेत . सतरंज्या टाकणे, खुर्च्या लावणे, बॅनर बांधणे, निवडणुकीच्या काळात चिठ्ठ्या वाटणे, मतदानासाठी लोकांना घराबाहेर काढून मतदान केंद्रापर्यंत आणणे . या आणि अशा अनेक गोष्टींसाठी अनेक जुने एकनिष्ठ असलेले कार्यकर्ते , पदाधिकारी , आमदार , खासदार हे सगळे झटलेले आहेत . परंतु आता मात्र एक वेगळीच समस्या एक वेगळेच चित्र आपण पाहतो आहे . वेगवेगळ्या पक्षातून भाजपामध्ये प्रवेश करणाऱ्यांना आता भारतीय जनता पार्टीच्या विविध पदांवर लोकसभेची निवडणूक असो , खासदारकीची तिकीट असो , आमदारकीची तिकीट असो की ,मंत्री पदाची लॉटरी असो हे सगळं काही बाहेरच्या पक्षातून आलेल्या नवीन लोकांना देण्यात येत आहे. या सगळ्यामुळे सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न असा निर्माण होतो की , इतके वर्ष भारतीय जनता पार्टीच्य सामान्य परिस्थितीपासून तो आजच्या मोदींच्या नेतृत्वातील भाजपा पर्यंतचा प्रवासाचा विचार केला तर या सामान्य कार्यकर्त्यांपासून तर अनेक आमदार खासदारांनी या भारतीय जनता पार्टीच्या विकासासाठी प्रचंड परिश्रम घेतलेले आहेत , मेहनत घेतली आहे , आपला वेळ , पैसे दिलेले आहेत . परंतु बाहेरून येणाऱ्या नेत्यांना जर समजा वरची पद मिळत असतील , खासदारकीचे तिकीट असो की आमदारकीचे तिकीट असो की मंत्रीपदाची लॉटरी असो हे जर बाहेरून येणाऱ्या लोकांना मिळत असतील तर स्थानिक आणि जुन्या लोकांनी करायचं काय ? हा एक सगळ्यात मोठा प्रश्न आता भाजपामध्ये निर्माण झालेला आहे. आणि यातूनच भाजपा मध्ये आता अंतर्गत कलह तर निर्माण होणार नाहीत ना ? असा प्रश्नही निर्माण होत चाललाय . भाजपाचे विशिष्ट मतदार ठरलेले आहेत. या मतदारांच्या संख्येत आता कालपरत्वे बदल होताना आपण पाहतो आहे. अनेक नवे मतदार हे सुद्धा आता भाजपाकडे वळत आहेत. परंतु ,ज्या जुन्या मतदारांनी , ज्या जुन्या कार्यकर्त्यांनी भाजपावर विश्वास ठेवून भाजपाच्या आजच्या यशासाठी अथक परिश्रम घेतले हे सगळे लोकं आज मात्र आतून ढवळून निघत आहेत , मनात चलबिचल निर्माण झालेली आहे. कोणे एकेकाळी भाजपावर सडकून टीका करणारे, मोदींवर सडकून टीका करणारे , शहांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे , राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नावाने खडे फोडणारे विविध पक्षातील नेते तसेच , भ्रष्टाचाराच्या नावाखाली ज्यांना जेलमध्ये टाकण्याची भाषा ज्या भाजपाने केली असे नेते आज भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करीत आहेत . एका बाजूने राष्ट्राच्या पुनर्निर्माण कार्यासाठी अशा लोकांनाही आपल्या पक्षांमध्ये घेऊन त्यांना आपल्या विचार प्रवाहात आणत त्यांना या विकासाच्या प्रवासामध्ये किंवा प्रवाहामध्ये सामील करून घेणे हे योग्य असले तरीसुद्धा , राजकारणाच्या पातळीवर पाहू जाता आज एक अतिशय महत्त्वाची गोष्ट किंवा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न सामान्य कार्यकर्त्याला पडलेला आहे की कोणे एकेकाळी हे टीका करणारे लोक, कोणी एकेकाळी हे भ्रष्टाचाराच्या खाईत बुडलेले लोक आज भाजपासोबत जात आहेत . आणि भाजपासोबत गेल्यानंतर त्यांना त्या ठिकाणी सर्वोच्च स्थान मिळत आहे . उदाहरणादाखल नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपाच्या नावावर ज्या चार सीटा आलेल्या आहेत त्या चारही सीटा ज्या भाजपाच्या खात्यात असल्या तरी हे चारही लोक काँग्रेस पक्षाचेच होते . आणि काँग्रेस पक्षानी या सगळ्यांना मोठं केलं होतं . हे विसरून चालणार नाही. पण आज चारही लोकं भाजपाच्या राज्यसभेच्या चार जागा वर आपलं नाव करून बसलेले आहेत . समजा या ऐवजी भाजपाचे जुने निष्ठावान कार्यकर्ते, लोक, आमदार, खासदार किंवा विविध क्षेत्रातील काही मान्यवर जर समजा यांना या चार जागा मिळाल्या असत्या तर आज भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांच्या कष्टाचं चीज झालं असतं. परंतु त्या जागा आता नव्याने पक्षात प्रवेश करून पक्षात सामील झालेल्यांनी बळकावलेल्या आहेत. त्यामुळे कुठेतरी भाजपाचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते आणि पदाधिकारी हे मात्र आज कुठेतरी अंशतः खचलेले आहेत , रागावलेले आहेत आणि चिंताग्रस्त झालेले आहेत. की , हे नेमकं सगळं काय चाललंय ? याचा विचार करायलाही वेळ मिळत नाही , इतक्या झपाट्याने सगळे बदल होत आहेत.



भाजपाने पक्ष विस्तार निश्चितच करावा, भाजपाने या देशातील सामान्य नागरिकांचा विचार निश्चितच करावा ,भाजपाने या देशाला पुन्हा एकदा विश्वगुरूपदी आसनस्थ नक्कीच करावं ,आणि भाजपाने पुन्हा एकदा या देशावर पुढील पन्नास वर्ष राज्यही निश्चितच करावं . परंतु ,हे सगळं करत असताना या भाजपा पक्षासाठी ज्या जुन्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांनी आपला वेळ ,आपले श्रम ,आपला पैसा, आपली ताकद , प्रसंगी आपला परिवार सुद्धा या पक्षासाठी ज्यांनी वाऱ्यावर सोडला त्यांच्या कष्टाचं चीज व्हावं . त्यांच्या वेळेचे चीज व्हावं .आणि, त्यांनी जो विश्वास या भाजपावर टाकलेला होता तो विश्वास तसाच कायम राहावा यासाठी जुन्या जाणत्या आणि एकनिष्ठ कार्यकर्त्यांचाही विचार मात्र भाजपाने वेळोवेळी करायला हवा एवढेच प्रामाणिकपणे वाटतं . पक्ष विस्ताराच्या पातळीवर आपल्या जुन्या कार्यकर्त्यांना विसरून जर येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सत्कार समारंभाचे सोहळे होत असतील तर अशावेळी जुने अडगळीत पडलेले निष्ठावंत कार्यकर्ते हे एक दिवस तुम्हालाही सोडून जातील आणि त्यातून पुन्हा एकदा उलट प्रवास सुरू होईल, अशी वेळ भाजपावर कधीही येऊ नये म्हणून हा लेखन प्रपंच .




# महंत योगी श्री मनोहरनाथ बाबांची पुण्यतिथी संतपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** शहराच्या पूर्वेस प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या श्री क्षेत्र मध्यमेश्वर मंदिरात महंत ब्रम्हलिन योगी मनोहरनाथ बाबा यांची २३ वी पुण्यतिथी मंदिराचे मठाधिपती महंत श्री ऋषीनाथजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संतपूजन व कीर्तन सोहळयाने साजरी करण्यात आली. महंत योगी मनोहरनाथ बाबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने देवगड देवस्थानचे महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज व मध्यमेश्वर देवस्थानचे प्रमुख महंत बालयोगी श्री ऋषिनाथजी महाराज यांच्या हस्ते योगी मनोहरनाथ बाबांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.यावेळी सकाळी ९ वाजता बाबांच्या भक्त परिवारातील सेवेकरी रामनाथ महाराज पवार,विजय महाराज पवार रामभाऊ महाराज आढाव,दिनकर महाराज हारदे,संतसेवक गोपीनाथ महाराज कोरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत योगी मनोहरनाथ बाबा यांच्या चरित्र ग्रंथाचे पारायण करण्यात आले.त्यानंतर पुनतगाव येथील बालयोगी महंत श्री दीपकनाथजी महाराज यांचे हरिकीर्तन झाले. यावेळी झालेल्या संतपूजन कार्यक्रम प्रसंगी महंत विष्णूदेवानंद भारती,स्वामी रामानंद सरस्वती,मुकाई आश्रमाचे प्रमुख महंत गोपालानंदगिरी महाराज,मुंबादेवी देवस्थानचे महंत बृहस्पतीनाथ महाराज,महंत योगी धर्मनाथ महाराज,महंत बाळकृष्ण महाराज,महंत पंचमपुरीजी महाराज,बालयोगी महंत विश्वनाथगिरीजी महाराज,स्वामी माधवानंदगिरी महाराज,महंत सुदर्शन नाथजी महाराज,महंत सीताराम महाराज,महंत भगवंतपुरीजी महाराज यांचे संतपूजन महंत ऋषिनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. संतपूजन सोहळयासाठी आमदार शंकरराव गडाख यांनी योगदान दिले तर सोहळयासाठी योगदान देणाऱ्यांचा सन्मान सत्काराद्वारे करण्यात आला.नाथपंथी महंत व वारकरी संप्रदायातील संत एकत्रित आल्याने हरि आणि हर यांचा मिलाप ही यावेळी पहावयास मिळाला. याप्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, हभप कोंडीराम महाराज पेचे, अमृतानंद महाराज कांकरिया,ज्ञानेश्वर महाराज हजारे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,गायनाचार्य सचिन महाराज पवार, लक्ष्मण महाराज नांगरे,मध्यमेश्वर भक्त मंडळाचे सेवेकरी मुरलीधर कराळे,रामभाऊ जगताप,लक्ष्मण जगताप, रामभाऊ सुरोसे,अन्नदाते विलासभाऊ नांगरे,गायनाचार्य शंकर महाराज तनपूरे,दत्तात्रय गायकवाड,पिंटूभाऊ परदेशी, सचिन सावंत,गणेश कोरेकर यांच्यासह नाशिक भगूर येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना नाथभक्त विलासभाऊ नांगरे व परीवाराच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसाद वाटपासाठी मध्यमेश्वर युवा प्रतिष्ठान, योगी मनोहरनाथ बाबा भक्त मंडळ,किसनगिरी बाबा तरुण मंडळाचे कार्यकर्ते यांनी स्वयंसेवकांची भूमिका बजावून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी झालेल्या संतपूजन सोहळयाचे सूत्रसंचालन केले तर महंत ऋषिनाथ महाराज यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले. पसायदानाने पुण्यतिथी सोहळयाची सांगता करण्यात आली.

## निकृष्ट दर्जाहीन कामांची केली लेखी तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे बोडखा ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या विकास कामे निकृष्ट दर्जाहिन झाल्याची लेखी तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. बोडखा ग्रामपंचायत अंतर्गत खासदार इम्तियाज जलील साहेब यांच्या विकास निधीतून येथे कब्रस्तान मध्ये पेव्हर ब्लॉक व सुशोभीकरण काम करण्यात आले काम करतांना काम अतिशय निकृष्ट व दर्जाहिन झालेले आहे.तर व त्यावरच दुसऱ्या पक्षांचे पदाधिकारी पुन्हा त्याकामावर काम करण्याचा प्रयत्न करत आहे.पुर्वीच निकृष्ट दर्जाहिन काम तात्कालिक सरपंच व ग्रामसेवक तथा शाखाभियंता यांनी कशा प्रकारे काम मंजूर करुन घेतले आजरोजी त्याकामाची दुरावस्था आहे.तर त्याचे हस्तांतरित प्रमाणपत्र देण्यात आले आहे.त्या निकृष्ट दर्जाहिन दर्जाच्या विकास कामा संदर्भात गटविकास अधिकारी पंचायत समिती खुलताबाद यांच्याकडे लेखी तक्रार देवून चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या तक्रारीवर पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते अक्रम पटेल, अरफात शहा,वसीम पटेल, मुस्ताक पटेल, इम्रान पटेल, तालेब पटेल, इस्माईल पटेल, तालेब पाश्शु पटेल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शाळा आदर्श मात्र दहावीचा अभ्यासक्रम अपूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा केंद्र अंतर्गत येणारी बोरसर येथील जिल्हा परिषद आदर्श शाळात इयत्ता दहावीचा अभ्यासक्रम अजूनही पूर्ण नसल्याने शाळा आदर्श नाममात्र म्हणावी लागेल. एक मार्च पासून 10 वी बोर्ड परीक्षेस सुरुवात होत असून अजूनही मुलांचा अभ्यासक्रम जर शाळेत पूर्ण होत नसेल तर परिणामी परीक्षा केंद्रावर स्वतः शिक्षक कॉपी पुरवतात किंवा विद्यार्थी कॉपी करतात मुळात विद्यार्थ्यांना कॉपी करून दिली जाते. दिलेल्या शैक्षणिक वर्षात वार्षिक नियोजन नुसार संबंधित विषय शिक्षक यांनी जर आपले अध्यापन कार्य व्यवस्थित पार पाडले तर मुलांना कॉपी करण्याची वेळच येणार नाही असे बोरसर येथील पालकांचे म्हणणे आहे. गणित व इंग्रजी सारख्या अवघड विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण नसल्याने बोरसर येथील इयत्ता दहावीच्या मुलांच्या मनात परीक्षेची भीती असून लवकरच त्यांना परीक्षेचा सामना करावा लागणार आहे.

गणित विषयाचे सालाबादप्रमाणे याहिवर्षी होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालक व लोकसहभागातुन येथे शिक्षक उपलब्ध होऊन सुद्धा अभ्यासक्रम पूर्ण नाही तसेच येथील जिल्हा परिषद आदर्श शाळा बोरसर चे मुख्याध्यापक प्रकाश शिंपी यांचा सुद्धा इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम अपूर्ण असून दहावी बोर्ड परीक्षेची तयारी परिपूर्ण झाली.



नसल्याने येथील विद्यार्थ्यात भीतीचे वातावरण असून अशीच काही परिस्थिती वैजापूर तालुक्यातील बऱ्याच शाळामध्ये बघावयास मिळत आहे.यावर गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांचा अंकुश असणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष वर्गात शिक्षक उपस्थित असताना अधिकारी आल्यास विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे असे खोटे सांगतात कारण विदयार्थ्यांना तुम्हाला टी सी दिली जाईल अशी तोंडी धमकी देण्याचे प्रकार सुद्धा काही शाळेत बघावयास मिळत आहे.येथील काही विद्यार्थी खाजगी शिकवणीचा लाभ जरी घेत असेल पण उर्वरित विद्यार्थ्यांचे काय असा प्रश्न यावेळी निर्माण होतो. आता अभ्यासक्रम पूर्ण नसणाऱ्या शाळा कोणत्या व तेथील शिक्षक वर्षभर नेमके काय कार्य करतात हा जिज्ञासेचा विषय आहे.

शिक्षक उशीरा शाळेत येणे व लवकर घरी जाणे याबाबत मला काही माहिती नाही . मी मुख्याध्यापक यांच्याकडून माहिती घेऊन याबाबत सांगू शकतो तसेच अपूर्ण अभ्यासक्रम याबाबत सुद्धा माहिती घेऊन सांगतो .**हेमंत उशीर, गटशिक्षणाधिकारी वैजापूर**

**एक शिक्षक तर 'आओ जाओ घर तुम्हारा'** : याच शाळेत कार्यरत असलेले शिक्षक प्रवीणकुमार पांढरे हे या शाळेत रुजू झाल्यापासून नियमित शाळेत उशीरा येणे व शाळातून लवकर घरी जाणें हा त्यांचा दिनक्रम असून येथील मुख्याध्यापक यांचा सदरील शिक्षकांवर लगाम नसल्याचे दिसून येत आहे . सदरील शिक्षक येथील इयत्ता पाचवीचे संपूर्ण विषय शिकवतात व इयत्ता सहावी व सातवी या वर्गांवर इंग्रजी सुद्धा मग उशिरा येणे लवकर जाणे यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होताना दिसून येत आहे कारण सदरील शिक्षक हे छत्रपती संभाजीनगर येथून रेल्वे ने ये जा करत असल्यामुळे हा खेळ येथे सुरु असून यावर संबंधित शैक्षणिक विभागाने लक्ष देणे गरजेचे असून असे तालुक्यातील किती शिक्षक हा प्रकार करतात या संदर्भात कारवाई होणे गरजेचे आहे असे नागरिकांचे म्हणणे आहे .

## लोणीखुर्द येथे मराठा आरक्षणासाठी मुंडन आंदोलन, रास्ता रोको...!

### जरांगे पाटलांचे काही बरे-वाईट झाले तर होणारा उद्रेक सरकारला पेलणार नाही : अजय पाटील साळुंके

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापुरः** तालुक्यातील लोणीखुर्द येथे मराठा आरक्षणासाठी व मनोज जरांगे पाटील समर्थनार्थ रास्ता रोको.मुंडन आंदोलन करून शासनाचा निषेध करण्यात आला मराठा समाजाला न्यायालयात टिकेल असे मनोज जरांगे पाटील यांच्या मागणी प्रमाणे आरक्षण देण्यात यावे.मनोज जरांगे पाटील सात दिवसापासून अन्नत्याग आंदोलन सुरु केले होते. त्याची प्रकृती खालवल्यामुळे यावेळी परिसरातील या आंदोलनास पाठिंबा म्हणून परीसरातील नागरिकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी करीत रास्ता रोको करण्यात आला यावेळेस पाच किलोमीटर पर्यंत वाहणाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी बोलतांना अजय साळुंके म्हणाले मराठा आरक्षणासाठी जिव गेला तरी बेहत्तर अता मागार नाही.मराठा आरक्षण चळवळ टिकवून आदोलनाची धग कायम ठेवा आशी भावनिक साध घालत आण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी स्वाःतालाबब गोडी झाडून आपल्या



प्रणाली आहुती दिली. काकासाहेब शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठीव जलसमाधी घेतली.यांच्यासह आनेकांनी बलिदान दिले आहेत.त्यांचे बलिदान आम्ही व्यर्थ जावु देऊ नका मराठा समाजाचा केवळ वापर मराठाच समाजातील नेत्यांनी केला शंड आणी स्वतःच्या राजकीय पोळ्या भाजनार्या नेत्यांमुळे मराठा समाजाची हि आवस्था झाली आसुन जरांडे पाटलांच्या जिवाचे काही वर्षात वाईट झाल्यास राज्यात राजकीय लोकांना रसत्याने फिरणे आवघड होईल. समाज पेटून उठलेला आसतांना शंड म्हणून थंड बसलेल्या राजकीय नेत्यांना समाज माफ करणार नाहीत. मतदानरुपी हत्यारातुन मराठा समाज यांची राजकीय हत्या केल्या शिवाय शांत बसणार नाहीत आशा आक्रमक शब्दात अजय पाटील यांनी संताप व्यक्त केला.यावेळी चंद्रशेखर सांळुके बोलतांना म्हणाले जरांगें पाटलांनी सांगितले आहे विस तारखेपर्यंत थांबा म्हणून सरकारनेच वेळीच निर्णय घेतला नाहितर सरणावर बसुन अग्नी समाधी घेणार आहेत. होणार्या परीनामाला सरकार जाबादार राहिल. आंदोलनास दरम्यान मुंडन करतांना भुजबळांनी केलेल्या त्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेत आजित पवार देवेंद्र फडणवीस हे दोघेही मराठा आरक्षण विषयांवर समोर येत नाहीत फक्त मुख्यमंजी एकनाथ शिंदे हेच एकमेव मराठा आरक्षणासाठी सकारात्मक आहेत आसे नितिन निकम म्हणाले.

यावेळेस अजय पाटील साळुंके.अर्चनाताई साळुंके प्रशांत सदाफळ.चंद्रशेखर साळुंके.सुनिल बोडखे. उत्तमराव निकम.डॉ.अर्जुन साळुके.प्रमोद जिवरग नितीन निकम.काशिनाथ कोकटे प्रशांत निकम. किशोर मगर.आमोल निकम.राजेंद्र जगदाळे.एनडीए निकम यांची भाषणे झालीत मराठा आरक्षणाच्या मागणीच्या आंदोलनाची धार तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.यावेळेस पोलीस पाटिल रावसाहेब सोमासे व शिऊर पोलीस स्टेशनच्या आधिकर्यानी चोख बंदोबस्त ठेवला यावेळेस पंचक्रोशीतील मराठा. मुस्लीम ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# १ मार्चपासून शासकीय विकास कामे बंद करणार ?

## निविदांवर बहिष्कार घालणार : राज्यातील कंत्राटदारांचा राज्यस्तरीय बैठकीत शासनास इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शासन स्तरावर प्रस्थावित मागण्या संदर्भात २८ फेब्रुवारी २०२४ पर्यत शासन बैठक घेऊन निर्णय न घेतल्यास १ मार्च २०२४ पासुन राज्यातील सर्व विभागाकडील सुरू असलेली विकासाची कामे बंद करणार व विकासाच्या कामांच्या निविदांवर बहिष्कार घालण्याचा एकमताने निर्णय शुक्रवार दि १६ फेब्रुवारी रोजी खुलताबाद मध्ये राज्यातील महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ,विदर्भ कंत्राटदार असोसिएशन, राज्य अभियंता संघटना या प्रमुख संघटनेच्या ३० जिल्हाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत बैठकीत एकमुखाने निर्णय घेण्यात आला आहे.या बैठकीस राज्यातील सर्व संघटनेचे पदाधिकारी , सदस्य व कंत्राटदार उपस्थित होते. वरील सर्व संघटनेने राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, ग्रामविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, जलसंधारण मंत्री यांच्या कडे सदर खालील दिलेल्या मागण्यांचे सविस्तर निवेदनपत्र व सदर इशारा पत्र दिले आहे. या बैठकीत महाराष्ट्रातील सर्व विभागाकडील




विकासांच्या कामांना व कंत्राटदार यांनी केलेल्या कामांच्या देयकांना तातडीने संपूर्ण निधीची व्यवस्था करावी, राज्यातील सर्व विभागाकडील शासनाची कामे करताना सर्व मान्यताप्राप्त कंत्राटदार यांची जिवितहानी होऊ नये यासाठी कंत्राटदार यांस संरक्षण कायदा व तसेच काम करून न देणारे व इतर बाबी साठी अडथळा आणणारे अशा संबधितावर गुन्हा दाखल करण्याची परवानगी कंत्राटदार यांस देणे असा शासन निर्णय पारित करावा, राज्यातील सर्व विभागाकडील विकासाची कामे प्रशासकीय स्तरावर मंजुरी करतानाच संबंधित कामांना संपूर्ण निधीची व्यवस्था करावी, छोटे कंत्राटदार, सुबे अभियंता व विकासक यांची प्रंचड संख्या पहाता नियमबाह्य पद्धतीने छोटे कामांचे होणारे एकत्रीकरण करणे तातडीने बंद करावे. व छोट्या निविदा प्रसिद्ध करावे. यासह इतर मागण्या बाबत शासनाने सदर संघटनेच्या पदाधिका-यांसोबत २८ फेब्रुवारी २०२४ आत बैठक आयोजित करावी व यातुन सकारात्मक मार्ग काढावा असे शासनास कळविले आहे. अन्यथा १ मार्च २०२४ पासुन राज्यातील सर्व विभागाकडील विकास कामे बंद व ठप्प करण्याचा व शासनाच्या सर्व विभागाच्या प्रसिद्ध होणाऱ्या निविदांवर बहिष्कार घालण्याचा इशारा आज छत्रपती संभाजी नगर येथे शुक्रवार दि १६ रोजी पार पडलेल्या बैठकीत एकमताने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार संघ व राज्य अभियंता संघटनेचे राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे, विदर्भ कंत्राटदार असोसिएशन अध्यक्ष नितिन डहाके, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार संघाचे कार्याध्यक्ष संजय मैंद,विभागीय अध्यक्ष अनिल पाटील, सुरेश कडु, प्रकाश पांडव, सुबोध सरोदे, संस्थापक निवास लाड( बापु), रविंद्र चव्हाण, राजेश आसेगावकर, कैलास लांडे, प्रसिद्ध प्रमुख कौशिक देशमुख, नरेंद्र भोसले सुशील खेडकर ,राजू वरकड, प्रवीण जैन, रवी माहोरकर,,भाऊसाहेब मुंडवाडकर,अरविंद वाडोणकर, अजीम सिद्दिकी, मनोज गायके, रमजान चारनिया ,जयप्रकाश नारनवरे, विनायक चव्हाण, हेमंत खेडकर, अजिम सिद्दिकी, सतीश शितोळे, मुकरम सिद्दिकी ,सचिन, वाकळे, योगीराज देशमुख ,शेख अत्तर ,संजय टेलर, आप्पासाहेब कोलते यासह राज्यभरातील पदाधिका-यांनी शासनास दिला आहे.

## बाजार समिती यार्डात मिळाला कापसाला भाव

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** यंदाच्या कापूस हंगामात गत दोन दिवसांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डात येणाऱ्या कापसाच्या भावात वाढ होत आहे.बाजार समिती अंतर्गत खुल्या हराशी द्वारे शुक्रवारी कापसाला सर्वाधिक ७ हजार ५०० रुपये भाव कापूस उत्पादकांना मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती समाधान शिंगणे यांनी दिली आहे.

गेल्या वर्षी कापसाला बऱ्यापैकी भाव होता त्यामुळे कापसासाठी प्रसिद्ध असणाऱ्या देऊळगाव राजा तालुक्यात यावर्षी मोठ्या प्रमाणात कापसाची लागवड झाली होती लागवड झालेली असताना शेतकऱ्यांना अस्मानी संकटासह अनेक संकटांना सामोरे जावे लागले त्यात कापूस हंगामाच्या सुरुवातीला अपेक्षेपेक्षा कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी एक प्रकारे निराशा पडली होती,आपल्या परिसरातील शेतकऱ्यांसाठी बाजार समितीचे सभापती समाधान शिंगणे यांनी बाजार समितीच्या माध्यमातून शासकीय खरेदी केंद्र सुरू करून हमीभाव मिळवून दिला. कापुस बाजार भाव मध्ये सुधारणा झाल्याने बाजार समिती यार्डात कापूस खरेदीदार व्यापाऱ्यांमध्ये चढाओढीने बोली लावल्या जात आहे. शेतकऱ्यांचा हमीभावाकडे कल वाढल्याने त्याचा परिणाम खाजगी क्षेत्रात कापूस खरेदीदारावर झाल्याने कापसाचे भाव वाढले. बाजार समितीच्या कापूस यार्डात कापसाचे आवक वाढली अन् चांगल्या कापसाला सात हजार पाचशे रुपये भाव मिळाला हा यावर्षीचा सर्वाधिक भाव असल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**कापूस विक्रीसाठी बाजार समितीतच आणा :** समाधान शिंगणे



सध्या कापसाच्या भावात सुधारणा होत आहे .कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य मोबदला मिळावा यासाठी बाजार समितीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहे, शेतकऱ्यांनी आपल्या कापसाला चांगला भाव मिळावा यासाठी आपला कापूस बाजार समितीच्या कापूस यार्डात विक्रीसाठी आणावा, असे आवाहन सभापती समाधान शिंगणे यांनी केले आहे .

## रखडलेल्या विकासकामांची मुख्याधिकाऱ्यांनी केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील प्रभाग क्र २ मधील रखडलेल्या विकास कामे करावे या मथळ्याखाली दि 8 फेब्रुवारी 2024 रोजी दै. आधुनिक केसरी मध्ये बातमी प्रसारीत केली होती लागलीच
नगरपरिषद मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांनी प्रभाग क्र .2 व 5 ची पाहणी केली असुन समाजसेवक संतोष पवार यांनी प्रभाग क्र. 2 व 5 मधील गणेश कॉलनी, आदर्श कॉलनी, श्रीराम कॉलनी आणि विवेकानंद कॉलनी येथील खराब रस्ते, अस्वच्छ नाल्या व अनियमित पाणीपुरवठा या संदर्भात उपाययोजना करण्यात याव्यात नाहीतर नगरपालिका समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला होता. याची दखल घेत दैनिक आधुनिक केसरीने बातमी घेताच स्वतः नगरपालिका मुख्याधिकारी नंदकुमार भोंबे , सोनार



इंजिनियर , प्रमोद तुपे व नगरपालिका कर्मचारी यांनी पाहणी केली. तसेच या भागातील नाल्या साफसफाई दोन दिवसात करून, ज्या ठिकाणी नालीवरील ढापे फुटले आहे ते तात्काळ दुरुस्त करण्याचे सांगितले. तसेच ड्रेनेज व रस्ते यासाठी प्रस्ताव तयार करुन काम करून देण्याचे आश्वासन देखील देण्यात आले तसेच पाणी टंचाईसाठी या भागातील सर्व सार्वजनिक हॅन्डपंप दुरुस्त करण्याचे सांगितले. यावेळी संतोष पवार, प्रा.रितेश राठोड, गायकवाड साहेब, दिलीप शहरवाले, आहिरे काका, प्रमोद चव्हाण, घुगे सर, नलावडे साहेब, आग्रे साहेब, पिंटू चव्हाण, सूर्यवंशी सर, राजपूत अण्णा, सुमित सोमवंशी, कापुरे सर, भदाने काका परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## दरोड्याच्या तयारीतील टोळी पकडली; दोन कारसह सात जणांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तालुक्यातील शिर्डी-नाशिक मार्गावर देर्डे-कोऱ्हाळे फाट्यानजीक काल मध्यरात्रीच्या सुमारास गुप्त माहितीनुसार टाकलेल्या धाडीत तलवार,लोखंडी कत्ती, कटवणी,लाकडी दांडके,मिरची पूड आदी साहित्यासह दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेली टोळीतील सदस्य मयूर उर्फ भुऱ्या अनिल गायकवाड,अमोल उर्फ ऋतूंजय अविनाश कुंदे,समाधान देविदास राठोड,संदीप पुंजा बनकर,उमेश तानाजी वायदंडे,गणेश भिकुनाथ तेलोरे,राहुल शिवाजी शिदोरे आदी राहाता व कोपरगाव तालुक्यातील सात दरोडेखोरांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अटक केली असून दोन जण फरार झाले आहे.त्यांच्या ताब्यातील दोन चार चाकी वाहने जप्त केली असल्याचे राहाता-कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.

स्थानिक गुन्हा शाखेच्या पोलिसांची काल दि.१५ फेब्रुवारी रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक ओला यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असणाऱ्या पथकास एक सुझुकी एर्टीगा चार चाकी वाहन (क्रं. एम.एच.१३ सी.एस.३०५४) व एक पांढरे रंगाची व्होक्सवॅगन विंटो कार क्रं.एम.एच.०१ बी.एफ.६६३३) या संशयास्पद स्थितीत आढळून आल्या होत्या.नगर पोलिसांनी या प्रकरणी आपला मोर्चा सदर गाड्यांकडे वळवून त्या ठिकाणी धाड टाकली असता त्या ठिकाणी असलेले दोन संशयित इसम पळून जाण्यात यशस्वी झाले आहे.तर अन्य सात जण जागेवरच अटक केले आहे.त्या संशयित इसमांची चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली होती.त्यामुळे पोलीसांचा त्यांच्यावर संशय बळावला होता.त्यांनी अधिकची चौकशी केली असता व गाड्यांची झाडाझडती केली असता सदर गाड्यात एक तलवार,एक लोखंडी कत्ती,एक कटवणी,एक लाकडी दांडके,मिरची पूड आदी बेकायदा साहित्य आढळून आले होते.त्या बाबत त्यांनी पोलिसांना समाधानकारक उत्तरे देऊ शकले नाही यावरून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले असता व अधिकची चौकशी केली असता त्यांनी हे साहित्य दरोडा टाकण्याच्या इराद्याने एकत्र केले होते अशी गंभीर बाब उघड झाली आहे. दरम्यान त्यांनी सदर साहित्य हे दरोडा टाकण्याच्या तयारीने एकत्र केले असल्याचे उघड झाले आहे.त्यामुळे घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक संदीप कोळी व पोलीस उपनिरीक्षक समाधान भाटेवाल यांनी घटनास्थळी भेट दिली असून आरोपीना आपल्या ताब्यात घेतले आहे. दरम्यान त्या टोळीतील सदस्य मयूर उर्फ भुऱ्या अनिल गायकवाड,(वय-२१),रा.१०५ इंदिरानगर कोपरगाव,अमोल उर्फ ऋतूंजय अविनाश कुंदे,(वय-२०)रा.एकरुखे,ता.राहाता.समाधान देविदास राठोड,(वय-२३) करंजी ता.कोपरगाव.संदीप पुंजा बनकर,(वय-३३)रा.द्वारकांनगर बनरोड शिर्डी,उमेश तानाजी वायदंडे,(वय-२७) गणेश भिकुनाथ तेलोरे,दोघे रा.गणेशनगर ता.राहाता.राहुल शिवाजी शिदोरे गोकुळनगरी कोपरगाव आदी राहाता व कोपरगाव तालुक्यातील सात दरोडेखोरांना अटक केली असून त्यांच्या ताब्यातील दोन चार चाकी वाहने जप्त केली असल्याचे राहाता-कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे. दरम्यान यातील आरोपी भुऱ्या अनिल गायकवाड याचे विरुद्ध कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गंभीर प्रकारचे दोन गुन्हे असून एक राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असून त्यात तेथे त्यावर मोक्का गुन्हा दाखल असून त्यात तो फरार आहे.

## वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी सरसावला अजिंठा वनविभाग : वनपरिक्षेत्र अधिकारी सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे परब्रम्ह परेमश्वर अवतार भगवान श्रीचक्रधर स्वामीची भव्य यात्रा २२ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२४ पर्यंत असणार आहे या यात्रेला राज्य परराज्यातून भाविक भक्त आपले वाहने घेऊन येतात तर वन्यप्राणी यांची काळजी घ्यावी, असे आवाहन वन परिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांनी केले आहे.सावळदबारा व फर्दापूर परिसरात बऱ्याच वेळा वाहनांकडून वन्य प्राणी जखमी अथवा मयत होण्याच्या घटना समोर आलेल्या असल्यामुळे वाहनांच्या धडकेत वन्य प्राणी जखमी अथवा मयत झालेल्या असल्याच्या घटना समोर आलेल्या असल्यामुळे या घटना रोखण्यासाठी अजिंठा वनविभाग सरसावलेल्या असल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात दिसुन येत आहे. अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे, वनपाल अविनाश राठोड, वनरक्षक सुनील खरडे, नन्नावरे,बबन राठोड,चाटे, वनमजूर प्रवीण सोनवणे,ईशुब पठाण यांच्या संकल्पनेतून सोयगाव तालुक्यातील गिरडा घाट, अजिंठा घाट अभायारण्य अशा ठिकाणी वन्यप्राण्यांची काळजी घेण्याचे फलक बसविण्यात आलेले आहेत. छत्रपती संभाजीनगर ते जळगाव आणि सावळदबारा येथे ते बुलढाणा रोडवर वन्यप्राणी वावरत असल्याने वाहन धारकांनी वन्य क्षेत्रातून वाहन चालवतांना वन्य प्राणी वाहनांना आडवे येणार नाहीत अन् वाहनकांकडून त्यांच्या जिवीतास धोका होणार नाही याची खबरदारी घेत वाहन चालवण्याचे आवाहन देखील वाहन धारकांना अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे वनपाल अविनाश राठोड व वन कर्मचारी यांनी केले आहे. मोर, बिबट्या, हरीण, ससे, अस्वल सह आदी वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात सावळदबारा परिसरात व फर्दापूर येथे आढळून येत आहेत अशा वन्यप्राण्यांची शिकार अथवा अपघाती मृत्यु होणार नाही यासाठी अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे,वनपाल अविनाश राठोड व वनरक्षक खबरदारी घेत आहेत. यासाठी वन्यप्राणी मित्रांची देखील मदत घेण्यात येत आहे.

**वन्यप्राण्यांची काळजी घ्यावी-घ्यावी :** अजिंठा घाट,गिरडाघाट अभयारण्य परिसरात



वन्यप्राणी वावरत असतात त्यांचे संगोपन करण्याचे काम हे वनविभाग प्रमाणिकपणे करत आहे परंतु अनावधानाने वाहनांकडून वन्यप्राण्यांच्या जिवीतास धोका निर्माण होत असल्या कारणाने वन्यप्राणी असलेल्या ठिकाणी वन्य प्राणी असल्याचे बॅनर लावले आहेत . यामुळे वाहन धारकांना वन्यप्राणी क्षेत्र असल्याची माहिती मिळत असल्याची माहिती अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे यांनी दिली .

# शिवछत्रपती अभिवाचन स्पर्धेत पाठ्यपुस्तकाचे अभिवाचन

## 5 गटातून 20 विजेते : छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्थेचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** शिवजयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित इयत्ता चौथीच्या शिवछत्रपती पाठ्यपुस्तक अभिवाचन स्पर्धेत शहरासह तालुक्यातील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. सुमारे 350 विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र तर 5 गटातून 20 विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. भुसावळ येथील म्युनिसिपल हायस्कूलमध्ये आयोजित शिवछत्रपती अभिवाचन स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष युवराज लोणारी तर प्रमुख पाहुणे माजी शिक्षण सभापती राजेंद्र आवटे, मुख्याध्यापक ललितकुमार फिरके, माजी नगरसेवक दीपक धांडे, योगविद्या समितीच्या प्रभारी महानंदाताई पाटील, वेलनेस फाऊंडेशनचे प्रा. निलेश गोरे, भूलतज्ज्ञ डॉ. मिलिंद धांडे, संस्थाध्यक्ष दंगल पाटील, समन्वयक संजीव पाटील, सचिव डॉ. जगदीश पाटील उपस्थित होते. दीपप्रज्वलन व छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर दंगल पाटील यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षणशास्त्रात नेट उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ. जगदीश पाटील यांचा म्युनिसिपल हायस्कूलतर्फे मुख्याध्यापक ललितकुमार फिरके यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. गटशिक्षणाधिकारी किशोर वायकोळे यांनी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय मनोगत युवराज लोणारी यांनी मांडले. अभिवाचन स्पर्धेविषयी डॉ. जगदीश पाटील यांनी माहिती देऊन स्पर्धेसाठी वर्गवार बसण्याचे नियोजन सांगितले. त्यानुसार सुमारे 350 विद्यार्थ्यांनी आपापल्या गटातील वर्गात अभिवाचन स्पर्धेत सादरीकरण केले. त्यानंतर पारितोषिक



वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी महेंद्रसिंग ठाकूर (पिंटू), माजी नगरसेवक नितीन धांडे, मुख्याध्यापक ललितकुमार फिरके, सामाजिक कार्यकर्ते रूपेश देशमुख, वेलनेस फाऊंडेशनचे प्रा. निलेश गोरे, प्रा. तेजस्वी महाजन उपस्थित होते. विजेते व परिक्षकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. जगदीश पाटील यांनी तर आभार संजीव पाटील यांनी मानले.

सुजाण परीक्षकांकडून मूल्यमापन - स्पर्धेत संजय ताडेकर, हेमांगिनी चौधरी विजय वाघ, संध्या धांडे, प्रा. तेजस्वी महाजन, प्रा निलेश गोरे, शिशीर जावळे, डॉ. मिलिंद धांडे, नीलिमा जोशी, दीपमाला पाटील, संध्या भोळे, शैलेंद्र वासकर, शैलेंद्र महाजन, बी.बी. जोगी, डॉ. नरेंद्र महाले, प्रदीप साखरे, मालती भिरूड आदी सुजाण परीक्षकांनी मूल्यमापन केले.

5 गटातील 20 विजेते असे - पहिल्या गटात प्रथम भुवनेश निळे व प्रांजल चौधरी, द्वितीय तोशिष पाटील व हर्षा बारी, तृतीय गुंजन राणे व वृंदा पाटील, उत्तेजनार्थ श्रद्धा घ्यार व नेहा बारी. दुसऱ्या गटात प्रथम हंसिका महाले व सोनाक्षी प्रजापती, द्वितीय ज्ञानेश्वरी नेहेते व वरद फेगडे, तृतीय मानस पाटील व साम्यता खंडेराव, उत्तेजनार्थ समृद्धी वाघ व रेणुका क्षीरसागर. तिसऱ्या गटात प्रथम गौरी अहिर, द्वितीय आकांक्षा पाटील तृतीय कल्याणी पाटील, उत्तेजनार्थ लिंसीका पाटील.

# उद्योजिका ऊर्मिलाताई पवार यांच्या वतीने शहरात हळदी-कुंकू

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मकर संक्रांत म्हणजे महीलांचा जिव्हाळ्याचा सन परंपरेप्रमाणे कन्नड शहरातील उदयोजीका उर्मिलाताई पवार व त्यांच्या परिवाराच्या वतीने तीळ गुळ घ्या गोड गोड बोला "मकर संक्रांत" निमित्त कन्नड शहरातील महिला भगिनी यांच्यासाठी जैन कॉम्प्लेक्स पिशोर नाका येथे आयोजित हळदी कुंकुचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता आयोजक - उद्योजिका उर्मिलाताई मनोज पवार यांच्या वतीने आलेल्या सर्व महिला भगिनी यांना "हळद कुंकू व भेट वस्तूचे वाटप" करण्यात आले. कन्नड शहरातील सुमारे दोन ते तीन हजार महिला भगिनीनी सहभाग नोंदवला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उद्योजक मनोज भाऊ पवार मित्रमंडळाने परिश्रम घेतले.



# विद्यार्थ्यांनी लुटला सहलीचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** जि प शाळा खडकी सदार शाळेतीलविद्यार्थ्यांनी अजिंठा, जाळीचा देव, हिवरा आश्रम येथे गेली. सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अजिंठा लेण्या बघीतल्या व त्या ठिकाणी सर्व लेण्यांविषयी माहिती घेत, छायाचित्रे काढत विद्यार्थ्यांनी ठळक, महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या वहीत उतरवून घेतल्या. परदेशी पाहुण्यांसोबत संवाद साधला. विद्यार्थ्यांनी हिवरा आश्रम येथील स्वामी विवेकानंद यांच्या स्मारकाला भेट दिली. विवेकानंद आश्रम शुकदास महाराजांसाठी ओळखला जातो. परंतु महाराजांचे निधन झाले तरीही येथील व्यवस्था महाराजांच्या शिस्ती प्रमाणेच दिसून येते. शुकदास महाराजांनी १४ जानेवारी १९६५ रोजी मेहकर ते चिखली महामार्गावर हिवरा आश्रम गावी या विवेकानंद आश्रमची लोकसेवेसाठी स्थापना केली. विवेकानंद आश्रमाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा आहे.

# नेहरू युवा केंद्रात सात जिल्ह्यांची व्हर्चुअल जिल्हा युवा संसद भाषण प्रतियोगिता संपन्न




आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय अंतर्गत कार्यरत असलेल्या नेहरू युवा केंद्र धुळे कार्यालयात सहनिवार दि. १७ फेब्रुवारी रोजी 'व्हर्चुअल जिल्हा युवा संसद भाषण प्रतियोगिता' संपन्न झाली. यात छत्रपती संभाजीनगर, नंदुरबार, धुळे, जालना, लातूर, नांदेड, नाशिक या सात जिल्ह्यांमधून प्रत्येक जिल्ह्यातून १० याप्रमाणे एकूण ७० स्पर्धक सहभागी झाले होते. प्रत्येक स्पर्धकाला भाषणासाठी ४ मिनिटे वेळ देण्यात आला होता. स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषांमध्ये झाली. स्पर्धेसाठी 'भारत को वैश्विक नेता बनाना-भारत की आर्थिक शक्ती को बढाने मे युवा उद्यमीयों की भूमिका, आत्मनिर्भर से विकसित भारत तक-युवाओं द्वारा भारत के विकास पथ का निर्धारण, भविष्य को सशक्त बनाना-युवा नेतृत्व वाली पहल एक जिम्मेदार समुदाय के लिये मार्ग प्रशस्त कर रही है' हे तीन विषय होते. स्पर्धेचे परीक्षण सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. एस. एस. नंदन, डी.सी. पाटील, पत्रकार सचिन बागुल, डॉ. डी. एम. आखाडे, कवी वृषभ अहिरे यांनी केले. स्पर्धेचे यशस्वी आयोजन नेहरू युवा केंद्राचे वरिष्ठ लेखापाल नाना पाटील, चेतन पाटोळे, हर्षल पाटील यांनी केले होते. सकाळी १० वाजता सुरु झालेली स्पर्धा सायंकाळी ५ वाजता समाप्त झाली. या स्पर्धेत सहभागी प्रत्येक जिल्ह्यातील दोन विजेत्यांना राज्य युवा संसद भाषण प्रतियोगितेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. राज्य युवा संसद विजेत्यांना 'युवा आवाजे-राष्ट्र के परिवर्तन के लिये संलग्नित और सशक्त बने' या विषयावरील राष्ट्रीय युवा संसद भाषण प्रतियोगिता महोत्सवात सहभाग घेण्याची संधी मिळेल. राष्ट्रीय युवा संसद भाषण प्रतियोगिता महोत्सवातील प्रथम विजेत्यास २ लाख रुपये, दितीय विजेत्यास या लाख ५० हजार रुपये, तृतीय विजेत्यास १ लाख रुपये तर २ उत्तेजनार्थ विजेत्यांना ५० हजार रुपये अशी भरघोस रकमेची पारितोषिके दिली जातील.

# 'गोदामाई'ची आरती वादाच्या भोवऱ्यात

आधुनिक केसरी

*नाशिक किंवा महाराष्ट्राच नव्हे तर संपूर्ण भारताच्या दृष्टीने गंगामाई म्हणजे अपार श्रद्धेचा विषय आहे परंतु या गंगामाईची आरती सुरू होण्याआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गंगामाई ची आरती आम्हीच करणार अशी भूमिका घेऊन दोन संस्था एकमेकांच्या विरोधात उभे ठाकल्या आहेत. अर्थात सर्वसामान्य भाविक भक्तांना या वादात कुठल्याही रस नसून गोदामाईची सेवा त्यांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. दर बारा वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने संपूर्ण भारतातूनच नव्हे तर साऱ्या जगातून साधूसंत,भाविक, अभ्यासक लाखोंच्या संख्येने नाशिक तीर्थक्षेत्री येत असतात. याशिवाय देशभरातून नियमितपणे हजारो सेवेकरी गोदास्नानासाठी व नाशिक दर्शनासाठी येत असतात.*



बाजीराव सोनवणे

गोदास्नानाने आपली आध्यात्मिक व भौतिक प्रगती होते असा पक्का विश्वास या सर्व भाविकांमध्ये आहे आणि म्हणूनच गोदाआरती हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा आणि परम श्रद्धेचा विषय आहे. गोदाकाटच्या रामकुंड परिसराला धार्मिक आणि पौराणिक दृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. गंगा गोदावरी पुरोहित संघ अनादी काळापासून गोदामातेची सेवा करीत आला आहे. राज्य सरकारचा सहभाग असलेली गोदा आरती करण्याचा सन्मानही आपल्यालाच मिळेल असे पुरोहित संघास वाटत होते परंतु काही दिवसांपूर्वी जयंत गायधनी यांच्या पुढाकाराने रामतीर्थ गोदावरी सेवा समितीची स्थापना करण्यात आली आणि या वादास सुरुवात झाली. दक्षिणगंगा अशी ओळख असलेल्या गोदावरी आरती साठी जिल्हा प्रशासनाने 11




कोटी 66 लाखांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली. हा कोट्यावधीचा निधी तर या वादामागे नाही ना अशी शंका काही नाशिककरांच्या मनात निर्माण झाली परंतु ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होहोणार असल्याने या शंकेस फारसा वाव नाही. यातच पंचवटीतील एका माजी आमदाराने ग्रामसभा घेऊन या विषयाला आत घातला या ग्रामसभेत उपस्थित



साधू संतांनी एक मुखाने रोहित संघास पाठिंबा दिला यानंतर दोन्हीही बाजूने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आम्ही आरती करणार असा आग्रह दोन्ही बाजूने धरला गेला आहे पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश सुकला यांनी मात्र थोडी नरमाईची भूमिका घेऊन दोन्ही बाजूच्या लोकांनी एकत्र येऊन गोदामाईची सेवा केल्यास काय हरकत आहे?असा प्रश्न उपस्थित केला.काशी सह अनेक तीर्थक्षेतांवर आरतीचा हा सोहळा मोठ्या भक्ती भावाने आणि उत्साहाच्या,भावपूर्ण वातावरणात केला जातो. नाशिकमध्ये सुद्धा हा सोहळा कोणत्याही वादाशिवाय पार पडावा आणि गोदा आरतीचा आनंद राज्यातीलच नव्हे तर देशातील,विदेशातील भाविकांना घेता यावा अशीच अपेक्षा सर्वांची आहे.या वादातून काय तोडगा निघतो ते आज,उद्या स्पष्ट होईलच.

# सर्वांच्या असंतोषाचे निवारण करणारे सच्चे जनसेवक संतोष चऱ्हाटे

आधुनिक केसरी न्यूज

वसंत खडसे

वाशिम : राजकारणात अनेकजन येतात आणि आपल्या शैलीतून एक वेगळी ओळख निर्माण करतात.तर काहीजन केवळ समाजसेवा घडावी म्हणुन राजकारणाचा मार्ग अवलंबवतात. मात्र त्याही पलीकडे जाऊन एक अफलातून नवा फंडा अवलंबणारे आमचे मित्र, पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी संतोष लक्ष्मण चऱ्हाटे हे आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात येण्याआधी केवळ सामाजिक सेवेची आवड म्हणुन त्यांनी रिसोड नगर परिषदेच्या राजकारणात प्रवेश केला. पहिल्या प्रयत्नातच त्यांना अपयशाचा सामना जरूर करावा लागला. पण समाजसेवेची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांनी पुन्हा प्रयत्न केला आणि जनादेशाचा कौल त्यांच्या बाजूने लागला. रिसोड नगर परिषदेच्या निवडणुकीत त्यांच्या सहचारिणी सौ. मिराताई संतोष चऱ्हाटे सर्वाधिक विक्रमी मते घेऊन विजयी झाल्या होत्या. त्यानंतर आजतागायत त्यांनी मागे वळून पाहिले नाही. जनादेशाने टाकलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांनी हेरली होती. सर्वांच्या समस्यांचे निराकरण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. याची जाणीव ठेवत त्यासाठी काहीतरी नवीन फंडा वापरला पाहिजे अशी संकल्पना त्यांना सुचली, त्या अनुषंगाने सोशल मीडियाचा चांगला फायदा करून घ्यायचा चंग बांधला. आपल्या प्रभागातील सर्वांचे गाऱ्हाणे ऐकून घेता यावे यासाठी त्यांनी " तक्रार निवारण ग्रुप " तयार केला होता. त्यामाध्यमातून चऱ्हाटे दांपत्य सतत आपल्या प्रभागातील जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या तक्रारीचे निवारण करू लागले होते. परंतू या त्यांच्या अफलातून कल्पनेला भरभरून प्रतिसाद मिळत असल्याने संपुर्ण शहरातील तक्रारी " तक्रार निवारण ग्रुप वर येऊ लागल्या. आणि त्यातील अनेक तक्रारीचे निवारण सुद्धा झटपट होऊ लागले. त्यामुळेच सदर ग्रुप रिसोड शहरात केवळ नावारूपासच नव्हे; तर जनसामान्यांमधे लोकप्रिय झाला आहे. आज संतोष चऱ्हाटे पत्नीच्या माध्यमातून राजकारणात एक धुरंधर व्यक्तिमत्त्व म्हणुन सुपरिचित झाले आहेत. समाज सेवेसोबतच गोरगरिबांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी चऱ्हाटे यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. विविध वृत्तपत्रात निर्भीड आणि निःपक्ष लिखाण करणारे संतोष चऱ्हाटे एका आघाडीच्या वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून काम पाहात आहेत.



चऱ्हाटे यांच्या अंगी असलेले संघटन कौशल्य पाहून व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकारांच्या संघटनेने राज्य संघटक पदाची धुरा त्यांच्या खांद्यावर सोपविली आहे. तद्वतच राजकीय पक्ष व विविध सामाजिक संघटनेच्या माध्यमातून त्यांनी आपली जनसेवेची आवड जोपासली आहे. कदाचित त्याचेच फलित म्हणून नगर परिषदेमधे एकदा पाणीपुरवठा समितीचे सभापती तर दुसऱ्यांदा आरोग्य शिक्षण सभापती पद त्यांनी भूषविले आहेत. शिवाय राष्ट्रवादी काँग्रेसच्या ग्राहक संरक्षण समितीचे तालुकाअध्यक्ष पद सुद्धा जबाबदारीने सांभाळले आहे. त्यांच्या या समाजसेवेच्या कार्यात त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मिराताई चऱ्हाटे यांची विशेष साथ मिळाली असल्याचे संतोष चऱ्हाटे यांनी दैनिक आधुनिक केसरी सोबत बोलतांना आवर्जून सांगितले आहे. राजकारण आणि पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वांच्या " असंतोषाचे निवारण करून समाधान करणारे सच्चे जनसेवक संतोष चऱ्हाटे यांचा शिवजयंतीच्या शुभ पर्वावर म्हणजेच १९ फेब्रुवारी रोजी वाढदिवस येत आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्याचा हा अल्पसा परिचय प्रस्तुत केला आहे. त्यांच्या भावी आयुष्यासाठी आधुनिक केसरी कडून लाख लाख शुभेच्छा..!

# ओबीसी नव्हे तर धोरणकर्ते तुमचे शत्रू आहेत : गिरीश बनकर

## आदेश जमदाडे यांच्या उपोषणस्थळी व्यक्त केल्या भावना

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली सहा दिवस नायगाव ता.खंडाळा येथील सामाजिक कार्यकर्ते आदेश जमदाडे हे ओबीसी आरक्षण आणि विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणास बसलेले आहेत.विविध भागांतील समाज बांधव हे उपोषण स्थळी येऊन आपल्या भावना व्यक्त करत आहेत. परंतू शासन स्तरांवर कुणी ही या उपोषणाकडे फिरकत नसल्याने उपोषण कर्ते यांच्या सह ग्रामस्थांकडून तसेच समाज बांधवांकडून तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली जात आहे. आमच्या मागण्यांकडे कुणी तरी लक्ष द्यावे.असे म्हटले जाते आहे.परंतु आमच्या मागण्या जाणून घेण्यासाठी ना शासन ना प्रशासनास वेळ आहे. अशी परिस्थिती उपोषण स्थळी दिसून येत आहे.पाडेगाव ता.फलटण येथील सामाजिक कार्यकर्ते गिरीश बनकर यांनी उपोषणास भेट दिल्यानंतर तीव्र शब्दांत आपल्या भावना परखडपणे व्यक्त केल्या.आपल्या उपोषणा बद्दल शासन गांभीर्याने घेत नाही.दुजाभाव केला जात आहे.आपल्या समाजबांधवांनी कुठे आंदोलन केले की,त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जात आहेत.असा आरोप सुद्धा गिरीश बनकर यांनी केला.मराठा समाज आणि ओबीसी समाज हा एकमेकांच्या विरोधात लढविण्याचे काम इथले राज्यकर्ते करत आहेत.ओबीसी नव्हे तर धोरणकर्ते तुमचे शत्रू आहेत.असे गिरीश बनकर यांनी मराठा समाजाला उद्देशून म्हटले. रविवार दिनांक ११ फेब्रुवारी पासून आदेश जमदाडे हे मराठा आरक्षण मसुदा रद्द करा,शिंदे समितीच्या शिफारसीवरून दिलेली कुणबी प्रमाणपत्र रद्द करा,मूळ दस्ताऐवजात बदल अथवा खाडाखोड करून कुणबी नोंदी असल्याचे भासवून दिलेले दाखले तातडीने परत घ्या,कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे कोणालाही शासकीय सवलतीचा लाभ देऊ नये,मराठा कुणबी/कुणबी मराठा प्रमाणपत्रांचे वितरणावर स्थगिती द्यावी, ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवा आदी मागण्यांसाठी



आमरण उपोषणास बसलेले आहेत. आदेश जमदाडे यांना पाठींबा देण्यासाठी गिरीश बनकर यांनी उपोषण स्थळी भेट दिली. यावेळी समता परिषदेचे राजेंद्र नेवसे,लोणंद नगरीचे उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर,सुजन फौंडेशनचे अध्यक्ष अजित जाधव,माजी सरपंच मनोज नेवसे,सनी रायकर,प्रशांत ढावरे,चंद्रकांत गोरे, विकी येळे, किसन नेवसे, ज्ञानेश्वर ससाणे, तेजस क्षीरसागर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. गिरीश बनकर यांनी विश्लेषणात्मक समजून सांगताना म्हणाले की, मराठा समाजातील लोकांनी ओळखायला पाहिजे की, ओबीसी हा तुमचा शत्रू नाही,धोरणकर्ते हे तुमचे शत्रू आहेत. मी वारंवार हे सांगत असतो.महाराष्ट्रात ३३ पैकी २४ हे शपथ घेतलेले मराठा समाजाचे मुख्यमंत्री होऊन गेले.मराठा समाजाच्या मुख्यमंत्र्यांनी जर मराठा समाजा बद्दल तळमळ दाखविली असती तर हा प्रश्न उदभवला असता का? विशेष आरक्षणाची तरतूद, वेगळ्या आरक्षणाची तरतूद त्यांना करता आली नसती का? शंभर टक्के करता आली असती,परंतु आम्हाला करायची नाही हे ठरवलं तर ती कशी होणार?आज गरीब मराठा समाजाला वेगवेगळ्या पदांची आमिषे दाखवायची,पोरांना शिक्षणा मध्ये कमी डोनेशन घ्यायची आमिषे दाखवायची,दूध संघात गावाला लावतो म्हणून आमिषे दाखवायची,जिल्हा परिषदेला घेतो म्हणून आमिषे दाखवायची,त्यांचे शोषण करायचं हे काम ह्या राजकीय पुढाऱ्यांनी केलेलं आहे. मग ह्यांचा लढा हा त्यांच्या विरुद्ध असायला पाहिजे. ओबीसी आणि इतर समाजाच्या विरोधात नसला पाहिजे. असे सुध्दा त्यांनी म्हटले आहे. "लायकी" या शब्दावरून गिरीश बनकर यांनी चांगलाच समाचार घेतला.ते म्हणाले की,लायकी काढायची असेल तर तुम्ही त्या नेत्यांची काढा,अरे आम्ही तुला मुख्यमंत्री पदापर्यंत नेहलं,संविधानिक पदाच्या खुर्चीवर नेऊन बसवलं,मंत्री खासदार केलं,केंद्रात नेहलं, केंद्रातलं मंत्री केलं,तू समाजासाठी काय केलं हे प्रश्न तुम्ही तुमच्या समाजातील नेत्यांना विचारा की? असा सवाल सुद्धा त्यांनी उपस्थित केला. समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र नेवसे म्हणाले की,ओबीसींचे आरक्षण अबाधित राहिले पाहिजे.यासाठी मोठ्या जिकरीने प्रयत्न केले जात आहेत.त्यात सर्वच स्तरातील लोक प्रयत्न करत आहेत.शासनाला जाग यावी. म्हणून आपण प्रयत्न करीत राहणे गरजेचे आहे.ओबीसी आरक्षण टिकले पाहिजे.म्हणुन नायगाव मधून चांगला उठाव होत आहे. आंदोलनात महिलांचा चांगला सहभाग दिसून येत आहे.आरक्षण नेमकं काय आहे.याची माहिती सर्वांना मिळावी. जागृती घडली पाहिजे.

# वाळूचोरांनी केला तलाठ्यावर हल्ला...

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** तालुक्यात दि.१५ सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास गुप्त माहितीनुसार वाळू चोरी प्रतिबंधक पथक आपले धारणगाव ग्रामपंचायत हद्दीत गोदावरी नदीच्या कडेला वाळूचोरीचा ट्रॅक्टर पकडत असताना आरोपी विकी शिंदे (पूर्ण नाव, गाव माहिती नाही) याने फिर्यादी व देर्डे कोऱ्हाळे येथील तलाठी गणेश महादेव गरकळ (वय-३९) यांना शिवीगाळ व धक्काबुक्की करत त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर पळवून नेला असल्याची धक्कादायक प्रकरण उघड झाले आहे.त्यामुळे धारणगावसह कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे. गत दहा महिन्यापुर्वी ०१ मे २०२३ रोजी राज्याच्या महसूल मंत्र्यांनी ६०० रुपयांना एक ब्रास वाळूचे स्वप्न दाखवले होते त्यास दहा महिने उलटूनही गरजेइतकी वाळू तालुक्यातील नागरिकांना मिळालेली नाही.कोपरगाव तालुक्यात कुंभारी व सुरेगावात प्रत्येकी एक वाळू डेपो तयार केल्याच्या बातम्या असताना त्यात नागरिकांना दुर्दैवाने फारसा दिलासा मिळताना दिसत नाही.त्यात अनेक गैरप्रकार घडताना दिसत असून डेपो व वाळू उपसा ठिकाणचे कॅमेरे बंद वाळूचोर हात साफ करताना दिसत आहे.त्यामुळे वाळूचोर अद्यापही आपला वरचष्मा ठेवून असल्याचे दिसत आहे.त्यातच ऑनलाइन पद्धतीने वाळू मिळण्याची शक्यता दिसत नाही.त्यात वाळूचोर असंबंधीत रेशन कार्ड आणून व आपल्या सोयीने ते जमा करून परस्पर वाळू उपसा करताना दिसत आहे.सामान्य नागरिक मात्र सेतू केंद्रावर चकरा मारताना दिसत आहे.मात्र संबंधित केंद्र चालकांचे हात ओले केले तर वाळू मिळण्यास उशीर होताना दिसत नाही.त्यामुळे नागरिक वैतागताना दिसत आहे.अनेक जण तहसीलदार यांचेकडे तक्रार करताना दिसत असून त्यांना बऱ्यापैकी न्याय मिळताना दिसत असला तरी तेथ पर्यंत सर्वसामान्य नागरिक पोहचताना दिसत नाही त्यामुळे वाळू चोरांची चांदी सुरु असल्याची दिसून येत आहे. या प्रकरणी फिर्यादी गणेश गरकल यांनी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात आरोपी विकी शिंदे याचे विरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा क्रं.४०/२०२४ भा.द.वि.कलम ३५३,३३२,३७९,५११,५०६,५०४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.त्यामुळे वाळूचोरांत दहशत पसरली आहे.

# लय भारी सुगरण

आधुनिक केसरी



सौ. सविता खंडगावकर, नांदेड
संपर्क क्र. 7218340512

**साहित्य :**

1 1/2 कप साबूदाना
3 मिडीयम साइजचे बटाटे उकडलेले
2 टेबलस्पून अद्रक मिरची पेस्ट
1 टेबलस्पून जीरे
चवीनुसार सेंध मीठ
1 टेबलस्पून साखर
1 टेबलस्पून लिंबाचे रस
1/2 टेबलस्पून मिरची पावडर
1/3 कप शेंगदाणा पावडर
तळण्यासाठी तेल.

सर्वप्रथम साबुदाणा घेऊन व्यवस्थित धुऊन रात्रभर भिजत घालून घेऊ. रात्रभर साबुदाणा भिजत घातल्यामुळे साबुदाणा छान फुलून नरम होतो. सकाळी साबुदाणा छान भिजल्यावर हाताने मोकळा करून घेऊ. आता वेगळ्या पॉटमध्ये साबुदाणा घेऊन त्यावर उकडलेले बटाटे कुस्करून किंवा किसून घ्यायचे, शेंगदाण्याची पाउडर, अद्रक मिरचीची पेस्ट, सेंधा मीठ, जीरे टाकून व्यवस्थित मिक्स करून घेऊआता लाल मिरची पावडर आणि साखर टाकून वरून अर्धे निंबाचे रस पिळुन घेऊ. लिंबाच्या रसामुळे वडे जास्त तेल पीत नाही तेलकट होत नाही. ही वड्या ची मूख्य टीप आहे. उपवासात तुम्ही कोथिंबीर खात असाल तर टाकू शकतो आम्ही कोथिंबीर खात नाही म्हणून मी टाकली नाही. आता पूर्ण साबुदाणे व्यवस्थित हाताने मिक्स करून पिठासारखा गोळा तयार करून साईडला दाबून लावून घेऊ. आता हाताला थोडे पाणी लावून एक एक गोळा हातावर घेऊन चपटे असे गोल गोल वडे तयार करून घेऊ. वडे तळण्यासाठी मी शेंगदाण्याचे तेल वापरले आहे शक्यतो मी उपवासाच्या दिवशी शेंगदाण्याचे तेल वापरते. तेल चांगले गरम करून घ्यायचे. तेल गरम झाल्यावर गॅस मध्यम करून द्यायचं आता तयार वडे एका साईडने तळून झाल्यामुळे पलटून दुसऱ्या साईडने ही तळून घेऊ लाल रंगावर वडे खरपूस तळून घेऊन वडे छान फुलून जातात. वडे तळताना हा गोल प्रकारचा झारा वडे तळत असताना त्याच्यावरती उलटा ठेवून द्यायचा यामुळे अचानक वडा फुटल्यावर आपल्या अंगावर उडत नाही. बऱ्याच दा वडे तळत असताना एखादा साबुदाणा फुटून बाहेर उडतो तसे नको व्हायला म्हणून असा झारा उलटा वड्या वर ठेवून द्यायचा.अशाप्रकारे सगळे वडे तयार करून तळून घेऊ. छान टमटम फूललेले लालसर खरपूस असे वडे तयार होतात. तयार वडे ओल्या नारळाच्या चटणी बरोबर सर्व करू.



# महसूल विभाग निष्क्रिय; वाळू तस्कर झाले सक्रिय!

## भोकर तालुक्यात रात्री तस्करी : उद्दिष्टपूर्तीसाठी वाळूसाठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात वाळु मिळत नसल्याने या संधीच सोन करण्यासाठी चाणाक्ष वाळु तस्करांनी मागील अनेक दिवसांपासून छूप्यामार्गे व्यवसाय सुरू केला आहे.महसुल विभाग आणि तस्करांची "छूपी "युती झाल्याने तालुक्यात वाळुला पायफुठले आहेत. वरिष्ठांची मर्जी सांभाळण्यासाठी नाममात्र कार्यवाही करून मोकळे होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शुक्रवारी (ता.१६) उद्दिष्टपूर्तीसाठी वाळू साठा जप्त करण्यात आला आहे.

तालुक्या लगत असलेल्या ऊमरी,मूदखेड आणि बिलोली परिसरातून महागडी वाळू विकत घ्याली लागते.सदरील वाळु ठेकेदार महसूल विभागाला शासकीय नियमानुसार "रॉयल्टी" भरत असले तरी क्षमतेपेक्षा अधिक वाळूचा ऊपसा करून "हात पिवळे" करून घेत आहेत.परिणामी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडतो आहे.यावर अंकुश ठेवण्यासाठी महसूल विभागाने पथकाची नियुक्ती केली आहे.पथक केवळ नावालाच असून अद्याप कुठलीही ठोस कार्यवाही झाली नाही. वरिष्ठांनी लक्ष देऊन तस्करांवर कार्यवाही करावी अशी मागणी जोर धरते आहे.

**रात्रीला होते तस्करी :** तालुक्यातील काही मंडळी वाळु तस्करीत गुंतले असून अव्वाच्या सव्वादरात विक्री करून हातओले करून घेत आहेत .दिवसा ढवळ्या लोकाच्या नजरेत येऊ नये म्हणून रात्रीला हजारो ब्रास वाळू वाहतूक केली जात आहे . तालुक्यात अनेक ठिकाणी वाळु साठा करण्यात आला असला तरी महसूल विभाग याकडे कमालीचे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे .

**नंबरप्लेट गायब :** तालुक्यात वाळु वाहतूक करणाऱ्या वाहनावरील नंबरप्लेट गायब करून वाहतूक सुरू आहे .त्यामुळे सदरील वाहन कूठले आहे याचा थांगपत्ता लागत नाही .आरटीओ विभागाच्या अधिकाऱ्यांनी अशा वाहनांवर कार्यवाही करणे गरजेचे आहे .

**डौरला वाळुसाठा जप्त :** तालुक्यात मागील अनेक दिवसांपासून वाळु तस्करीचा व्यवसाय तेजीत सुरू आहे . डौर ( ता .भोकर ) येथे वाळू साठा असल्याची माहिती मिळताच शुक्रवारी ( ता .१६ ) तलाठी वैष्णव मोरे, पोलीस पाटील श्री .चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला असता अंदाजीत सात ते आठ ब्रास वाळू असून वरिष्ठांकडे अहवाल पाठवल्या नंतर कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती श्री .मोरे यांनी दिली आहे .

**कार्यवाही साठी उपोषण :** तालुक्यात साठवलेली वाळु आणि रात्रीला होणारी तस्करी यावर कार्यवाही करण्यात यावी यासाठी राजेश चंद्रे यांनी तहसील कार्यालयासमोर ऊपोषण केले होते . लेखी आश्वासन दिल्याने माघार घेण्यात आली .अधिका-यानी दिलेला शब्द पाळला नाही म्हणून मंगळवारी ( ता .२० ) त्याच मागणीसाठी उपोषणाला बसणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे .

## सिनेकलाकार व्हायचे असेल तर चला आलापल्ली : अमूल दुर्गे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**भास्कर फरकडे**

**आलापल्ली :** स्थानिक राजे धर्मराव कला वाणिज्य



महाविद्यालय सांस्कृतिक विभाग व तेजय प्रॉडक्शन्स मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासीबहुल व नक्सलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक, परिसरातील तरुण यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना नवीन चित्रपट व वेबसिरिज मध्ये अभिनय करण्याची व त्याद्वारे रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ ला सकाळी १०.३० वाजता राजे धर्मराव कला वाणिज्य महाविद्यालय आलापल्ली येथे विशेष अभिनय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यशाळेचा लाभ जास्तीत जास्त युवकांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे जनतेचे व विद्यार्थ्यांन चे लाडके प्राचार्य डॉ.मारोती ऊध्दवराव टिपले व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. कू.प्रतिमा सूर्यवंशी यांनी केले.

आदिवासी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये अप्रतिम कौशल्य भरलेले आहे. मात्र ते प्रदर्शित करण्याचे ठिकाण मिळत नाही. हिच बाब हेरून सतत विद्यार्थ्यांनसाठी काहीतरी करण्यास धडपळ ना-या डॉ. मारोती ऊध्दवराव टिपले प्राचार्य राजे धर्मराव कला वाणिज्य महाविद्यालय आलापल्ली यांनी ही संधी दारात आणली आहे. या संधीचे लोकांनी सोने करावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अमूल दुर्गे त्यांनी केले आहे आणि अधिक माहितीकरीता 9518364283, 8888467329 व 8390245801. संपर्क साधावे.



## अंबरनाथमधील द्वारली गावात दारूच्या हातभट्ट्या पोलिसांनी केल्या उद्ध्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**अंबरनाथ :** अंबरनाथ तालुक्यातील द्वारली गावात गावठी दारूच्या हातभट्ट्या हीललाईन पोलिसांनी उध्वस्त केल्या आहेत. यात 1 हजार रसायन मिश्रित गावठी दारू पोलिसांनी जागीच नष्ट केली आहे.साठवणूक करणारे प्लस्टिकचे ड्रम पोलिसांनी जागीच आग लावून जाळून दिल्यानं हातभट्टीची दारू तयार करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.द्वारली गावात हातभट्टीची गावठी दारू मोठ्या प्रमाणात बनत असल्याची गुप्त माहिती हिललाईन पोलिसांना मिळाली होती.तेव्हा हिललाईन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण टीमने सापळा रचून गावठी दारू तयार होत असलेल्या ठिकाणी धाड टाकून रसायन मिश्रित गावठी दारू नष्ट केली आहे. आरोपी अविनाश रसाळ यांच्या विरोधात हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

## वरठान येथील घेतलेले कर्ज न भरल्याने कर्जदारास सहा महिन्यांचा तुरुंगवास

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील वरठाण येथे बिगर शेतकरी पतसंस्थेचे थकविलेले कर्ज नांदगाव येथील कर्जदाराच चांगलेच महागात पडले. सोयगाव न्यायालयात दाखल याचीकेत कर्जदारास कर्ज रक्कम व्याजासह भरण्यासह सहा महिन्याचा कारावास होणार आहे.गणेश ग्रामीण बिगर शेती पतसंस्था बनोटी येथील पतसंस्थेकडुन नांदगाव येथील बद्रिनाथ महारु राठोड यांनी पस्तीस हजार रुपये कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड न केल्याने श्री. गणेश ग्रामीण बिगए सहकारी पतसंस्था मर्या बनोटी यांच्या मार्फत सिताराम भावडू खैरनार यांनी आरोपी बद्रीनाथ महारू राठोड, रा. नादगांव तांडा, ता. सोयगाव, जिल्हा संभाजीनगर येथील इसमाविरुद्द मा. प्रथमवर्ग न्यायदंगधिकारी सोयगाव न्यायालयात १३८ एनए कायद्या प्रमाणे आरोपी बद्रीनाथ राठोड यांनी घेतलेले रुपये पस्तीस हजार कर्जाची परतफेड केली नाही म्हणून गुन्हा दाखल केला. रोजी. मा प्रथमवर्ग न्यायाधिश आर एन पाठक यांनी आरोपीस या प्रकरणी दोषी ठरवून सहा महिने कारावास आणि रुपये ७२ हजार ४९५ रुपये भरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश. भरपाई न दिल्यास पुन्हा महिन्याची साधा कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.या प्रकरणी ॲड राजेश गिरी, सदर प्रकरणात आर सुरळकर, आर. एस आगे, ॲड. सचिन सुनील गिरी, एन. आर. सुरळकर यानी कामकाज पाहिले.

## रिसोड येथील सार्वजनिक शिवजयंती समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार चऱ्हाटे

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती निमित्त रिसोड शहरामध्ये सार्वजनिक शिवजयंती समितीचे आयोजन करण्यात आले आसुन शहराच्या इतिहासात प्रथमच अध्यक्ष पदाचा बहुमान हा पत्रकाराला मिळालेला आहे.शिवजयंती निमित्त शहरातील मोटारसायकल रॅली मध्ये सहभागी होण्याचे आवाहन नवनिर्वाचित अध्यक्ष पत्रकार संतोष च-हाटे यांनी केले आहे.

रिसोड शहरातील सर्व उद्योजक,व्यापारी,नागरिक,नोक रदार,वर्ग प्रत्येक वर्षी मोठ्या उत्सहात शिवजयंती साजरी करतात.परंतु वेगवेळ्या ठिकाणी शिवजयंती साजरी करतांनी कायदासुव्यवस्थेची मोठ्या प्रमाणावर त्रेधात्रिपीट उडत आसल्याने मागील काही वर्षांपासुन शहरा मध्ये सार्वजनिक शिवजयंती चे आयोजन करण्यात येत आहे.

यावेळी सार्वजनिक शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले आसुन सर्वानुमते अध्यक्ष पदी पत्रकार संतोष च-हाटे यांची निवड करण्यात आलेली आहे. शिवजयंती साजरी करतांनी मोटारसायकल रॅली, डिजेच्ये निनाद साजरी करण्यात येणार आसुन मिरवणूकीतील डिजेचे आवाज हे पोलिस विभागाने ठरवुन दिलेल्या विशिष्ट डेसीबल मध्ये ठेवण्याचे आवाहण अध्यक्ष चऱ्हाटे यांनी केले आहे. विशेष म्हणजे आयोजित शिवजयंतीला सर्व जाती धर्मातील युवक, जेष्ठांनी सहभाग घेण्याचे आवाहण च-हाटे यांनी केले आहे. शिवजयंतीची सार्वजनिक मिरवणूक ही छत्रपती शिवरांच्या विचारधारेला अनुसरून संपन्न होणार आहे हे विशेष.



## शिंदखेडा येथे झालेल्या खून प्रकरणी आरोपीला तत्काळ अटक करा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** काहीं दिवसापूर्वी झालेल्या शिंदखेडा तालुक्यातील विरदेल येथील अल्पवयीन मुलीस पळवून नेत तिचा खून करणाऱ्या आरोपी अद्याप मोकाट आहे. त्यामुळे अनेकांची आरोपीचा शोध घेत त्यास तत्काळ अटक करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. जयश्री अहिरराव यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले. या गुन्ह्यात विशेष तपासाधिकारी म्हणून महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करीत आरोपीस लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान पोलिसाकडून आरोपींचा कसून शोध सुरू असून आरोपीची माहिती देणाऱ्यास पोलिस अधिक्षकांनी रोख ५० हजारांचे बक्षिस जाहिर केले असून माहिती देणाऱ्याचे नाव गोपनिय ठेवण्यात येणार आहे. विरदेल (ता. शिंदखेडा) येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीची हत्या करून तिचा मृतदेह गोणपाटात बांधून पुरावा नष्ट करण्यासाठी एका शेतात फेकून दिल्याची घटना दि. ११ रोजी उघडकीस आली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून या घटनेचा भाजपा महिला मोर्चाने निषेध व्यक्त केला आहे. दरम्यान पोलिस यंत्रणाचा तपास चालु आहे. परंतू अद्यापपर्यंत या क्रूर घटनेच्या मारेकऱ्यांना शोध लागलेला नाही. त्यामुळे या गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष तपास अधिकारी म्हणून महिला अधिकाऱ्याची नियुक्ती करून मुलीच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी प्रदेशउपाध्यक्षा सौ. जयश्री अहिरराव, सौ. प्रतिभा चौधरी, माजी नगरसेविका सौ. वंदना भामरे, सौ. मंगला पाटील, सौ. पुष्पा बोरसे, सौ. प्रिया कपोले, सौ. उमा कोळवले, सौ. ऐश्वर्या कोळवले, शांती बैसाणे, कोयल वाघ, कल्पना चौधरी आदीं महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात उद्या शिवजयंती

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात उद्या दि. १९ रोजी सकाळी अकरा वाजता पौर्णिमोत्सव आणि शिवजयंती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार असून याच कार्यक्रमात उज्ज्वल प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण होणार आहे तसेच आंध्रप्रदेशातील विजयवाडा धम्मसहलीवरुन परतलेल्या आंबेडकरी अनुयायांचा सत्कार सोहळा व शहरातील गंगा कॉलनी, पंचशील नगर आणि श्रमसाफल्य नगर येथील बौद्ध उपासक उपासिकांकडून भव्य भोजनदान देण्यात येणार असल्याची माहिती येथील अखिल भारतीय भिख्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली. दरमहा पौर्णिमेनिमित श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन १९ तारखेला करण्यात येते. यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांना भिख्खू संघ अभिवादन करणार आहे. तसेच कंधारच्या उज्वल प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय साहित्यरत्न व विविध क्षेत्रातील पुरस्कारांचे वितरण होणार आहे. या कार्यक्रमाला भदंत पंय्याबोधी थेरो व भिख्खू संघासह समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, सहाय्यक आयुक्त शिवानंद निमगिरे, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, प्रा. विलास वाठोरे, एस. एन. गोडबोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, जिल्हाध्यक्ष रणजीत गोणारकर, प्रशांत गवळे, रुपाली वागरे वैद्य, प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश ढवळे नागलगांवकर यांची उपस्थिती राहणार आहे. देगाव चाळ येथील आंबेडकरी कार्यकर्त्यांचा सत्कार होणार असून पौर्णिमोत्सव कार्यक्रमांतर्गत परित्राणपाठ, त्रिरत्न वंदना, ध्यानसाधना बोधीपुजा, पुरस्कार वितरण, भोजनदान, धम्मदेसना, पुरस्कार वितरण, बुद्ध भीम गितांचा प्रबोधनपर कार्यक्रम, दान पारमिता आदी विविध कार्यक्रम होणार आहेत. आगामी काळात याच परिसरात श्रामणेर दीक्षाभूमी भव्य धम्मसंकल्प स्तूप उभारण्यात येणार आहे. यात उपासकांच्या दानातूनच ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका, विपश्यना केंद्र, भिक्षू निवास, भोजनव्यवस्था, धम्मदेसना सभागृहाची निर्मिती होणार आहे.



# श्रीक्षेत्र जाळीचा देव व सावळेद्वार यात्रेनिमित्त अन्नदानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील श्रीक्षेत्र सावळेद्वार व जालना जिल्ह्यातील श्रीक्षेत्र जाळीचा देव येथे दि.२४ फेब्रुवारी २०२४ भव्य यात्रे निमित्ताने २४ फेब्रुवारीला रोजी दुपारी ११:३०वा. दरवर्षाप्रमाणे याही वर्षी चक्रवर्ती फाऊंडेशन, पुणे संस्थेकडून निर्हेतुक अन्नदान* असणार आहे, तरी ज्यांना या महत् गोमटेदायक उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर खालील नंबरवर करा. गुगलपे/फोनपे/पेटीएम- 9850280515 चक्रवर्ती फाऊंडेशन-पुणे (अध्यक्षः-आचार्य धनंजय लोणारकर महानुभाव) ही संस्था 2015 पासून कार्यरत आहे. संस्थेद्वारे पंथीय विविध उपक्रम राबवले जातात. उदा. कोरोना काळात धान्यवाटप, अन्नदान, प्रवचन, सामुहिक देवपूजा, स्थानांना उटी-उपहार-पंचावतार, रुग्णांना औषधी, गरजूंना सहयोग इ. धार्मिक व सामाजिक उपक्रम {यथाशक्ती सहभाग घेतल्यावर स्क्रीन शॉट व्हॉट्सअप करा} अशी माहिती आचार्य धनंजय लोणारकर महानुभाव धाड रोड गोपाळ आश्रम बुलढाणा यांनी बोलताना दिली.

# श्रीक्षेत्र सावळेद्वार यात्रा महोत्सवास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामीची भव्य यात्रेला प्रारंभ होत आहे. विदर्भ- मराठ्वाडयासह राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान सावळेद्वार व जाळीचा देव येथील यात्रा महोत्सवाला मंगळवारपासून थाटात प्रारंभ होत आहे. चक्रधर स्वामी संस्थानचा परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे.श्री क्षेत्र जाळीचा देव व सावळेद्वार येथील यात्रा महोत्सवाला दरवर्षी राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक हजेरी लावतात. श्री चक्रधर स्वामींच्या भक्ताची, अनुयायांची संख्या मोठी आहे. त्यामुळे यात्रे दरम्यान भाविक भक्त जाळीचा देव येथे येऊन स्वामींचे दर्शन घेतात. भक्तीभावाने पूजा, प्रार्थना करतात. जाळीचा देव व सावळेद्वार येथे दरवर्षी मोठी यात्रा भरते. यात्रेतील भाविकांसाठी श्री चक्रधर संस्थान जाळीचा देव व ग्रामस्थांच्या वतीने व्यवस्था करण्यात येते. यावर्षीही मोठ्या प्रमाणावर यात्रा भरणार असून हजारो भाविकांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती अरुण गोपीनाथ पुजारी व किशोर पुजारी जाळीचा देव यांनी दिली आहे. यात्रेसाठी संस्थानच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. भाविकांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी व्यवस्था करण्यात आली अशीही माहिती आप्पासाहेब उदरभरे जाळीचादेव यांनी जेष्ठ पत्रकार तथा उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले आहे. श्रीक्षेत्र जाळीचा देव येथील चक्रधर स्वामी संस्थानचा परिसर निसर्गरम्य वातावरणात आहे. खोल डोंगरदऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेतात. डोंगरद-यातून येणारी खेळती हवा मन प्रसन्न करणारी असते. श्री चक्रधर संस्थानच्या बाजूला असलेल्या मैदानात ही यात्रा भरते.तर सावळेद्वार येथे मंदीराच्या समोर भरते. यात्रेत मनोरंजनाची साधने, खेळण्याची दुकाने, इतर साहित्य विक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात लावण्यात येतात. जवळपास १० ते १५ दिवस ही यात्रा सुरु असते. श्रीक्षेत्र जाळीचा देव जालना व बुलडाणा जिल्ह्याच्या सिमेवर वसलेले आहे. तर सावळेद्वार छत्रपती संभाजीनगर, जळगाव व बुलढाणा सिमेवर वसलेले आहे.त्यामुळे छत्रपती संभाजीनगर,जालना व बुलडाणा जिल्ह्यातील भाविकांना यात्रेचे विशेष आकर्षण आहे. आजूबाजूच्या खेड्यातील भाविक दररोज यात्रेत हजेरी लावतात. श्री चक्रधर स्वामींचे दर्शन घेण्यासोबत यात्रेचा मनसोक्त आनंद घेतात. भाविकांच्या गर्दीने जाळीचा देव येथील परिसर फुलुन जातो. जिकडे पाहावे तिकडे भाविकांचा मेळा दिसून येतो. बच्चे कंपनीसह घरातील ज्येष्ठ सदस्यही यात्रेला हजेरी लावतात.भाविकांच्या सोयीसाठी छत्रपती संभाजीनगर, जळगाव, मुक्ताईनगर, जामनेर, पाचोरा, सिल्लोड, जालना, सोयगाव, बुलडाणासह इतर आगारातून एसटी बस सोडण्यात येतात.तसेच खासगी प्रवाशी वाहतूकीच्या साधनांचाही भाविक आधार घेतात. भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन अरुण गोपीनाथ पुजारी व पुजारी मंडळानी केले आहे.



**सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या प्रतिमेची शनिवारी रथयात्रा**

चक्रधर स्वामी यांची रथ यात्रा दि २४ फेब्रुवारी २०२४ रोजी रथ काढण्यात येणार आहे . चक्रधर स्वामी यांच्या चरणस्पर्शाने पुनित झालेल्या श्रीक्षेत्र जाळीचा देव व सावळेद्वार येथील हा रथ उत्सव देशभरातील भाविकांसाठी अत्यंत महत्वाचा मानला जातो . रथ यात्रेला आपली उपस्थिती राहावी यासाठी प्रत्येक भाविक अटोकाट प्रयत्न करत असतो .

आचार्य प .पू .प .म आम्नाय मोठे लोणारकर बाबा महानुभाव गोपाळ आश्रम यांच्या हस्ते पूजन केल्यानंतर गोपाल आश्रमातून रथ यात्रा निघते . तिथून रथ मंदिरात जातो . तेथे देवपूजा पालखीत ठेवण्यात येते . वाद्यासह रथ मुख्य द्वारापर्यंत नेण्यात येतो . त्यानंतर आश्रमात रथयात्रेचा समारोप करण्यात येतो . यावेळी भाविकांची मोठी संख्येने उपस्थिती असते . भाविकांच्या गर्दीने श्री क्षेत्र जाळीचा देव व सावळेद्वार परिसर फुलून गेला आहे .

**गोकुळबाबा पुजारी श्रीक्षेत्र जाळीचा देव**

# शिवजयंतीनिमित्त शिवाजी महाराज वेशभूषा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेतर्फे १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती अतिशय उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरी करण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत शहरातील सर्व शासकीय व खाजगी शाळेतील विद्यार्थी सहभाग घेऊ शकणार असुन आकर्षक वेशभूषा करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे दिली जाणार आहेत.



छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हा भारताच्या इतिहासातील एक दैदीप्यमान अध्याय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय ध्येय धोरणे आजही आपल्या सर्वासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. त्यामुळे राज्यातील सर्वांनी ही शिवजयंती अतिशय उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरी करण्याचे सांस्कृतिक विभागाचे निर्देश आहेत त्यानुसार चंद्रपूर मनपाद्वारे सदर कार्यक्रमाचे नियोजन केले जात आहे.

या स्पर्धेत शहरातील सर्व शाळांचे वर्ग १ ते १० चे विद्यार्थी सहभागी होऊ शकणार असुन स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांमधुन उत्कृष्ट वेशभूषा धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात येणार आहे. अँड्रॉइड टॅब,सायकल,ट्रॉली बॅग,स्कूल बॅग,वॉटर बॉटल,कंपास असे बक्षिसांचे स्वरूप असुन प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रोत्साहनपर बक्षीससुद्धा देण्यात येणार आहे. स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गिरनार चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा करून उपस्थीत राहायचे आहे. राज्य शासनामार्फत दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची शासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात येते. या दिवसाचे औचित्य साधून या थोरपुरुषांचे ज्या ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे यावर्षी देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी, असे निर्देशही राज्य शासनाने दिले आहेत त्यामुळे यंदा शिवजयंती कार्यक्रमाचे स्वरूप मोठे असुन यात सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा सादर केले जाणार आहेत.

# कुटुंब कल्याण उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** दि.१७ प्राथमिक आरोग्य केंद्र जामोद हे अतिदुर्ग भागातील आदिवासी नागरिकांसाठी आहे. ह्या रुग्णालयाच्या कार्यक्षेत्रात सातपुड्याच्या पायथ्याशी असलेला संपूर्ण आदिवासी भाग येतो, तरीसुद्धा सन २०२३ चे कुटुंब कल्याण केसेसचे वार्षिक उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण करून ह्या प्राथमिक आरोग्य केंद्राने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पाटाकाविला आहे.



तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सौ. उज्वलाताई पाटील यांचे व्यवस्थित नियोजन आणि आरोग्य विभागातील व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय सहकारी आणि सर्व वैद्यकीय कर्मचारी यांच्या नियोजनामुळे हे उद्दिष्ट पूर्ती शक्य झाली. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. निमकर्डे, डॉ. वाघ,डॉ.घाटे मॅडम, डॉक्टर सदांशिव तसेच प्रकाश वडोदे व सुभाष शिंदे आरोग्य निरीक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले. आरोग्यसेविका सौ. इंगळे, सौ.सोळंके आरोग्य सेविका यांचे विशेष योगदान लाभले.सर्व लाभार्थी महिलांना प्रति ६००/-रु.अनुदान वितरित करण्यात आले.

तसेच कात्रे,दाभाडे प्रयोगशाळा तंत्रज्ञ, कनिष्ठ लिपिक कैलास तायडे, मुख्य औषध निर्माण अधिकारी विलास खवणे, श्री पवार, गायकी, आरोग्य सेवक जयवंत बोरकर यांनी उद्दिष्ट पूर्तीसाठी पथक परिश्रम घेतले, तसेच सुरळकर, गवई परिचारक, वाहन चालक सलीम शेख रहीम ,तारापुरे, सौ नानाकदे , सौ मावसकर श्रीमती देशमुख गटप्रवर्तक तसेच सर्व आशा सेविका यांची मुलाचे मार्गदर्शन लाभले ह्यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गीते तसेच तालुका आरोग्य अधिकारी सौ. युगे पाटील यांनी सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# गरुड महाविद्यालयात आत्मनिर्भर युवती अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील शेंदुर्णी अरभा गरुड कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार दि ०९ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत विविध व्याख्यान कार्यक्रमाच आयोजन करण्यांत आले होते. या कार्यक्रमाचा समारोप समारंभ दि १५ रोजी पार पडला. कार्यक्रमास प्रा. डॉ. संजय पाटील, पंकज महाविद्यालय चोपडा (जिल्हा समन्वयक विद्यार्थी विकास विभाग कबचौ उमवी जळगांव) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना सर्वांगीण विकासाची योग्य दिशा या विषयी मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात युवतींनी सामाजिक ,आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीस स्वतः प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. विद्यापीठाच्या माध्यमातून राबविलेल्या विविध योजना आणि त्यांचा युवतींना होणारा लाभ यासंदर्भात डॉ पाटील यांनी संवाद साधला. या सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा श्याम साळुंखे होते. त्यांनी विद्यार्थिनी महाविद्यालयाच्या प्रत्येक कार्यक्रमात विद्यार्थिनींना सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ योगिता चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ अजिनाथ जीवरग आणि आभार डॉ सुजाता पाटील यांनी मानले. एकूण सहा दिवसांच्या व्याख्यानात सौ उषा पाटील, अश्विनी पाटील, श्री दिलीपजी पाटील पीएसआय पाहूर, श्री स्वप्नील बंगाली, पुणे, कु भग्याश्री बावस्कर, वैद्यकीय अधिकारी शेंदुर्णी, श्री दिनेश पाटील ,जिल्हा समन्वयक रासेयो उमावी जलगांव, श्री. उदय पाटील यूनियन बँक ऑफ इंडिया या मान्यवरांचे वेगवेगळ्या विषयावरील मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. या दरम्यान युवतींचे HB तपासणी आणि सिकलसेल तपासणी करण्यांत आली. एकूण ८० विद्यार्थीनी सहभाग नोंदविला. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.




# माणुसकी समूहातर्फे क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**हाळपट्टि :** सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्थेच्या वतीने व माणुसकी वृद्ध सेवालय रहाळपट्टि तांडा फाटा येथे क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करन्यात आली यावेळी पुनम चव्हाण माजी सरपंच यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करीत क्रांतिसिंह सेवालाल महाराज (१५ फेब्रुवारी १७३९ - ४ जानेवारी १७७३ ) हे भारतीय समाजसुधारक होते. शूरवीर लढवय्या 'गोरराजवंशी बंजारा' समाजातील प्रख्यात सतगुरू होते. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुट्टी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला.चव्हाण यांनी सेवालाल महारांच्या जीवनावरील प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले. क्रांतिसिंह सेवालाल महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करन्यात आली.या कार्यक्रमाला माजी सरपंच पुनम चव्हाण,कारभारी पा.रोठे, लक्ष्मण राठोड, अर्जुन महाराज चव्हाण,सुनिल चव्हाण,सांगु गोटे,शामराव राठोड,देविदास तारे,कल्पेश पंडित,अमोल वाघ,समाजसेवक सुमित पंडित,पुजा पंडित,लक्ष्मी पंडित,सह माणुसकी वृध्दाश्रमातील वृद्ध आदि उपस्थित होते.

# नाथजोगी समाजातील महिलांचे आंदोलन सुरूच; साखळी आंदोलनाचा तिसरा दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** सलग तीन दिवसांपासून आपल्या मागण्यांसाठी मोहिदेपूरच्या नाथजोगी समाजातील महिलांचे आंदोलन सुरूच आहे.

तहसील कार्यालयासमोर मंडप टाकून या महिला उन्हातान्हाची पर्वा न करता साखळी आंदोलनास बसलेल्या आहेत. दोन दिवस तर त्यांच्याकडे अधिकाऱ्यांनी फिरूनही पाहिले नाही.आज तिसऱ्या दिवशी डॉक्टरांनी त्यांची वैद्यकीय तपासणी केली. कुणीतरी मोठा अधिकारी येईल आपल्याला न्याय देईल या भाबड्या आशेवर या बिच्याऱ्या महिला केविलवाण्या नजरेने गावाकड रस्त्याकडे पाहत असतात. या महिलांच्या कुटुंबातील कमावत्या लोकांना नागपूर येथे चोर समजून जमावाने त्यांची हत्या केली होती. बारा वर्ष होऊनही त्यांच्या पदरात काहीच पडलं नाही. दरम्यान बक्याच वेळा त्यांनी उपोषण केले. मागण्यांचे निवेदन दिले पण त्यांची आजपर्यंत सरकारने त्यांची कुठलीच दखल घेतली नाही. असे असतांनाही त्यांनी निराश न होता संवैधानिक मुल्यांना जपत आपल्याला न्याय मिळेलच यासाठी साखळी उपोषणाचा मार्ग त्यांनी अवलंबला आहे.१५ तारखेपासून त्यांचे तहसील कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू असून सलग तिसऱ्या दिवशीही त्यांचे उपोषण सुरूच आहे.





# शिक्षणरत्न पुरस्काराने झोटे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल येथील सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा दिलीपकुमार झोटे यांना राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजर्षी शाहू महाराज बहुउद्देशीय शिक्षण संस्था साठेगाव यांच्या वतीने धुळे येथे आयोजित राज्यस्तरीय शिक्षण रत्न नागरिक पुरस्कार समारंभात प्रा दिलीपकुमार झोटे यांना ब्रिगेडियर सुधीर सावंत यांच्या हस्ते सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांनी सपत्नीक पुरस्काराचा स्वीकार केला. धुळे येथील राजर्षी शाहू महाराज नाट्य सभागृहात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांची उपस्थिती होती.शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठेचा अशा शिक्षणरत्न नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल प्रा.झोटे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नागरिकांच्या सहकार्यानेच नक्षलवाद संपवू : शुक्ला

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** एकेकाळी नक्षल्यांचे प्राबल्य असेलल्या भागात आज पोलीस जवान पोहोचले आहे. अतिदुर्गम गर्देवाडा आणि वांगेतुरीत एका दिवसात पोलीस मदत केंद्र उभारून गडचिरोली पोलिसांनी नक्षल्यांच्या बिमोडासाठी आणखी एक पाऊल पुढे टाकले असून येणाऱ्या काळात नागरिकांच्या सहकार्यानेच आम्ही नक्षलवाद संपवू, असा इशारा पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त गर्देवाडा येथे पोलीस जनजागरण मेळाव्यात बोलताना दिला.

नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या अबुझमाड परिसराला लागून असलेल्या गर्देवाडा आणि वांगेतुरी पोलीस मदत केंद्राला १७ फेब्रुवारीरोजी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी भेट दिली. यावेळी आयोजित जनजागरण मेळाव्यात बोलताना त्या म्हणाल्या की, या भागात शिक्षणाचा टक्का वाढणे गरजेचे आहे. देशाच्या राष्ट्रपती देखील आदिवासी समाजातून येतात. उच्च शिक्षणाच्या बळावरच त्या या पदापर्यंत पोहोचल्या. आजपर्यंत नक्षल्यांच्या कारवायांमुळे हा परिसरात मुख्य प्रवाहापासून लांब होता. परंतु आता जवानांनी येथे मदत केंद्र उभारून नागरिकांना भयमुक्त केले आहे.

# समाजकंटकांवर कारवाई करण्यासाठी बारी समाजाचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** बारीसमाज विकास ट्रस्ट दिघी पुणे यांच्या माध्यमातून लोक वर्गणी करून दिघी पुणे येथे श्री संत रुपलाल महाराज मंदिर व त्या परिसरात भक्तनिवास स्वयंपाक गृह भांडारगृह स्वच्छालय व इत्यादी बांधकाम लाखो रुपये खर्च करून करण्यात आले होते. या वास्तूत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम राबविण्यात येत होते. परंतु दिनांक 13 फेब्रुवारी 2024 रोजी काही समाजकंटकांनी या वास्तूचा बराचसा भाग जेसीबीने पाडून उध्वस्त केला. ह्या घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी बारी समाज बांधवांनी दिनांक 16 फेब्रुवारी 2024 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय जळगाव जामोद जिल्हा बुलढाणा यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन दिले निवेदनाच्या माध्यमातून समाजाने सरकार व लोकप्रतिनिधीवर रोष व्यक्त केला व धार्मिक वास्तू उध्वस्त करणाऱ्या समाज कंठकांचा निषेध व्यक्त करून त्यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. याप्रसंगी श्रीकृष्ण केदार तुकाराम काळपांडे अर्जुन घोलप रमेश ताडे रमेश बानाईक रमेश कोथळकर कैलास डोबे, कैलास पाटील



पांडुरंग मस्के अनिल कपले दिनेश ढगे महेंद्र बोडके रमेश हागे संतोष डबे रामेश्वर केदार, गजानन दातीर, रमेश ढगे, समाधान पाटील रामकृष्ण धुळे, रवींद्र बोडखे अजय वंडाळे सुरेश डोबे, अरुण ताडे, शंकर ताडे, नारायण कोथळकर सुभाष ढगे बळीराम धुळे राजू मिसाळ केशव काळबांडे लक्ष्मण ढगे अमोल भगत निलेश पाटील, शिवनारायण धुर्डे, गौरव डोबे, निलेश तेलंगळे, व्यंकटेश ताडे, परसराम पाटील, विनायक भगत, गोपाळ ढगे, श्रावण केदार, निलेश कपले, रमेश धुर्डे, राजू कोथळकर, समाधान खंडाळे, निलेश धोडे व संख्या बारी समाज बांधव उपस्थित होते



# म्हारळ येथे गाव चलो अभियानाला सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** उल्हासनगर विधानसभा मतदार संघातील म्हारळ गाव येथे भाजपा आमदार कुमार आयलानी यांच्या उपस्थितीत गाव चलो अभियानाला सुरवात करण्यात आली. उल्हासनगर आमदार कुमार आयलानी भाजपा उल्हासनगर शहर जिल्हा अध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी गाव चलो अभियानाची सुरवात भाजपा मंडळ अध्यक्ष महेश देशमुख यांच्या कार्यालय परिसरातील वॉर्ड क्रमांक ३येथील गिरनार दर्शन सोसायटी सह वॉर्ड क्रमांक २ सह म्हरळ वरप कांबा अदि ठिकाणासह ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, गुणवंत विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी, दुकानदार, फेरीवाले यांच्या सोबत संवाद साधुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विकास कामांची व केंद्र सरकारने जेष्ठ नागरिक यांच्या साठी कोणकोणत्या योजना आहेत याची माहिती व पत्रके नागरिकांना वाटप करण्यात आले. तसेच वॉर्ड क्रमांक १ मध्ये दीपक अहिरे यांचे ऑफिस जवळ भेट देऊन म्हारळ येथील गाव चलो अभियान चा समारोप करण्यात आला. यावेळी म्हारळ भाजपा मंडळ अध्यक्ष महेश देशमुख, उपसरपंच योगेश देशमुख, समाजसेवक केतन देशमुख, जगन्नाथ शेट्टी, गणेश बिष्ट, उमेश पवार, भाजपा उल्हासनगर युवा अध्यक्ष राकेश पाठक, उल्हासनगर भाजपा नगरसेवक राम चार्ली, लकी नाथांनी, फुलचंद यादव म्हारळ मंडळ अध्यक्षा सौ मनीषा महेश जाधव तसेच महिला पदाधिकारी उपस्थित होते.

# पूल पिचिंगला विहिरीच्या कच्च्या दगडांचा वापर

## चौकशीशिवाय बील अदा करु नये, नसता आमरण उपोषणाचा इशारा; नागरिकांकडून वरिष्ठांना तक्रार

आधुनिक केसरी न्यूज


**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर येथील धाड नदीवरील पुलाला पुरपाण्याचा धोका होऊ नये म्हणून सा बां विभागांकडून गुत्तेदार करवी पुलाच्या बाजुनी भिंतीला दगडी पिचींग करण्यात येत आहे.मात्र काम करताना गुत्तेदार विहिरीचा कच्चा दगड वापरत असल्याने यासंदर्भात नागरिकांनी विभागाच्या वरिष्ठांकडे तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे. ताजनापूर येथे धांडनदीवरील पुलाच्या सुरक्षासाठी बाजूने दगडी पिचींग चे काम साबां विभागांतर्गत गुत्तेदार करवी सुरु असुण गुत्तेदार विहिरीचा कच्चा दगडचा वापर करत आहे.तर स्थानिक मजुर ऐवजी परप्रांतीय मजुर येथे काम करत आहे.काम अंदाज पत्रकानुसार न होता व पिचींग दगड साहित्य मजबुत ऐवजी कच्चा दगडाचा वापर होत असल्याने पिचींग काम निकृष्ट दर्जाहिन होत आहे. या संदर्भात नागरिकांसह राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते शाम कोतकर यांनी साबां विभागांचे कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांच्या लेखी तक्रार करुन कामाची चौकशी व चौकशी शिवाय कामाचे बील अदा करु नये नसता कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



# रेल्वेचा २२ पर्यंत ब्लॉक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून पुणे-मिरज मार्गावर तारगाव-मसूर-शिरवडे या स्थानकांदरम्यान लोहमार्ग दुहेरीकरणाच्या कामासाठी ब्लॉक घेण्यात येणार आहे. हा ब्लॉक सुरू झाला असून, तो २२ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. रेल्वेच्या काही गाड्या रद्द करण्यात आल्या असून, अनेक गाड्या विलंबाने धावणार आहेत. कोल्हापूर-पुणे एक्स्प्रेस २० व २१ फेब्रुवारीला रद्द राहील. पुणे-कोल्हापूर एक्स्प्रेस २१ व २३ फेब्रुवारीला रद्द राहणार आहे. कोल्हापूर-मुंबई कोयना एक्सप्रेस आणि मुंबई-कोल्हापूर कोयना एक्सप्रेस या गाड्या २२ फेब्रुवारीला धावणार नाहीत.



# शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजार समिती कार्य करीत राहणार : ताजणे

आधुनिक केसरी न्यूज

**भद्रावती :** शेतकरी यांच्या हिताच्यादृष्टीने भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समिती भद्रावती अंतर्गत उप-बाजार समिती चंदनखेडा येथे 50 मेट्रीक टन इलेक्ट्रानीक वे-ब्रिज काटा यांचे दि. 16 ला सीडीसीसी बँक चंद्रपूरचे माजी अध्यक्ष रविंद्र शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. शेतकरी यांना आपले कृषी उपज जवळच विकता यावे याकरीता भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समिती भद्रावती अंतर्गत तालुक्यातील चंदनखेडा येथे उप-बाजार समिती आवार आहे. शेतकरी यांच्या कृषी उपज मध्ये वजनाचे हेरफेर होवू नये तसेच योग्य वजनाचा लाभ मिळावा तथा शेतकऱ्यांच्या वेळेची बचत व्हावी या उदांत हेतुने भद्रावती कृ.उ.बा.स. सभापती व संचालक मंडळानी ईलेक्ट्रानीक वे-ब्रिज काटा बसविण्या संबंधाने निर्णय घेत सभापती भास्कर ताजणे यांच्यासह संचालक मंडळाच्या प्रयत्नाने ईलेक्ट्रानिक वे-ब्रिज काटयाचे काम पुर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांकरीता वजन काटयाचे आज लोकार्पण करण्यात आले. लोकार्पण कार्यक्रमास उद्घाटक म्हणून चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. चंद्रपूरचे माजी अध्यक्ष रविंद्र शिंदे तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भास्कर ताजणे हे उपस्थिती होते. प्रमुख पाहुण्यामध्ये कृ.उ.बा.स. संचालक उप-सभापती अश्लेषा मंगेश भोयर, बांधकाम सभापती गजानन उताणे, मनोहर आगलावे, विनोद घुगुल, शरद जांभुळकर, कान्होबा तिखट, ज्ञानेश्वर डुकरे, शांताबाई रासेकर, परमेश्वर ताजणे, शामदेव कापटे, मोहन भुक्या, प्रविन बांदुरकर, राजेंद्र डोंगे, अतुल जिवतोडे, भानुदास गायकवाड, अनिल चौधरी, राजु आसुटकर आदी उपस्थित होते. सर्व प्रथम कार्यक्रमाचे उद्घाटक रविंद्र शिंदे, सभापती भास्कर ताजणे व उपस्थित संचालक यांच्या हस्ते मंदीरात मारोती पुजन करण्यात आले. यानंतर रितसर संचालक मंडळ, उपस्थित व्यापारी वर्ग, शेतकरी बांधव व गावकरी यांच्या समक्ष इलेक्ट्रानिक वे-ब्रिज काटयाचे विधीवत पुजन करीत लोकार्पण करण्यात आले. उप-बाजार समिती चंदनखेडा यांची ओळख आजपासून सदगुरु जगन्नाथ बाबा उप-बाजार समिती चंदनखेडा ओळखले जाईल असे कार्यक्रमाचे उद्घाटक रविंद्र शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना जाहीर केले व पुढेही शेतकऱ्यांच्या हितासाठी व न्याय देण्यासाठी सदैव कार्य करीत राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भद्रावती कृ.उ.बा.स. सभापती भास्कर ताजणे यांनी आपल्या भाषणात म्हणाले की भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समिती सदैव शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कार्य करीत राहील तसेच शेतकऱ्यांना न्याय, योग्य मोबदला देण्यासाठी कार्यरत राहील. या कार्यक्रम प्रसंगी भद्रावती माजी नगरसेवक नरेन्द्र पढाल, मुधोली सरपंच बंडू नन्नावरे, युवा सामाजिक कार्यकर्ते सुनिल मोरे, राहुल मालेकर, भद्रावती माजी नगरसेवक प्रशांत कारेकर, राजू आस्वले, चांगदेव रोडे तसेच व्यापारी वर्ग प्रभाकर घोडमारे, जगदीश राऊत, शालीक घोडमारे, उध्दव भागवत, विकास मगरे, महेश घोडमारे तथा शेतकरी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समिती प्र. सचिव नागेश पुनवटकर यांनी केले तसेच या लोकापर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समिती तथा उप-बाजार समिती चंदनखेडा येथील कर्मचारी वृंद यांनी मोलाची मेहनत घेत कार्यक्रम यशस्वी केले. भद्रावती कृषी उत्पन्न बाजार समिती तथा उप-बाजार समिती चंदनखेडा तर्फे उपस्थितांचे आभार व्यक्त करीत लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

# साईबाबा संस्थान, कामगार हाच माझा पक्ष : विठ्ठल पवार

आधुनिक केसरी न्यूज



**शिर्डी :** येथील साई एम्पलॉईज सोसायटीच्या निवडणुकीत विजयी झालेल्या परिवर्तन पॅनलचे प्रमुख विठ्ठल पवार यांची भूमिका शिर्डी कामगार व सभासदांसाठी केलेल्या संघर्षामुळे त्यांना मिळालेली झाडू मारण्याची शिक्षा व झालेला त्रास हा अनुभव पाठीशी असल्याने मिळालेल्या विजयानंतर बोलताना कामगार हाच पक्ष मानून केलेला संघर्ष व त्याची पावती दिल्याचे सांगितले कोट्यावधी रुपयाची उलाढाल असलेल्या संस्थेवर सभासदांनी १७ संचालक निवडून देऊन एक हाती सत्ता दिली आहे विजयाने हुरळून न जाता कामगार हितासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे देखील सहकार्य घेऊन काम करणार असल्याची व्यक्त केलेली भूमिका कामगार हितासाठी किती दुर दृष्टिकोन ठेवणारी आहे हेच दाखवून देते या संस्थेची वार्षिक उलाढाल १५० कोटीच्या आसपास उलाढाल असून संस्था हिताच्या दृष्टिकोनातून त्यांचा दूरदृष्टीकोन किती मोठा आहे हेच पवार यांनी दाखवून दिले आहे १६०० कामगारांची कामधेनू असलेली व २०० कामगारांना रोजगार देणारी व कोट्यावधी रुपयाची नफा मिळवणारी व साई भक्त भाविकांना माफक दरात सेवा देणारी ही नामांकित नावलौकिक असलेली संस्था आहे या निवडणुकीत विठ्ठल पवार यांना सर्वाधिक १२७५ मते मिळाली आहे विखे गटाच्या दोन्ही गटाला सभासदांनी मोठा धक्का या निवडणुकीत दिला आहे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे खासदार डॉ सुजय विखे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे यांनी कामगारांची कामधेनू असलेल्या सोसायटीसाठी नेहमीच सकारात्मक भूमिका ठेवत मदत केलेली आहे हे देखील नाकारता येणार नाही अनेकदा संस्थेला मदत करण्याच्या दृष्टीने महसूल मंत्री विखे यांनी घेतलेली भूमिका याची जाणीव ठेवत निवडणुकीचे निकाल लागतात पत्रकारांशी बोलताना त्यांनी स्पष्टपणे साईबाबा संस्थान कामगार हाच माझा पक्ष असल्याचे सांगत सावध भूमिका घेऊन सोसायटी व कामगार हितालाच प्राधान्य देणार असल्याचे सांगितले होते.

# देवपूरचा चेहरा-मोहरा बदलणार

## आ. फारुख शाह यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिकेतील सताधाऱ्यांच्या नियोजन शून्यतेमुळे देवपूरचे खड्डेपुर झाले आणि देवापुरवासीयांना याचा नाहक त्रास सहन करावा लागला. अपघातामुळे अनेकांना गंभीर ईजा देखील झाली. वस्तुतः भूमिगत गटार योजना आणि पाणी पुरवठा योजना राबविताना होणाऱ्या खड्ड्यांचा नागरिकांना त्रास होणार नाही म्हणून चारी दुरुस्ती आणि रस्ते दुरुस्ती अथवा नुतनीकरण करणे याचे नियोजन करणे आवश्यक होते. मात्र महानगरपालिकेतील सताधाऱ्यांच्या नियोजन शून्यतेमुळे हे शक्य होवू शकले नाही. देवपूरवासीयांची ही समस्या लक्षात घेवून आ.फारुख शाह यांनी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान आणि मूलभूत सोई सुविधांचा विकास अंतर्गत प्रभाग क्र.१,२,३,४,५ मध्ये सुमारे २० कोटीची कामे मंजूर करून आणली. मात्र मी पण करणार नाही आणि इतरांनाही करू देणार नाही या उक्तीप्रमाणे सत्ताधाऱ्यांनी या विकास कामात खोडा घातला.सताधाऱ्यांच्या किळसवाण्या विकासविरोधी राजकारणाला भीख न घालता आ.फारुख शाह यांनी रद्द केलेली विकासकामे



पुन्हा मंजूर करू आणली.

प्रभाग क्रमांक दोन मधील नागरिकांच्या निवेदनावरून व मागणीवरून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान अंतर्गत प्रभाग क्र.२ तिरुपती नगर येथे गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे या ४२ लक्ष खर्चाच्या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी आ.फारुख शाह यांच्या सोबत, नासिर पठाण,नगरसेवक सईद बेग, डॉ.दीपश्री नाईक, लोकक्रांतीसेनेचे देवेंद्र पाटील, के.एन. बिरारी, तेजस पाटील, प्यारेलाल पिंजारी, ललित पाटील, संजय पाटील, दिनेश चव्हाण, शिवाजी पाटील, कैलास पाटील, संतोष खैरनार, भरत पवार, रघुनाथ बोरसे, दिलीप बाविस्कर, आत्माराम पाटील, सुभाष चौधरी, भटू पाटील, शरद सोनवणे, दर्शन बाविस्कर, प्रमोद मोरे, जयवंत सैंदाणे, दिलीप पाटील, कैलास पाटील, डॉ.बापुराव पवार, इंजि. नकुल अहिरराव, मदन कापुरे, नजर पठाण, फैसलआदी उपस्थित होते. अन्सारी,कैसर अहमद आदी उपस्थित होते.

# रिसोड तालुक्यात बालमजूर कायद्याची पायमल्ली

## अनेक ठिकाणी होते बाल मजुरांची पिळवणूक : शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यासह शहरात बाल मजूरी हा विषय चिंतेचा झाला असून नित्याचाच झाला आहे. रिसोड तालुक्यासह शहरात बऱ्याच हॉटेल, धाबे, तसेच इतर प्रकारच्या काही आस्थापनांमध्ये बाल मजूर पहावयास मिळत आहेतच परंतु रिसोड शहरातील डॉकटर बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोणी फाट्यापर्यंत होत असलेल्या शासकीय निर्माणाधिन रस्ता कामामध्ये दिवसा ढवळ्या एक दहा अकरा वर्षांचा चिमुकला दगड फोडताना दिसून आल्याने शासनाच्या बालमजुर मुक्त देश या संकल्पनेचे पुरते वाभाडे निघाले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून चिंतनीय आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम 1950 च्या अनुच्छेद 24 नुसार 14 वर्षा खालील मुले, मुली यांना अल्प आर्थिक मोबदला देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून त्यांचा शैक्षनिक अधिकार हिसकावून त्यांच्याकडून सामाजिक, मानसिक, शारीरिक त्रास देणे हा कायद्याने



गुन्हा असून यामधे कायद्यानुसार योग्य शिक्षेची तरतूद देखील आहे. मात्र प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी म्हणजेच कारवाई होत नसल्याने बुरसटलेल्या विचारधारेच्या लोकांना अभय मिळत आहे. 14 वर्षा खालील मुलांचे हे वय शिक्षण घेण्याचे असून खेळण्या बागडण्याचे आहे. शासन शिक्षण हक्क कायद्यानुसार मोफत शिक्षण, मोफत पाठयपुस्तके, सकस पोषण आहार शाळांमध्ये दिल्या जातो.त्यामुळे पालकांनी जागरूक होऊन आपल्या पाल्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवू नये. तसेच बाल मजुरीला प्रतिबंध करण्यासाठी कायद्यात कठोरात कठोर शिक्षेची तरतूद होऊन त्याची अंमलबजावणी होणेही तितकेच महत्वाचे आहे. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने, सामान्य माणसाने बालमजुरी बद्दल जागरूक असले पाहिजेत. उद्याचा सशक्त भारत घडवणे ही फक्त शासनाची जबाबदारी नसून ते आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. या भावनेतून काम केल्यास निश्चितच बाल मजुरीला प्रतिबंध झाल्या शिवाय राहणार नाही. तसेच आपल्याला समाजात वावरत असताना ज्या ठिकाणी बालमजुरीची घटना निदर्शनास येईल त्याची प्रथम खबर जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये दिली पाहिजेत. रिसोड तालुक्यासह, शहरातील बाल मजूर ही समस्या हद्दपार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने, तसेच स्थानिक प्रशासनाने ठोस पावले उचलावी अशी मागणी रिसोड तालुक्यातील सुद्य नागरिकांमधून होत आहे. आता यावर प्रशासन काय कारवाई करते हे मात्र येणारा काळच ठरवेल.

# अवकाळी पावसाचा फटका

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने १ हजार ८६ हेक्टर क्षेत्रावरील रब्बी पिके व फळबागांना तडाखा बसला आहे. कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक पाहणीत ही बाब आढळून आली आहे. १५ फेब्रुवारीच्या संध्याकाळी व रात्री अवकाळी पावसाने वाऱ्यासह जिल्ह्यात हजेरी लावली. बुलढाणा, खामगाव व नांदुरा या तालुक्यात अवकाळीचा जोर जास्त होता. कृषी विभागाने आज शुक्रवारी केलेल्या पाहणीत या तालुक्यातील ४८ गावांना फटका बसल्याचे दिसून आले. तसेच १ हजार ८६ हेक्टर क्षेत्रावरील गहू, रब्बी ज्वारी, हरभरा व मका या पिकासह फळबागांचे नुकसान झाले आहे.



# शिऊर सरपंचपदी किरण विजय झिंजूर्डे

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल आहेर**

**शिऊर :** वैजापूर तालुक्यातील राजकीय दृष्टीने महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या शिऊर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी किरण विजय झिंजूर्डे यांची शुक्रवार दि.१६ फेब्रुवारी रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. किरण झिंजुर्डे यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके वाजवून आपला आनंद साजरा केला. शिऊर ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री काशिनाथ जाधव यांनी दोन महिन्यांपूर्वी आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी शुक्रवारी ग्रामपंचायत शिऊर कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सरपंच पदासाठी किरण झिंजुर्डे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी मनीषा कोतकर यांनी किरण झिंजुर्डे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशी, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनील पैठणपगारे, उपसरपंच उज्वला क्षीरसागर, लता आढाव, मंगल जाधव,कांचन देशमुख, सोनाली जाधव, माजी सरपंच अशोक जाधव, नवनाथ आढाव, अर्जुन क्षीरसागर, ग्रामपंचायत सदस्य किशोर जाधव, नंदकिशोर जाधव, सुनील शिरोडे, चांगदेव जाधव, रामेश्वर जाधव,सुनील खांडगौरे, गणेश मोरे उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# केंद्र सरकारच्या विरोधात विरोधकांचा एल्गार

## निवडणुकांमध्ये भाजपचे सरकार उलथवून टाकण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**भास्कर फरकडे**

**गडचिरोली :** नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भारतीय जनता पक्षाचे सरकार देशातील कष्टकरी, कामगार, शेतकरी, शेतमजूर, लहान दुकानदार, असंघटित कामगारांना देशोधडीला लावण्याचे काम करीत आहे. धार्मिक, जातीयवादी, भांडवलदारांना फायदा व्हावा यासाठी गरिबांच्या विरोधात कायदे करून आवाज दडपण्याचा सपाटा चालविला आहे. त्यामुळे जनतेने न्याय मिळविण्यासाठी येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपच्या सरकारला हद्पार करावे, असे आवाहन विरोधकांनी धरणे आंदोलनादरम्यान केले. संयुक्त किसान मोर्चा व कामगार कृती समिती यांनी केंद सरकारच्या जनहित विरोधी धोरणांविरोधात देशव्यापी ग्रामीण भारत बंदची हाक दिली होती. त्यानुसार भारत बंदच्या समर्थनार्थ गडचिरोली येथील इंदिरा गांधी चौकात भाजप सरकार विरोधी राजकीय पक्ष, शेतकरी व कर्मचारी आणि कामगार संगटनांच्या वतीने केंद्र धरणे आंदोलन करण्यात आले. धरणे आंदोलन सभेचे अध्यक्षस्थान भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य कॉ. डॉ. महेश कोपूलवार होते. यावेळी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे केंद्रीय उपाध्यक्ष रोहिदास राऊत, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. रमेश दहिवडे, शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई रामदास जराते, जयश्री जराते, भाई शामसुंदर उराडे, बीआरएसपीचे जिल्हा प्रभारी राज बन्सोड, जिल्हाध्यक्ष मिलिंद बांबोळे, भाकपचे जिल्हा सचिव कॉ. देवराव चवळे, कॉंग्रेसच्या अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष रजनीकांत मोटघरे, रमेश चौधरी, भरत येरमे, जावेद पठाण, राष्ट्रवादीचे इंद्रपाल गेडाम, प्रमिला रामटेके, संजय कोचे, कामगार संघटनेचे लतीफ पठाण, आदिवासी विकास युवा परिषदेचे जिल्हाध्यक्ष विनोद मडावी, डॉ. साईनाथ कोडापे प्रामुख्याने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनांना खर्चाच्या दिडपट हमीभाव देण्यात यावा. व हमीभाव कायदा करण्यात यावा. स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी. शेती पंपासाठी मुबलक वीज पुरवठा करण्यात यावा.महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेले बोनस तातडीने वाटप करण्यात यावे. कर्मचाऱ्यांना जूनी पेंशन लागू करण्यात यावी. कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतले जावे. गडचिरोली जिल्ह्यात पेसा व वनहक्क कायद्यांची अंमलबजावणी करण्यात यावा. लोह खाणी खोदण्यासाठी स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांवरील अन्याय करणे बंद करण्यात यावे. कोनसरी लोह प्रकल्पांसाठी बळजबरीने जमीन संपादन करणे थांबविण्यात येवून भूसंपादन कायदा २०१३ ची अंमलबजावणी करण्यात यावी. मेडीगट्टा धरणग्रस्तांना न्याय देण्यात यावा. वडसा - गडचिरोली रेल्वे लाईनच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीतून माती - मुरुमाचे उत्खनन करून शेती उध्वस्त करणे बंद करण्यात यावे.वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी व मृत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात यावी. हत्ती, डुक्कर, निलगाय यासारखे वन्यप्राण्यांनी पीकांचे नुकसान केलेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा स्थानिक मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत राष्ट्रपतींना पाठविण्यात आले.आंदोलनात मोठ्या संख्येने आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आणि शेतमजूर महिलांची उपस्थिती होती. यावेळी सरकार विरोधी घोषणांनी परिसर दणाणून सोडण्यात आले. आंदोलन यशस्वी होण्यासाठी शेकाप युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष भाई अक्षय कोसनकर, आकाश आत्राम, सुरज ठाकरे, कॉंग्रेसचे पिंकू बावणे, बीआरएसपीचे सतीश दुर्गमवार, प्रतीक डांगे, अशोक खोब्रागडे, प्रकाश रायपुरे, कॉ. धर्मराज सोरते, कॉ. प्रकाश खोब्रागडे यांनी परिश्रम घेतले.

# हरडफ येथे धम्म मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव :** गेल्या ५० पन्नस वर्षांपासून धम्माचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उद्देशाने हदगाव तालुक्यातील मौजे हरडफ येथे महाप्रजापती महिला मंडळ नवयुवक मित्र मंडळ यांच्या वतीने माघ पौर्णिमेला धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म मेळाव्याची लगबग तयारी एक ते दोन महिन्यापासून करण्यात येते हा धम्म मेळावा गावात वर्गणी गोळा करून आयोजित केला जातो. दरवर्षी प्रमाणे या वर्षी ५१ व्या धम्म मेळाव्याचे फलित हरडफ येथे साकारणार भव्य दिव्य बुद्ध विहार गेल्या पन्नास वर्षापासून हरडफ या गावांमध्ये दरवर्षी २४ फेब्रुवारी रोजी माघ पौर्णिमेला या धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. प्रथम सत्रामध्ये पंचशील ध्वजारोहण सकाळी नऊ वाजता महिला मंडळ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे सकाळी दहा वाजता धम्मदेशना उपासक पी एन वाठारे, आर. व्हीं वाठोरे, गणपत वाठोरे , यांची धम्मदेशना होणार आहे. दुपारी साडेबारा वाजता गावातील प्रमुख रस्त्याने तथागत भगवान गौतम बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची मिरवणूक निघणार आहे. सायंकाळी सात वाजता प्रबोधन पर्वामध्ये वक्ते म्हणून प्रा. डॉ. ज्ञानेश्वर घोडगे सहितिक यांचे व्याख्यान होणार आहे. रात्री नऊ वाजता तिसऱ्या सत्रामध्ये प्रसिद्ध गायक स्वपनील मेश्राम संच नागपूर, अश्विनी खोब्रागडे संच चंद्रपुर यांचा बुद्ध भीम गीताचा जंगी मुकाबला होणार आहे.हदगाव तालुक्यातील व परिसरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान समितीचे अध्यक्ष माधव वाठोरे, उपाध्यक्ष बापूसाहेब वाठोरे, सचिव शेषेराव नारायण वाठोरे, कोषाध्यक्ष प्रवेश वाठारे, सहसचिव अमोल वाठोरे, सदस्य प्रेम वाठोरे, छायेद्र वाठोरे, विकास खिल्लारे, रोशन वाठोरे, अमोल वाठोरे, सविधान वाठोरे, संकेत वाठोरे , मिथुन वाठोरे, रोहन लोणे, मोटी वाठोरे, यांनी केले आहे.



# विधानसभा प्रमुख अनुप अग्रवालांचा बुथ क्र १२९ वर प्रवास; गाव चलो अभियानानिमित्त संवाद



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय जनता पार्टी तर्फे सध्या सर्वत्र ठिकाणी गाव चलो अभियान राबवले जात आहे मोदी सरकारची विकासात्मक कामे व विविध योजनांची माहिती या अभियानात प्रत्येक बुधप्रमुख, पदधिकारी, कार्यकर्ता दिलेल्या भागात जाऊन नागरिकांना देत आहेत. शहरात सुद्धा हे अभियान मोठ्या प्रमाणात राबविले जात आहे.

भाजपाचे धुळे शहर विधानसभा प्रमुख व माजी जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल यांच्याकडे पेठ मंडळातील बुध क्र १२९ ची जबाबदारी दिली असल्याने त्यांनी बुध प्रमुख राहुल तारगे यांच्या सोबत भागात संपूर्ण प्रवास करून बुध रचनेसह संपर्क अभियान राबविले या अभियानात परिसरातील बँक, व्यावसायिक, प्रतिष्ठीत व्यापारी, यांच्याशी हि संपर्क साधून त्यांच्या समस्या जाणून घेत विविध योजनांची माहिती त्यांना करून दिली. या प्रसंगी सदर बुधची समिती व प्रमुखांचीही बैठक घेऊन अनुप अग्रवालांनी त्यांना मार्गदर्शन केले . या प्रसंगी पेठ मंडल अध्यक्ष बंटी धात्रक, बूथ प्रमुख राहुल तारगे, युवक अध्यक्ष विक्की परदेशी, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रोहित चांदोडे, सागर कोडगीर, तुषार भागवत, राम भडागे, शुभम पांडे, जयेश पांडे, शिवा सोनार, राहुल भट्टड, विनायक करणकाळ, प्रकाश पांडे, मंदार लोखंडे, सुनील दसपुते, अनिकेत तारगे, विशाल तारगे, भैय्या पोलादे, प्रणव बहाळकर, नितीन भडागे यांची उपस्थिती होती.

# समर्थ सेवामार्गाचा सूर्यनमस्कार दिन

## पन्नास हजार सेवेकरी, विद्यार्थ्यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** आज रथसप्तमी निमित्ताने जागतिक सूर्यनमस्कार सर्वत्र साजरा होत असताना. श्री स्वामी समर्थ सेवामार्गा अंतर्गत कार्यरत सद्‌गुरू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट व आरोग्यदूत विभागाच्या वतीने समर्थ केंद्र आणि काही ठिकाणी शाळांमध्ये सूर्यनमस्कार दिन उत्साहात संपन्न झाला. त्र्यंबकेश्वर येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठात झालेल्या मुख्य कार्यक्रमात चंद्रकांतदादा मोरे हे उपस्थित होते. अडीचशे केंद्र व अनेक शाळांच्या माध्यमातून पन्नास हजार सेवेकरी, विद्यार्थी, पालक, शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले.

याआधी झालेल्या प्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षित सेवेकऱ्यांनी आज विविध ठिकाणी कार्यक्रमात मनःशांतीसाठी ओंकार साधना, पूरक हालचाली, सर्वांग सुंदर व्यायाम प्रकार, सूर्यनमस्कार, शवासन, प्राणायाम, स्वामी समर्थ मंत्र,गायत्री मंत्र,नवर्णाव मंत्र- पूरक- कुंभक व रेचक याबाबत उपस्थितांना माहिती दिली. समर्थ गुरुपीठात उपस्थित सेवेकऱ्यांशी संवाद साधताना चंद्रकांतदादा मोरे म्हणाले, "भारताने जगास विविध प्रकारचे शास्त्र, ज्ञान, तंत्रज्ञान भेट दिले आहे. जग आज भारतीय शास्त्र, कला यांचे अनुकरण करत प्रगती साधत आहे. भारतीय आयुर्वेद आणि त्यानुषंगिक गोष्टी तर संपूर्ण जगाने स्वीकारल्या आहेत. आज जगभर सूर्यनमस्कार दिन साजरा केला जातो ही गोष्ट प्रत्येक भारतीयांस अभिमानास्पद आहे.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर